UNIVERSAL LIBRARY
OU_192596
UNIVERSAL LIBRARY

OUP—881—5-8-74—15,000.

**OSMANIA UNIVERSITY LIBRARY**

Call No. M Accession No. M182

Author

Title देशपांडे, पु. ल.

This book should be returned on or before the date last marked below.

# सुकलेलें फूल

[ स्वतंत्र सामाजिक कादंबरी ]

लेखक

पुरुषोत्तम यशवन्त देशपांडे,

एम्. ए., एल्एल्. बी.

प्रकाशक

गणेश महादेव आणि कंपनी

६०८ सदाशिव पेठ, पुणें शहर

किंमत १ रुपया

गणेश महादेव वीरकर
'साहित्य-सेवक' छापखाना, ६०८ सदाशिव पेठ, पुणें शहर
फेब्रुवारी, १९३१

[ पुढील आवृत्तींचे हक्क प्रकाशकाकडे आहेत ]

संगीत

# युगान्तर

लेखक—प्रो. ना. सी. फडके

कुळाच्या जन्मसिद्ध मोठेपणाचें युग संपून कर्तबगारीच्या व बुद्धिसामर्थ्याच्या मापानें मोठेपणा मोजण्याचें नवें युग उदय पावल्याखेरीज आपल्या समाजाला भाग्याचे दिवस दिसावयाचे नाहींत, ही प्रस्तुत नाटकांतील मध्यवर्ती कल्पना आहे. या कल्पनेच्या आविष्करणाला सोईचें म्हणून एका काल्पनिक संस्थानाचें वातावरण पार्श्वभूमीदाखल घेतलें आहे.

किं. १ रु.

गणेश महादेव आणि कंपनी

६०८ सदाशिव पेठ, पुणें शहर

प्रो. ना. सी. फडके, एम्. ए.
यांची नवीन
स्वतंत्र सामाजिक कादंबरी
अटकेपार
किं. २॥ रु., ट. ख. निराळा

---

श्री. वि. वि. बोकील, बी. ए.
यांची
स्वतंत्र सामाजिक कादंबरी
फोल आशा
किं. १॥ रु., ट. ख. निराळा
गणेश महादेव आणि कंपनी,
६०८ सदाशिव पेठ, पुणें शहर

# प्रस्तावना

'बंधनांच्या पलीकडे' या समाजक्षोभक कादंबरीचे कर्ते श्री. पुरुषोत्तम यशवन्त देशपांडे यांची दुसरी ललितकृति "सुकलेलें फूल" आज मराठी रसिकांना सादर करण्यांत येत आहे. श्री. देशपांडे यांच्या पहिल्या कादंबरीनें वाचकवर्गांत बरीच खळबळ उडविली व टीकाकारांना अनुकूल प्रतिकूल टीका लिहिण्यास तिनें पुष्कळच साहित्य पुरविलें. विशिष्ट सामाजिक प्रश्नांवर तिच्या कथानकाची उभारणी व मांडणी झाली असल्यामुळें तिच्यायोगानें बरेंच मतप्रक्षोभन झालें व वेळोवेळीं वेगवेगळ्या स्वरूपांत तें प्रकटहि झालें.

ज्यांची पहिली कृति यशस्वी अगर क्षोभकारक झालेली असते त्या लेखकांवर, त्यांच्या दुसऱ्या कृतीबाबत फार मोठी जबाबदारी येऊन पडते. त्यांच्या पहिल्या कृतीनें भिन्न भिन्न अंतःकरणांतून वेगवेगळ्या अपेक्षा निर्माण झालेल्या असतात; व त्या पुऱ्या होणें किंवा न होणें यावर लेखकाच्या दुसऱ्या कृतीचें यशापयश अवलंबून असतें. वाचकांच्या अपेक्षा नेहमीं न्याय्य अगर क्रमप्राप्त असतातच असें नाहीं; परंतु एकदां त्या अस्तित्वांत आलेल्या असल्या म्हणजे लेखकाच्या दुसऱ्या कृतीला त्याचा अडथळा झाल्यावांचून मात्र रहात नाहीं. त्यामुळें कोणाहि लेखकाला आपली दुसरी कृति वाचकांपुढें ठेवतांना किंचित् साशंकता व अविश्वास वाटणें स्वाभाविक आहे; व वाचकांनीं आपली कृति बऱ्यावाईट पूर्वग्रहांनीं दूषित न होतां पहावी अशी त्यानें अपेक्षा करणें न्याय्य आहे.

'बंधनांच्या पलीकडे'पेक्षां 'सुकलेलें फूल' अनेक दृष्टींनीं भिन्न आहे. ही भिन्नता त्या दोहोंतील साहित्यविषयक उपचारांमध्येंच केवळ नसून लेखनवस्तूबद्दलच्या दृष्टिकोणाच्या बाबतींतदेखील आहे. 'बंधनांच्या पलीकडे' या कादंबरींतील कथानकाचे धागे व पात्रांचे स्वभाव, सामाजिक प्रश्न

व वैयक्तिक ध्येयवाद या दोन साधनांनीं परिणत झालेले होते. त्याच्या उलट 'सुकलेलें फूल' या कथाप्रबंधांत पात्रांचें जीवन व त्यांचे स्वभाव यांवर सभोंवारची परिस्थिति व सामाजिक निर्बंध यांची होणारी क्रिया-प्रतिक्रिया त्या त्या पात्राच्या मनोव्यापारांच्या व कृतींच्या विश्लेषणानें स्पष्ट केली आहे. 'बंधनांच्या पलीकडे' मध्यें उत्पन्न केलेली परिस्थिति व प्रश्न सामुदायिक मनाला व विचारसरणीला धक्का देणारे होते. तर त्याच्या उलट 'सुकलेलें फूल' या गोष्टींतील प्रश्न प्रत्येक वाचकाच्या स्वतःच्या अंतःकरणांत खळबळ उडविणारे आहेत. 'बंधनांच्या पलीकडे'मध्यें लेखकाची इच्छा, वाचकांचें मन बहिर्मुख करून, त्यांना जगाच्या प्रश्नाकडे डोळे उघडून पहावयाला लावण्याची दिसते; तर "सुकलेलें फूल" लिहितांना, त्याचा संकल्प वाचकाला अंतर्मुख करून स्वतःच्या अंतःकरणाचा ठाव लावण्यास, आत्मसंशोधन करण्यास, उद्युक्त करण्याचा असावा असें वाटतें. 'बंधनांच्या पलीकडे'मध्यें लेखकानें परोक्षकथनाचा मार्ग स्वीकारला आहे; तर 'सुकलेलें फूल' या कथेची नायिका स्वतःच आपली कहाणी सांगत आहे. नाजुक भावना व सूक्ष्म मनोविकार यांची जेव्हां सफाईदार व परिणामकारक मांडणी करावयाची असते तेव्हां आत्मकथनाचा प्रकार अधिक उपयुक्त होतो; व 'सुकलेलें फूल' या कथेच्या वस्तुविकासाला तो फारच अनुकूल झाला आहे. व्यक्ति हें परिमाण कल्पून तिचे मनोव्यापार, भावना व अनुभव यांच्याद्वारें जीविताचीं गूढें उकलण्याचा प्रयत्न करण्याचा जो वाङ्मयप्रकार आहे त्या प्रकारांत प्रस्तुत पुस्तकाचा अंतर्भाव होईल. जें प्रत्येकाला वाटत असतें परंतु त्याला जें शब्दांत प्रकट करतां येत नाहीं तें स्पष्टपणें ध्वनित करणें, 'अवकाशाच्या ओसाडींतील मुके पडसाद वाचाळ' करणें हें उत्कृष्ट वाङ्मयाचें कार्य आहे. अशा प्रकारच्या लिखाणांतून वाचकाला कुठें ना कुठें तरी स्वतःच्याच भावना, स्वतःचेच विचार, स्वतःच्याच आकांक्षा प्रतिबिंबित झालेल्या दिसतात. पण त्यांचें पूर्णपणें आकलन होण्यासाठीं पुस्तकांतील पात्रें व वाचक यांच्यामध्यें एक प्रकारचा सुहृद्भाव

उत्पन्न होणें आवश्यक असतें. लेखक तिऱ्हाइताच्या नात्यानें पात्रांच्या जीवनाची कहाणी सांगत असला तर हें नातें कांहींसें दुरावतें; व वाचक स्वतःला पात्राशीं समरस करून घेण्याऐवजीं त्यांच्या सुखदुःखांकडे प्रेक्षकाच्या नजरेनें पाहूं लागतो.

मराठी ललितवाङ्मयांत अजून भावना व मनोविश्लेषण यांपेक्षां तार्किकतेवरच अधिक भर असल्यामुळें लेखकाला, वाचकाचें पात्रांशीं तादात्म्य होण्यापेक्षां त्याचें प्रेक्षकत्व टिकून रहाणें अधिक इष्ट वाटतें. लेखकाला वाचकांनीं आपल्या बौद्धिक चातुर्यानें थक्क व्हावें अशी जितकी इच्छा असते, तितकी आपलीं पात्रें जिवंत स्वरूपांत त्यांना प्रतीत व्हावीं अशी नसते. त्यामुळें स्वाभाविकच मराठी ललितवाङ्मय प्रायः बहिर्मुख व बौद्धिकताप्रधान असें आहे. मराठी टीकाकारांना जितकी विद्वत्ता प्रिय वाटते तितकी सहृदयता व रसिकता वाटत नाहीं. आज मराठींतील चांगल्या कादंबरीची कल्पना, '[illegible]ानें आपल्या शंकेखोर नाठाळ मनांतील वेगवेगळया भागांना स्त्रीपुरुषांचीं नांवें देऊन त्यांच्या संवादांचें गोष्टरूपानें लिहिलेलें बाड' अशी आहे. मराठी टीकाकारांना गोष्टींत जिवंतपणा नसलेला पत्करतो, वस्तुस्थितीचें यथार्थ प्रतिबिंब नसलें तरी चालतें, तीत मानवी हिताचा गंधहि नसला तरीं तो त्यांना उणेपणा वाटत नाहीं; पण तिच्यांत बऱ्याचशा कोट्या, पुष्कळसे शुष्क वादविवाद, नीरस आणि ज्यांच्या साह्यानें कथानकाचा किंवा पात्रांच्या स्वभावांचा मुळींच परिपोष होत नाहीं अशीं बारीकसारीक गोष्टींचीं अनाठायी वर्णनें यांची रेलचेल असली म्हणजे ती कादंबरी त्यांच्या दृष्टीनें 'अभिजात' ठरते! मराठी रसिकता 'पण लक्षांत कोण घेतो' च्या रुळावरून 'रागिणी' च्या रुळावर घसरली तेव्हांपासून ही परिस्थिति सुरू झाली; व अजूनहि प्रामुख्यानें तिचाच पगडा टीकाकारांच्या मेंदूवर व दृष्टीवर आहे. श्री. देशपांडे यांच्या पहिल्या कादंबरींत मराठी वाचकांना पाहिजे असलेल्या सर्वच गोष्टी जरी नव्हत्या, तरी तिचें एकंदर स्वरूप त्यांच्या आवडीच्या कादंबऱ्यांपेक्षां विशेषसें वेगळें नव्हतें. तिच्यांतील मतें व विचार-

सरणी जरी त्यांना यदाकदाचित् अपथ्यकारक असली तरी तिची रचना-पद्धति त्यांच्या परिचयाची व पसंतीची होती; त्यामुळें ती त्यांना पचनीं पाडणें शक्य झालें. 'सुकलेलें फूल' या मोठ्या लघुकथेची रचना अगदीं वेगळ्या तऱ्हेची आहे.

ललितवाङ्मयाच्या पहिल्या प्रकारापेक्षां लेखनाचा हा दुसरा प्रकार अधिक कठीण आहे. एखाद्या माणसाच्या तार्किक बुद्धीला धक्के देऊन त्याला डोळे चोळावयास लावण्यासाठीं थोडा धीटपणा अंगीं असला म्हणजे पुरेल; पण त्याला अंतर्मुख करण्याचें कार्य साधावयाचें असेल तर लेखकाला वाचकाच्या अंतरंगाची पकड घेतां आली पाहिजे. या कामासाठीं त्याला मानवी मनोवृत्तींचें, गूढ खोल मनोभावांचें, हेतु व क्रिया यांचें आणि कार्यकारणभावांचें स्वानुभवाचें ज्ञान असलें पाहिजे. पण या ज्ञानानेंच केवळ भागेल असें नाहीं. असलेल्या ज्ञानाला शब्दांच्या-द्वारें मूर्तस्वरूप देऊन, आपण स्वतःच्या अंतःकरणांत निर्माण केलेल्या व्यक्तींच्या प्रतिमा, वाचकांच्या मनांत शब्दांच्या साह्यानें मूर्त स्वरूपांत उभ्या करण्याइतकें लेखनकौशल्यहि त्याच्याठिकाणीं असणें भाग आहे.

लेखकावर जशी ही जबाबदारी आहे तशीच प्रतियोगी सहकारिता वाच-कांकडूनहि अपेक्षित असते. कलाकृतीचा पूर्ण रसास्वाद घेण्यास समर्थ होण्या-साठीं वाचकाला परकायाप्रवेशाची कला थोडीफार साध्य करून घेणें आव-श्यक असतें. वाचावयास घेतलेल्या पुस्तकांतील पात्रें व वाचक यांची सम-रसता होणें जरूर असतें. वाचकानें स्वतःला त्या त्या पात्राच्या जागीं कल्पून त्याच्याबरोबर गेलें पाहिजे, त्याचे अनुभव अनुभविले पाहिजेत, त्याचे विचार व विकार आत्मसात् केले पाहिजेत व त्याच्या वेगवेगळ्या स्थित्यंतरां-तून त्याच्याबरोबर राहिलें पाहिजे. नट ज्याप्रमाणें भूमिकेशीं समरस होऊन त्या भूमिकेच्या सृष्टींत वावरत असतो त्याप्रमाणें वाचकानें पुस्तकांतील जड पात्रांना सचेतन करून त्यांच्या जीवनाचें नाटक आपल्या मनोभूमीवर वठविलें पाहिजे. अशा रीतीनें पुस्तकांतील पात्रांशीं तादात्म्यता पावण्यास व त्यांना जडाचीं चेतन बनविण्यास वाचकाला एका विशिष्ट मानसिक

शक्तीच्या साह्याची अत्यंत गरज असते. ही शक्ति म्हणजे कल्पकता होय. निर्जीव शब्दांतून प्रकट होणारे नाममात्र पात्रांचे भाव व मनोव्यापार जिवंत व यथार्थ स्वरूपांत प्रतीत करून घेण्यासाठीं व त्यांना स्वतःच्या अंतःकरणांत मूर्त स्वरूप देण्यासाठीं वाचकाला कल्पनाशक्ति व भावक्षमता या दोन गोष्टींची अतिशय जरूर आहे. त्यांच्या अभावीं जडसाधनांनीं ध्वनित झालेल्या मनोभावांचें व मानवी घटनांचें वाचकांच्या मनांत पुनरुज्जीवन होणें अशक्य होईल.

लेखकानें आपल्या पात्रांची परिस्थिति, त्यांचे मनोभाव व त्यांच्या कृति जर साहजिक क्रमानें व यथार्थपणें रेखाटल्या असतील तर वाचकाला कादंबरींतील पात्रांशीं सुगमपणें तादात्म्य पावतां येईल; त्यांत रंगून जातां येईल; त्यांचे अनुभव अनुभवितां येतील; त्यांचे विचार-विकार त्याला पटतील. पण तसें जर लेखकाकडून झालें नसलें तर वाचकाच्या अपेक्षांची पदोपदीं निराशा होऊन त्याच्या विचारपरंपरेला क्षणोक्षणीं खटके बसतील व रसभंग होईल. अशा प्रकारची निराशा न होऊं देण्यांत व खटके न बसूं देण्यांत लेखकाची कुशलता प्रत्ययाला यावयाची असते. 'सुकलेलें फूल' या कथेच्या लेखकांनीं आपल्यावरील ही जबाबदारी यशस्वी रीतीनें पार पाडली आहे असेंच पुस्तक पुरें केल्यावर वाचकांना आढळून येईल. त्यांची भाषा साधी, अर्थगर्भ व ओघवती असून भावविश्लेषण सहज व क्रमशुद्ध आहे. कथानकाचा ओघ अनैसर्गिकता व कृत्रिमपणा यांनीं कुठेंच दूषित होत नसल्यामुळें वाचक त्या ओघाबरोबर अखेरपर्यंत, मध्यें कोठेंहि रसभंग न होतां पात्रांशीं समरस होऊन जाऊं शकतो.

'सुकलेलें फूल' ही जरी एक गोष्ट असली तरी तिच्यांत दोन कथानकें आहेत. दुसरी कथा मुख्य कथानकाशीं कालमानानें समान्तर नसून तिची घटना पूर्वकालीन आहे. मुख्य कथानकांत प्रामुख्यानें वावरणाऱ्या व्यक्तींपैकीं एकीचा पूर्वेतिहास तींत ग्रथित झालेला आहे. या दोन आत्मकथांच्या दरम्यान, त्या कथानकांतून भाग घेणाऱ्या इतर व्यक्तींच्या आयुष्यमार्गावरील अंतरनिदर्शक दगड इतस्ततः विखुरलेले

आहेत; पण त्या व्यक्तींचें अस्तित्व पार्श्वभूमीच्या स्वरूपाचें असल्यामुळें कोणत्याहि प्रकारें त्यांची रेखाटणी ठळकपणें करण्यांत आलेली नाहीं.

'बंधनांच्या पलीकडे' प्रमाणें या गोष्टींत सामाजिक प्रश्नांना जरी प्रामुख्य देण्यांत आलेलें नसलें तरी ते अजिबात टाळलेले मात्र नाहींत. महत्त्वाच्या दृष्टीनें त्यांना दुय्यम स्थान प्राप्त झालेलें आहे, इतकेंच. गोष्टींतील दोन कथानकांपैकीं अधिक महत्त्वाचें कोणतें या बाबतींत अभिरुचिनुसार कदाचित् मतभेद होण्याचा संभव आहे. असें जरी असलें तरी या दोन धाग्यांची कथानकांत इतकी एकजीव जुळणी करण्यांत आली आहे कीं, त्यांच्यामध्यें फार बारकाईनेंच वेगळेपणा पहावा लागेल. कृष्णेची आत्मकथा मनोविश्लेषणात्मक आहे तर दिवाकराच्या पूर्वेतिहासामध्यें एका नवीन उत्पन्न होणाऱ्या सामाजिक प्रश्नाची रूपरेखा आहे. सुशिक्षितांचें प्रीतिविवाहोत्तर जीवन हा उद्यांचा एक महत्त्वाचा प्रश्न होणार आहे. हाच प्रश्न दिवाकराच्या पूर्वचरित्राचें केंद्र आहे. दिवाकर गरीब असला तरी तो मोडक्यातोडका माणूस नाहीं. तो स्वाभिमानी व कर्तबगार आहे. त्याची सुशिक्षित पत्नी ही स्वतःला सामाजिक नीतीचा आदर्श व शिक्षणाची ध्येयनारा समजणारी समाजसुधारक विदुषी आहे. पतीच्या सुखापेक्षां समाजसेवा करणें तिला अधिक प्रिय वाटत होतें. थकूनभागून घरीं आल्यावर पत्नीला पहाण्यासाठीं दिवाकराचे डोळे आतुरलेले असत, तर लोकांचे डोळे आपल्या कार्याकडे लागून त्याची प्रगति व्हावी एवढयासाठीं त्याच्या पत्नीची सारी धडपड असे. शिस्त व सामाजिक शिष्टनीतिकल्पना या बाबतींत यत्किंचितहि नमतें घेणें म्हणजे तिला अधःपतन वाटत होतें. इतक्या गोष्टी लक्षांत ठेवल्या म्हणजे दिवाकर बायकोला खिजविण्यासाठीं एकामागून एक सिगरेट्स् ओढण्यास प्रथम कसा तयार झाला हें वाचकांच्या सहज ध्यानांत येईल; व एकदां ठिणगी पडल्यावर तिला अनुकूल परिस्थिति मिळून तिचें त्यांच्या विभक्तपणांत झालेलें पर्यवसान क्रमप्राप्त कसें आहे हें कळणेंहि त्यानंतर कठीण जाणार नाहीं.

'सुकलेलें फूल' या गोष्टींतील सर्व पात्रें सुसंस्कृत व संपन्न आहेत.

त्यांच्या सभोंवारचें वातावरण सामान्य जनसंमर्दापासून अलिप्त आहे. यामुळें त्या पात्रांच्या भावना व विचारसरणी यांच्याशीं तादात्म्य पावतांना त्यांची भूमिका लक्षांत बाळगणें आवश्यक आहे. नायिका कृष्णा व दिवाकर यांचे मनोव्यापार बरोबररीतीनें उलगडण्यासाठीं त्यांची संस्कृति व शिक्षण हीं विसरतां कामा नये; व त्यासाठीं त्यांच्या मनाचीं वेगवेगळीं स्वरूपें बारकाईनें पाहिलीं पाहिजेत. कृष्णेच्या मनाचीं स्थित्यंतरें विशेष मनोरंजक व महत्त्वाचीं आहेत. रोगानें बिछान्याला खिळलेली पण जगण्यामरण्याबद्दल जिला सारखीच उदासीनता आहे अशा स्थितींत असतां तिचा वाचकांना प्रथम परिचय होतो. ती विधवा असून तिच्या पुनर्विवाहाचा वाङ्निश्चयहि झालेला आहे. नियोजित वर तिचा आतेभाऊ केशवच असून हें स्थळ कुणाहि वधूला हेवा वाटावा असें आहे. लग्न उभयतांच्या संमतीनें ठरलें आहे. तिच्या आजारीपणाच्या आरंभकाळीं केशवानें तिची शुश्रूषा केली व त्याच कालांत त्यानें तिला मागणी घातली. कृतज्ञतेच्या भावनेमुळें व तिचें प्रेमनिधान झालेली दुसरी कोणी व्यक्ति तेव्हां अस्तित्वांत नसल्यामुळें तिनें त्याच्या मागणीला रुकार दिला. लग्नाला तिची संमति जरी दर्शित झाली असली तरी त्याबद्दल तिला मोठा उत्साह होता असें नाहीं. स्वतःच्या आईबापांची अनुमति मिळवण्याचा प्रयत्न करतांना ती जें बोलते त्यावरून ती याबाबत किती उदासीन आहे व ही उदासीनता वरकरणी नसून कशी खरी आहे हें स्पष्ट होतें. तिला पहिल्या लग्नाइतकाच हा वाङ्निश्चयदेखील एक प्रकारची आंधळी कोशिंबीर वाटत असून आपणाला त्याचा पूर्णपणें अर्थ कळला नाहीं असेंच ती समजत आहे. केशवाबद्दल तिच्या मनांत कृतज्ञता व आदर या भावना आहेत. पण स्त्रीपुरुषांमध्यें जें एक विशेष स्नेहाकर्षण असतें तें त्या दोघांमध्यें अस्तित्वांत नाहीं. पुरुष या नात्यानें केशवाबद्दल तिला कांहींच भावना नाहींत. तिला तो एक मुलगा या दृष्टीनें माहीत आहे; व तरुण पुरुषाच्या स्वरूपांत ज्या वेळीं तो तिला पुन्हां दिसतो त्या वेळीं लहानपणापेक्षां त्याच्यांत तिच्या दृष्टीनें कांहींच फरक पडलेला नाहीं.

त्याला पहातांच तिच्या तोंडून ‘केशवा, केशवा—कां रे तूं तसाच राहिलास?’ असे उद्गार सहज बाहेर पडतात. केशवाच्या व किशीच्या स्वभावांत फार मोठा फरक होता; पण ‘मुलींच्या मानानें ती फारच हूड होती.’ तर ‘मुलांच्या मानानें तो फारच शान्त होता.’ केशव सुविद्य होता. निर्दोष होता. पूर्णतेचा पुतळा होता. स्त्रीप्रेम आकर्षून घेण्याला समर्थ होणारें असें एखादें वैगुण्य किंवा दुर्बलता मात्र त्याच्यांत मुळींच नव्हती. केशव होता तितका चांगला नसता तर कदाचित् कृष्णेचें अंतःकरण त्याच्याकडे ओढलें गेलें असतें. केशवांत जर कांहीं थोडी उणीव असती तर ती भरून काढण्यासाठीं कृष्णेचें स्त्रीहृदय कदाचित् उत्कंठित झालें असतें; पण केशव निर्दोष व सर्व चांगुलपणाचा पुतळा असल्यामुळें तिचा नाइलाज आहे. चांगल्या माणसाबद्दल ज्या उदात्त भावना मनांत असावयाच्या त्या सर्व केशवाच्याबद्दल तिच्या मनांत आहेत. परंतु लग्न ठरलें असतांहि तिचें त्याच्यावर प्रेम मात्र नाहीं. यामुळें तिला जगण्याची तीव्रतेनें इच्छा नाहीं. पण आपण मरणार नाहीं अशी मात्र तिची अकारण खात्री आहे. एखाद्या गर्द अंधारांत वावरणाऱ्या माणसाला सभोंवारच्या गोष्टींचें अस्तित्व अतींद्रियमार्गांनीं सूचित व्हावें परंतु इंद्रियद्वारें त्याची प्रतीति येऊं नये, तशा प्रकारची स्वतःच्या आयुष्याच्या ध्येयाबद्दलची व भवितव्याबद्दलची कृष्णेची मनःस्थिति आहे. ‘चुकचुकल्यापरि वाटे अंतरिं’ ही ‘हरपलेल्या श्रेयां’च्या नायिकेची मनःस्थिति व तिची मनःस्थिति यांमध्यें फारच साम्य आहे. अनेक गोष्टी घडत आहेत; पण त्यांना कारण काय? कांहींच नाहीं!

अशा मनःस्थितींत एका नवीन घटनेला सुरुवात होते. तिला बिनरंगाच्या छटांमध्यें दिसणारी नसती नगरी, दिवाकराच्या तिच्या आयुष्यांतील आगमनानंतर, अधिकाधिक सुस्पष्ट होऊं लागते. संध्यातमामध्यें चोहोंकडे इतस्ततः विखुरलेले रजःकण एकमेकांकडे आकर्षिले जाऊन मूर्त स्वरूप धारण करूं लागतात. आपल्या भवितव्यावरील पटल हळुहळू दूर सरून भवितव्य आपणाला अधिकाधिक स्पष्ट स्वरूपांत दर्शन देत आहे असें

कृष्णेला आढळून येतें. दिवाकराच्या जीविताचें गूढ सोडविण्यास ती उत्सुक होते. आपल्या मदतीनें भरून निघण्यासारखा रितेपणा जगामध्यें कुणाच्या तरी आयुष्यांत आहे हें तिला कळून येतें. कोठल्या तरी मनोहर उपवनांतील सर्प आपल्या तेथें जाण्यानें पळून जाणार आहेत अशी तिची खात्री होते. पण बागेच्या धन्याची इच्छा ते तेथून पळून जावेत अशी नसते. निदान ती तशी नसल्याचा तो आव तरी आणतो. बागेंतील विषारी सर्प त्याच्या इच्छेनें तेथें आलेले नसतात. पण भवितव्यामुळें त्याला ते तेथें असणें, किंवा ते तेथें असल्याचें नाटक करणें आवश्यक आहे असें वाटतें.

पण माणसांच्या इच्छांची बेमुर्वत निसर्ग थोडीच पर्वा बाळगतो ? दिवाकराच्या लौकिकबागेंत कृष्णेचा जरी बरेच दिवस प्रवेश झाला नाहीं तरी ज्या उध्वस्त उपवनांत तिचा प्रवेश होऊं नये असें त्याला वाटत होतें तेथून मात्र त्याला तो मुळींच टाळतां आला नाहीं. तिच्या प्रवेशानें तेथील विषारी सर्पांचें ठाणें उठलें; पण दिवाकराला ते तेथें अस्तित्वांत असल्याचें नाटक करावयाचें होतें. तें त्यानें इतक्या बेमालूमपणें केलें कीं, मास्तरांसारखा रेम्याडोक्याच नव्हे तर 'हुषार, लबाड' कृष्णादेखील फसली. दिवाकराच्या उध्वस्त उपवनांत तिला प्रवेश मिळाल्याचें 'सुकलेल्या फुला'नें कृष्णेला कळविलें. तिला हरपलें श्रेय सांपडलें. दिवाकराच्या बागेंतील विषारी सर्प पळून गेले. पण दिवाकर व कृष्णा कुठें होतीं ? परस्परांपासून अनेक कोस दूर, आपापल्या उद्योगांत मग्न अशा स्थितींत आपलें उरलेलें आयुष्य कंठीत ! याला कारण ? कारण कांहीं नसेल.—कदाचित् जिच्यायोगानें दिवाकराच्या सुंदर बागेंत विषारी सर्पांचा प्रवेश झाला ती समाजघटनाहि असेल ! पण समाजघटनेशीं त्यांना काय करायचें आहे ? त्यांच्या आयुष्याची पूर्तता होऊन चुकली. जर कुणाचें नुकसान झालें असेल तर तें समाजाचेंच; पण त्याला तरी तें कसें कळणार ?

सुकलेलें फूल हें या गोष्टींतील एक महत्त्वाचें प्रतीक असून त्याच्यावर दिवाकर-कृष्णेच्या सर्व नाजुक भावबंधनांचीं व मनोव्यापारांचीं सूत्रें

गुतविलेलीं आहेत. हें नायिकेच्या हरपल्या श्रेयाचें चिन्ह असून त्याच्या देवघेवीनें दोन जीवनांची परिपूर्तता झाली आहे. वाचकानें आपल्या कल्पनाशक्तीच्या सहाय्यानें या प्रतीकाच्या शून्यांत विश्वाचीं कितीहि परार्धें भरलीं तरी त्यांचा त्यांत समावेश होईल. सुकलेल्या फुलाच्या प्रतीकांत कुणी काय पहावें हें सांगण्याचा माझा अधिकार नाहीं. प्रत्येक वाचकाचें तें स्वतःचें कर्तव्य आहे. तेव्हां यापुढें त्यांच्याआड न नेतां इतका वेळ-पर्यंत ते व लेखकानें निर्माण केलेली सृष्टि यांच्यामध्यें आल्याबद्दल त्यांची क्षमा मागून रजा घेतों.

मुंबई,
ता. १२-१२-१९३० }

**के. नारायण काळे**

# सुकलेलें फूल

(एक आत्मकथा)

त्या वेळीं मी बरीच आजारी होतें. मी फार दिवस जगणें शक्य नाहीं असें सर्वांस वाटत होतें. कां कुणास ठाऊक, मला मात्र मी मरेन असें मुळींच वाटत नव्हतें. जगावें असें अगदीं उत्कटतेनें वाटत होतें अशांतला मुळींच भाग नाहीं. जगण्या-मरण्याविषयीं मी पूर्ण उदासीन होतें. जगावें असें तीव्रतेनें वाटत नव्हतें तसेंच मरावें असेंहि वाटत नव्हतें. या माझ्या उदासीन वृत्तीचें माझें मलाच त्या वेळीं फार आश्चर्य वाटे. जगाच्या दृष्टीनें—व त्या वेळीं मला जगाहून निराळी अशी दृष्टि नव्हतीच—सारें सोन्यासारखें जुळल्यावर उदासीन वृत्ति कां रहावी याचें मला मोठें नवल वाटे. परिस्थिति अशी होती कीं, माझ्या जागीं दुसरी कोणीहि समंजस मुलगी असती तर, केव्हां एकदां आजार संपतो व केव्हां आपण आपला सुखाचा संसार थाटतों, असें तिला होऊन गेलें असतें. कारण मी विधवा असून माझें लग्न जुळलें होतें. व जुळलें होतें अशा ठिकाणीं कीं, नव्या नवतीला-सुद्धां माझा हेवा वाटावा. अन् सर्वांत मौज ही कीं, लोकनिंदेस विलक्षण भिणाऱ्या, अगदीं जुन्या मताच्या माझ्या आईवडिलांनीं

माझ्या लग्नाला संमति दिली होती. केवळ वात्सल्यप्रेमाकरितां त्यांनीं हें केवढें दिव्य केलें होतें! या दिव्याची सार्थकता होण्याकरितां व माझ्या भावी पतीस कोंवळ्या वयांत निराशेचा जबर धक्का बसूं नये म्हणून मी जगलें तर फार बरें होईल असें मला मधून मधून वाटे. पण पुन्हां मन उदास होई व जगण्याची इच्छा उत्पन्न करणाऱ्या साऱ्या सुखमय कल्पना उदासीनतेंत विरून जात.

पण वृत्ति जरी इतकी उदासीन होती तरी मी मरेन असें मला मुळींच वाटत नव्हतें. या वाटण्याशीं आईवडिलांच्या दिव्याचा किंवा भावी सुखमय संसाराचा कांहींच संबंध नव्हता. आणि मला जें विलक्षण नवल वाटे तें याचेंच. माझ्या प्रकृतीच्या निकृष्टावस्थेकडे पाहून आई, वडील किंवा माझे भावी पति डोळ्यांत पाणी आणीत व मी लवकरच मरणार असें सुचवीत; तेव्हां मी त्यांना निक्षून सांगें कीं,

"छे हो, मी मरणं शक्य नाहीं. कांहीं तरी होईल व मी साफ बरी होईन!"

माझ्या शब्दांचा त्यांना मोठा अचंबा वाटे, व थोडेंसें समाधानहि वाटे. पण माझ्या शब्दांचा ते निराळाच अर्थ समजत हें जेव्हां माझ्या ध्यानांत येई तेव्हां मला कसेंसेंच होई.--

— २ —

माझे भावी पति केशवराव मला मनापासून आवडत. ते माझे आतेभाऊच असल्यामुळें त्यांचीमाझी अगदीं लहानपणापासूनच ओळख होती. लहानपणीं आम्ही एकत्र खेळलों, हंसलों, रडलों. कितीदां तरी भांडलों व कितीदां एक झालों. लहानपणापासूनच घरची मंडळी आमची थट्टा करीत असल्यामुळें आमच्या हंसण्यारडण्यास व भांडणास निराळीच मौज येई. अगदीं पहिल्यापासून केशव सालस, निष्कपटी व प्रेमळ पोर होता. त्याला दोष लावतां येईल अशी एकहि गोष्ट माझ्या आठवणींत नाहीं. त्याच्यामाझ्या स्वभावांत सांगण्यासारखा असा एकच मोठा फरक होता. तो म्हणजे, मुलींच्या मानानें मी फारच हूड होतें व मुलांच्या मानानें तो फारच शान्त होता. कधीं कधीं तर त्याच्या शान्तपणाचा मला मनापासून तिटकारा येई. पण त्याचा चांगुलपणा अगदीं शंभर नंबरी होता. त्यामुळें माझ्या तिटकाऱ्याची वाढ होण्यास वावच मिळाला नाहीं.

वास्तविक माझें पहिलें लग्न केशवाशींच व्हायचें. पण इतक्या जवळच्या नात्यांत लग्न करणें बरें नव्हे असें वडिलांस वाटलें म्हणून म्हणा किंवा माझ्या आईचें केशवाच्या आईशीं कांहीं घरगुती गोष्टींमुळें वितुष्ट आलें होतें म्हणून म्हणा, माझें पहिलें लग्न केशवाशीं झालें नाहीं. याचें मला त्या वेळीं इतकें वाईटहि वाटलें नाहीं. कारण लग्नाचें महत्त्व कळण्याइतकी

मी मोठी नव्हतें. त्याचप्रमाणें वैधव्याचेंहि मला पहिल्यापहिल्यानें विशेष वाईट वाटलें नाहीं. पण पुढें मी जसजशी मोठी होत गेलें तसतशी वैधव्याच्या खडतर जीवनाची मला जाणीव होऊं लागली. या जाणिवेनें मन पोळत असतां कधीं कधीं मनांत तरंग येई " माझें केशवाशीं लग्न झालें असतें तर ?........"

माझ्या वैधव्यामुळें माझ्या आईवडिलांवर दु:खाचा डोंगरच कोसळला. कारण मी त्यांची एकुलती एक मुलगी होतें. पहिल्या-पहिल्यानें तर आईला माझ्याकडे डोळे वर करून पहावेना. माझ्या पांढऱ्या कपाळाकडे पाहिलें कीं पटकन् तिची मान खालीं जाई व तिच्या डोळ्यांतून अश्रू वाहूं लागत. तात्याहि एखादे वेळीं माझ्याकडे निरखून पहात व एकदम गाहिंवरून जात. आणि मग सारा दिवस त्यांचा चेहरा उदास-उदास दिसे. वैधव्य ही किती भयंकर गोष्ट आहे याची पहिली जाणीव त्या उभयतांकडे पाहून मला झाली. पुढें पुढें तर शेजारणी-पाजारणी व इतर लोक यांनीं त्या जाणिवेला चांगलेच पैलू पाडले. ती जाणीवरूपी हिर-कणी कित्येक दिवस माझ्या काळजास घरें पाडीत होती.....

---

— ३ —

जगाचा मला जसजसा अनुभव येत गेला तसतशी मी स्वतः-ला माझ्या खोलींत अधिकाधिकच कोंडून घेऊं लागलें. लिहितांवाचतां येण्याइतकें माझें शिक्षण झाल्यामुळें महाभारत, रामविजय, हरिविजय वगैरे धर्मग्रंथ मी मोठ्या मनोभावानें वाचूं लागलें. आईला व तात्यांना त्याचें मोठें कौतुक वाटे. वाचनांत कसली शंका आली किंवा ग्रंथांत चांगली म्हटलेली गोष्ट मला पटली नाहीं कीं मी तात्यांना त्याविषयीं विचारी. माझ्या शंकांचें निरसन करण्याच्या भरांत ते मला किती तरी गोष्टींची माहिती देत. त्यामुळें माझ्या तुटपुंज्या ज्ञानांत अमोलिक भर पडल्यासारखें मला वाटे. या आमच्या छोटेखानी वादविवादाचा परिणाम असा झाला कीं, एके दिवशीं वादविवाद संपल्यावर, माझ्या पाठीवर शाबासकीचा धपका देतदेत तात्या म्हणाले, "बस; किशे, आतां तुला खूप शिकवायचं."

त्या दिवसापासून माझ्या आयुष्यांतील एका मोठ्या स्थित्यं-तरास सुरुवात झाली.

दिवसा तात्यांना कचेरी असे, म्हणून त्यांनीं मला शिकविण्या-करितां एक वयस्कर मास्तर ठेवला. तरी सकाळीं व संध्याकाळीं ते मला खूप प्रश्न विचारीत व मला किती तरी गोष्टींची माहिती देत. त्यांच्या कल्पनातीत उत्साहामुळें व मास्तरांच्या मेहनती-मुळें मी तीनचार वर्षांतच मॅट्रिकच्या परीक्षेस बसूं शकलें. व

सांगण्याचा मुद्दा हा कीं, वडिलांना अभिमान वाटावा अशा तऱ्हेनें मी ती परीक्षा पास झालें.

त्या दिवशीं मी तात्यांना जितक्या आनंदांत पाहिलें तितक्या आनंदांत पूर्वीं कधींच पाहिलें नव्हतें. परीक्षेच्या निकालाची तार हातीं पडल्यापासून त्यांची कोण तारांबळ उडाली होती! जो येईल त्याला ते तार दाखवीत व आपल्या पोरीचें कौतुक करून घेत. तात्यांच्याइतकाच मास्तरांनाहि आनंद झाला होता. पण तात्यांनीं त्यांच्यावर स्तुतीचा इतका भाडिमार केला, व त्यामुळें ते इतके ओशाळून गेले कीं, त्यांना आपला आनंद व्यक्त करणें अशक्यच झालें!

दुसरेच दिवशीं तात्यांनीं सत्यनारायण करण्याचें ठरवलें. त्यांना अगदीं काय करूं अन् काय नको असें झालें होतें. त्या दिवशीं त्यांनीं कचेरीलाहि रजा दिली होती. सत्यनारायणाला बरीच मंडळी यावयाची असल्यामुळें व सत्यनारायण बराच थाटानें व्हावयाचा असल्यामुळें आई दुपारपासूनच कामाला लागली होती. तात्याहि नोकरांना 'अरे, हें कर, तें कर' म्हणून हुकूम सोडीत होते. संध्याकाळच्या सुमारास आई पूजेच्या साहित्याची तयारी करूं लागली. पण कां कुणास ठाऊक, ती मध्येंच थांबली. तात्या जवळच उभे होते.

"पोरीचं नशीब चांगलं असतं तर तिला आज जोड्यानंच पूजा करायला बसवलं असतं."

पौर्णिमेच्या चंद्राला काळ्याकुट्ट ढगांनीं ग्रासावें तसें तात्यांच्या चेहऱ्याचें झालें. ते तडक बाहेर निघून गेले. पण आश्चर्य हें कीं, थोड्याच वेळांत त्यांची हांक माझ्या कानीं आली.

"किशे किशे, अग ए किशे! हें पाहिलंस का?" असें म्हणत ते आंत आले, व त्यांनीं एक नुकतीच आलेली तार माझ्या हातांत दिली.

"Heartiest congratulations
—Keshav"

केशवाच्या तारेमुळें पुन्हां वातावरण बदललें. आईच्या वाक्या-मुळें थोड्याच वेळापूर्वीं आलेले काळेकुट्ट ढग पार फांकून गेले.

---

— ४ —

केशवाची तार वाचल्यापासून माझ्या मनांत निराळीच विचार-मालिका सुरू झाली. लग्न झाल्यापासून केशव मला भेटला नव्हता. माझ्या लग्नानें लहानपणच्या गोड आयुष्याचा शेवट केला होता. पण आतां पुन्हां लहानपणच्या साऱ्या आठवणी एका-मागून एक डोळ्यांसमोर उभ्या राहूं लागल्या. व "आतां केशवाला माझ्याविषयीं काय वाटत असेल? मी मॅट्रिक पास झाल्याचें ऐकून त्याला खरोखर फार आनंद झाला असेल का?—तो

आतां केवढा झाला असेल ? कसा दिसत असेल ? त्याच्यांत खूप फरक झाला असेल का ?—" वगैरे अनेक कल्पनातरंग मनांत थैमान घालूं लागले.

दुसऱ्याच दिवशीं केशव आला. सर्वांना फार आश्चर्य वाटलें !

"कसं काय कुसाताई ?"

"ठीक आहे, केशवराव."

"गरीब केशवाची थोडीबहुत ओळख आहे तर !" त्याचे डोळे इमानी कुत्र्यासारखे केविलवाणे दिसत होते ! मी त्याच्याकडे निरखून पहातांच त्याची मान खालीं झाली.

तोच, तोच लहानपणचा निष्कपटी केशव. केशवांत कांहींएक फरक झालेला नव्हता. क्षणभर मला बरें वाटलें. पण.... कां कुणास ठाऊक, लगेच वाईटहि वाटूं लागलें. केशवांत जरा फरक झाला असता तर ?........केशवा—केशवा, तूं कां रे तसाच राहिलास ?....

---

— ५ —

शिक्षणाचें अत्युच्च शिखर गांठण्याची महत्त्वाकांक्षा माझ्या मनांत फारच जोरानें उसळूं लागली. मला पुढें शिकवायचें हें ठरलेंच होतें. पण कोणचा कोर्स घ्यायचा याविषयीं वाद होता. केशवाच्या येण्यामुळें तो वाद लवकरच मिटला.

केशव त्या वेळीं मेडिकल् कॉलेजमध्यें होता. स्त्रीवैद्यांची आपल्या देशांत किती जरूर आहे, वैवाहिक जीवनाविषयीं गाढ अज्ञान असल्यामुळें आपल्या समाजाचें व देशाचें किती भयंकर नुकसान होत आहे, माझ्यासारख्या हुषार मुलीनें हें अज्ञान दूर करण्याच्या कामीं सर्व आयुष्य खर्ची घातल्यास समाजावर किती उपकार होणार आहेत....वगैरे गोष्टींचें महत्त्व त्यानें इतक्या मुद्देसूद रीतीनें पटवून दिलें कीं, तात्यांनीं अखेरीस मला मेडिकल् कॉलेजमध्यें पाठवायचें निश्चित केलें. मला काय, शिक्षणाचें अत्युच्च शिखर गांठायचें एवढें माझें ठरलें होतें. कोणच्या मार्गानें तें गांठायचें याविषयीं मी पूर्ण बेफिकीर होतें.

कॉलेजमधील पहिलीं दोन वर्षें इतक्या प्रचंड उत्साहांत गेलीं कीं, मी कुठें वहात आहें हें माझें मलाच कळलें नाहीं. विधवेच्या खडतर जीविताचें इतकें सुखकर रूपान्तर होईल हें माझ्या स्वप्नींसुद्धां आलें नव्हतें. कदाचित् माझ्या प्रचंड उत्साहाचें कारणाहि हेंच असेल.

पण ही अवस्था फार वेळ टिकायची नव्हती. फार श्रमामुळें म्हणा किंवा हवा न मानवल्यामुळें म्हणा, मी मधून मधून आजारी पडूं लागलें. तापापासून सुरुवात झाली व पुढें पोटांत कळा निघूं लागल्या. पहिल्यापहिल्यांदा मी याचा कुणाला पत्ताहि लागूं दिला नाहीं. कारण तात्यांना कळल्यास माझें शिक्षण कांहीं काळ तरी बंद पडेल अशी मला भीति वाटत

होती. पण पुढें पुढें माझें दुःख झांकून ठेवणें अशक्य झालें. कधीं कधीं आठआठ दिवस मला तळमळत पडून रहावें लागे. अशा वेळीं केशवानें माझी किती झटून शुश्रूषा करावी. तो M.B. B. S. नुकताच झाला होता. पण कांहीं विशेष अभ्यास करण्याकरितां तो मुंबईला राहिला होता. त्याच्या प्रेमळ शुश्रूषेमुळेंच मला मुंबईला रहाणें शक्य झालें. कारण घरीं फारसें कळवायचें नाहीं असें आम्ही ठरवलें होतें. पण माझ्या हट्टी रोगानें केशवाच्या प्रेमळ शुश्रूषेलाहि दाद दिली नाहीं. तो सारखा बळावतच चालला.....

---

— ६ —

पोटदुखीचा जोर नुकताच कमी झाला होता. मला जरा बरें वाटूं लागलें होतें. लोडाशीं टेकून मी माझ्या पलंगावर बसलें होतें. माझें पोट शेकण्याकरितां केशव पाणी तापवीत होता. त्याच्या शान्त, निरपेक्ष, प्रेमळ व मनोभावानें करीत असलेल्या शुश्रूषेकडे पाहून माझ्या डोळ्यांत पाणी आलें. तो गरम पाण्याची पिशवी घेऊन मजजवळ आला त्या वेळीं मी रडत होतें.

"केशव, मी आतां घरींच जावं असं मला वाटतं. सध्यां मला बरं वाटतं खरं; पण रोग केव्हां बळावेल याचा नियम नाहीं. तेव्हां घरींच जाऊन पडलेलं बरं. कदाचित् हवापालट

झाल्यामुळं मी साफ बरीहि होईन. अन् शिवाय तुला तरी किती त्रास द्यायचा ?"

केशव कांहींच बोलला नाहीं. त्याचे डोळे पाण्यानें भरून आले.

" केशव, तुझे उपकार मी आजन्म विसरणार नाहीं. मी तुझी उतराई कशी होऊं ?"

केशवाच्या डोळ्यांतून अश्रू वाहूं लागले.

थोड्या वेळानें तो म्हणाला, " माझ्या उपकारांतून तुला खरोखरच मुक्त व्हायचं आहे का ? त्याला एकच उपाय आहे."

" तो कोणता ?"

" मी सर्वस्वीं तुझाच आहें, असं जर तुला कधीं काळीं वाटूं लागेल तर तुला माझ्या उपकारांची फेड करण्याचं कारणच उरणार नाहीं !"

" म्हणजे !—" मी आश्चर्यानें थक्क होऊन विचारिलें.

केशव कांहींच बोलला नाहीं.—पण बोलायचें काय कारण उरलें होतें ? कळण्याकरितांच शब्दांची योजना आहे. कळल्यानंतर शब्द कशाला हवे होते ?........

— ७ —

या नंतर थोड्याच दिवसांनीं आमचें लग्न करायचें ठरलें. केशव म्हणजे चांगुलपणाचा सजीव पुतळा होता. त्याचा अव्हेर करणें त्या वेळीं तरी माझ्या शक्तीबाहेरचें काम होतें.

मी लवकरच बरी व्हावें म्हणून केशवानें माझा वियोग सहन करण्याचें कबूल केलें. मुंबई सोडून मी घरीं आलें.

आमच्या लग्नाचा बेत केशवानें तात्यांना आधींच पत्रानें कळवला होता. पहिले कांहीं दिवस त्यांना माझ्या पुनर्विवाहाची कल्पना अगदीं कशीशीच वाटली. मी आपणहून माझ्या लग्नाची गोष्ट कधींच काढली नाहीं. आई किंवा तात्या मधून मधून ती गोष्ट काढीत. मी त्यांना प्रत्येक वेळीं निक्षून सांगत असें कीं, " तुम्ही याविषयीं उगाच त्रास कां करून घेतां? मी जाणूनबुजून विधवा आहें. पुन्हां माझं लग्न होईल अशी माझी कधींच अपेक्षा नव्हती. अगदीं स्वप्नांतसुद्धां मी त्याची आशा बाळगली नाहीं. तेव्हां लग्न झालंच पाहिजे असा माझा मुळींच आग्रह नाहीं. अगदीं सहजासहजीं, संतोषानं ही गोष्ट घडून आली तरचं मला हवी आहे. तुम्हांला दु:ख देऊन मी लग्न करणं शक्य नाहीं. तुम्ही याविषयीं अगदीं निर्धास्त रहा. तुम्ही नाहीं म्हटल्यास मी निराशेनं झुरून मरेन अशी कल्पनासुद्धां मनांत आणूं नका. मी माझं सारं आयुष्य अभ्यासांत व लोकसेवेंत आनंदानं घालवीन.—"

विरोधामुळें कित्येक वेळां निष्कारण गोष्टी विकोपास जातात. लग्नाविषयीं माझ्या बाजूनें बंडखोरपणा, हट्ट, आग्रह किंवा फारशी उत्सुकतासुद्धां न दिसून आल्यामुळें माझ्या आईवडिलांची फारच चमत्कारिक अवस्था झाली. माझ्या वृत्तींतील किंचित् बेफिकीरपणामुळेंच कीं काय, त्यांनीं माझ्या लग्नास माझ्या अपेक्षेपेक्षां लवकर संमति दिली.

घरीं आल्यानंतर महिना दीडमहिना माझी प्रकृति बरीच सुधारत होती. 'लग्न ठरल्याचा परिणाम' असें म्हणून कांहीं लोक माझी थट्टा करूं लागले. मलासुद्धां त्यांचें म्हणणें थोडें-थोडें पटूं लागलें. पण दैवाची गति मानवी अपेक्षेपेक्षां सदाच विपरीत असते! माझ्या आजारानें पुन्हां उलट खाल्ली. पण दैवाला दोष देण्यांत काय अर्थ? आईवडिलांकरितां, निदान केशवाकरितां तरी, लवकर व पूर्ण बरें व्हावें अशी मला तळमळ लागून राहिली होती का? व तेवढ्याकरितां अत्यंत झटून असा प्रयत्न तरी मी केला होता का? डॉक्टरांनीं—व खुद्द केशवानेंसुद्धां—किती तरी गोष्टी करा व किती तरी करूं नका म्हणून बजावून सांगितलें होतें. पण या सांगण्याकडे मी कितीदां तरी दुर्लक्ष नाहीं का केलें? बरें होण्याकरितां निश्चयाचा व नेटाचा असा प्रयत्न माझ्याकडून झालाच नाहीं. याचा अर्थ मी जाणूनबुजून निष्काळजी होतें असा मात्र नाहीं. कारण 'करूं नका' म्हणून सांगितलेल्या गोष्टी मुद्दाम करीत असें किंवा

'अवश्य करा' म्हणून सांगितलेल्या गोष्टी मुद्दाम टाळीत असें, असें माझ्या हातून कधींच झालें नाहीं. दुर्लक्ष होई तें आपो-आपच होई. व तें होऊन गेल्यावर माझ्या लक्षांत येई. याला माझा नाइलाज होता. माझा आजार पुन्हां बळावण्याबद्दल दैवाला दोष देण्यापेक्षां मी या माझ्या वृत्तीलाच दोष देईन. कित्येकदां मला या वृत्तीचा इतका राग येई! पण—पण काय?

एखाद् वेळीं मनांत येई कीं, माझ्या या चमत्कारिक वृत्तीचें काय कारण असेल असें केशवालाच विचारावें. पण कां कुणास ठाऊक, केशवाला विचारण्याची कल्पना मनांतल्या-मनांतच विरून जाई. केशवाला विचारलें तर त्याला कदाचित् फार फार वाईट वाटेल अशी मला भीति वाटे. असें वाटण्याचें कारण जर मला कुणी विचारलें असतें तर मला मुळींच सांगतां आलें नसतें. माझी वृत्ति केशवाच्या प्रीतीशीं विसंगत आहे कीं काय, अशी मला मधून मधून शंका येई. व म्हणून मी या बाबतींत केशवाला विचारण्यास मुळींच धजलें नाहीं.

— ८ —

माझा आजार बळावत चालल्यामुळें केशवाला मुंबई सोडून यावें लागलें. माझ्या आजारामुळें तो अगदीं हताश झाला होता. कारण अनेक उपाय झाले तरी मी बरी होण्याचें चिन्ह दिसेना. केशव स्वतः डॉक्टर होता व त्यानें अनेक नामांकित डॉक्टरांकडून माझ्या प्रकृतीचें निदान करवलें. पण माझ्या रोगानें कुणालाच दाद दिली नाहीं. वैद्यकशास्त्रावरील व त्याचबरोबर आधुनिक सर्व शास्त्रांवरील केशवाचा विश्वास पार उडाला. त्यानें आतां अशास्त्रीय उपाय करून पहायला परवानगी दिली. जो जें काय सांगेल तें करून पहायचें असा क्रम सुरू झाला. पण....इतकें करूनहि माझ्या प्रकृतींत व्हावा तसा फरक घडून आला नाहीं.

माझ्या प्रकृतीविषयीं आई, तात्या व केशव जितके निराश होऊं लागले तितकी माझी आशा वाढूं लागली. व मी आतां जगणें शक्य नाहीं या कटु सत्याची त्यांना जेव्हांपासून खात्री वाटूं लागली तेव्हांपासून माझ्या आशेचें दृढ-विश्वासांत रूपान्तर होऊं लागलें. आणि मी हा विश्वास बोलून दाखवला कीं त्यांच्या चेहऱ्यावर भेसूर स्मित दिसे. जणुं काय माझा विश्वास म्हणजे विझण्यापूर्वीं दिवा मोठा होतो तद्वतच आहे असें त्यांना वाटे !

दिवा मोठा होत होता. पण तो विझण्याकरतां नव्हे तर सर्वांचे डोळे दिपवण्याकरतां !

—पण हें इतक्यांतच कशाला ?

— ९ —

एके दिवशीं माझे मास्तर, ज्यांनीं मला शिकण्याची गोडी लावून ज्ञानाचें अत्युच्च शिखर गांठण्याची महत्त्वाकांक्षा माझ्यांत प्रज्ज्वलित केली, ते माझे मास्तर आले.

“ केशवराव, तुमच्या सर्व डॉक्टरांनीं तर इच्या प्रकृती-पुढं हात टेकलेच; आतां मी सांगतों त्या माणसाचं औषध देऊन पहाण्यास कांहीं हरकत आहे का ? ”

“ कोण तो माणूस ? ”

“ तो माणूस म्हणजे एक डॉक्टरच आहे. इथलाच आहे. कदाचित् तुम्हाला ऐकून माहीतहि असेल; कदाचित् नसेलहि. या अफाट गांवांत एका कोंपऱ्यांतील बातमी दुसऱ्या कोंपऱ्यांत पोंचतेच असं नाहीं.—आहे डॉक्टरच, पण—”

“ पण काय ? बोला कीं स्पष्ट. आतां काय वाटेल तो उपाय करून पहायला माझी तयारी आहे. ”

“ वाटेल तो उपाय म्हणजे मी कांहीं जादूटोणा करायला नाहीं सांगत. तुम्ही आहांत तसाच तोहि एक डॉक्टर आहे. मुंबईहूनच पास होऊन आला आहे. तुमच्या आधीं चारदोन वर्षं झाला असेल तो पास. पण हुषार माणूस! माझ्या एवढ्या आयुष्यांत मी पुष्कळ डॉक्टर अन् वैद्य पाहिले, पण त्याच्यासारखा हुषार माणूस माझ्या पहाण्यांत आला नाहीं असं मी निश्चयानं म्हणूं शकतों. ”

" कोण माणूस तो सांगा कीं ! अन् इतके दिवस कुठं बोललां नाहीं ते या तुमच्या धन्वंतरीविषयीं ? "

" तुमचे बडेबडे डॉक्टर प्रयत्न करीत होते, तेव्हां म्हटलं या माणसाचं नांव सांगणं म्हणजे शुद्ध वेडेपणाच होईल; म्हणून नाहीं बोललों. पण आतां बोलायला कांहीं हरकत नाहीं. मी त्याच्याविषयीं इतक्या खात्रीनं बोलतों त्याला कारण आहे. अगदीं गेल्या वर्षापर्यंत आमचं कुटुंब जगेल अशी आम्हांला आशा उरली नव्हती. माझ्या गरीबीच्या मानानं मी पुष्कळ उपाय करून पाहिले. पण शेवटीं एका शेजाऱ्यानं या माणसाचं नांव सांगितलं. अन् काय सांगूं तुम्हांला चमत्कार! आमचं कुटुंब गेल्या वर्षी यमाच्या दारीं होतं अशी शंकासुद्धां आज कुणाला येणार नाहीं. "

" अहो, त्या माणसाचं नांव सांगाल कीं नुसती तारीफच करीत रहाल ? "

" नांव सांगायला खरोखरच जरा अडचण आहे ! "

" म्हणजे ? "

" इतक्या गुणी माणसाचं नांव सांगायला लाज वाटावी ही केवढी खेदाची गोष्ट आहे ! अनेकांच्या यमयातना कायमच्या थांबवण्याचं ज्याच्या हातांत सामर्थ्य आहे तो इतका—"

" तो इतका काय ? बोला कीं, असे थबकलां काय ? तुम्ही तर अगदीं नाटक चालवलं आहे."

" अरे बाबा, नाटक पुरवलं. नाटकांतसुद्धां इतकी विचित्र विधिघटना सांपडत नाहीं. आपल्या नाटकांत काय, चांगला म्हणजे चांगला अन् वाईट म्हणजे वाईट, असा ' बे दुणें चार 'चा सरळ हिशोब. वाईट माणसाच्या हातून वाईट गोष्टी घडल्या तर त्यांत कांहींच आश्चर्य नाहीं. पण जो मुळांत इतका चांगला, इतका गुणी तो इतक्या अधोगतीस जावा हें केवढं दुर्भाग्य ! "

" मास्तर, तुम्ही आज अगदीं रंगांत आलां आहांत ! क्षणाक्षणाला उत्सुकता वाढवून ती अगदीं कळसाला गेली तरी कोडं उलगडूं द्यायचं नाहीं, अशा धर्तीच्या अगदीं आधुनिक कादंबऱ्यांतील कथानकासारखं तुम्ही चालवलं आहे. मी आपला मघांपासून तुम्हांला नांव विचारतों आहें अन् तुम्ही आपले त्या माणसाचे गुणदोष वर्णन करून नुसती उत्सुकताच वाढवीत आहांत."

" अरे हो, विसरलोंच. सांगूंच का आतां त्याचं नांव ? "

" तुमची कादंबरी संपली असल्यास."

" काय बाबा थट्टा करतां गरीबाची ! बाकी कादंबरीला खरी सुरुवात यापुढंच व्हायची आहे."

" ती कशी काय ? "

" अहो, त्याचं नांव कळून तुम्हांला काय कळणार आहे ? त्या माणसाची प्रत्यक्ष ओळख झाल्यानंतरच तुम्ही म्हणतां त्या-

प्रमाणं त्याच्याविषयीं क्षणोक्षणीं उत्सुकता वाढत जाईल. व कदाचित् त्याच्याविषयींचं कोडं तुम्हांला जन्मभरसुद्धां सुटणार नाहीं!"

हें संभाषण त्या वेळीं अगदीं सहज चाललें होतें. पण कधीं कधीं अगदीं सहज होणाऱ्या संभाषणांत किती गूढार्थ भरलेला असतो याचें प्रत्यंतर मला थोडक्याच दिवसांनीं आलें!

---

## — १० —

मास्तरांनीं अखेरीस त्या माणसाचें नांव सांगितलें. त्याचें नांव 'डॉक्टर दिवाकर' असें होतें. केशवाला हें नांव ऐकून माहीत होतें. केशव मेडिकल् कॉलेजांत गेला त्या वेळीं त्यानें हें नांव ऐकलें होतें. कारण त्या वेळीं डॉक्टर दिवाकर म्हणजे अत्यंत हुषार विद्यार्थी म्हणून सर्वतोमुखीं त्याची प्रसिद्धी होती. त्या वर्षींच्या परीक्षेंत तो पहिला आला होता. पण केशवाची व त्याची प्रत्यक्ष ओळख कधींच झाली नव्हती. कारण पास झाल्यानंतर तो लागलींच प्रॅक्टिस करण्याकरितां निघून गेला.—पण केशवाच्या या माहितीशीं मास्तरांनीं दिलेली माहिती बरीच विसंगत होती. कारण केशवानें डॉक्टर दिवाकराच्याविरुद्ध एकहि शब्द कुणाच्या तोंडून ऐकला नव्हता.

उलट हुषार, सुसंस्कृत व सुशील विद्यार्थी अशीच त्यांची कीर्ति त्यानें ऐकली होती.

डॉ. दिवाकरांच्या परस्परविरोधी वर्णनामुळें माझ्या मनांत त्यांच्याविषयीं बरेंच कुतूहल निर्माण झालें. चटका लावणाऱ्या कादंबरीचा शेवट कळण्याची जशी चुटपुट लागते तशी मला त्यांना पहाण्याची व त्यांच्या आयुष्याची कहाणी कळण्याची चुटपुट लागली. त्यांचें आयुष्य विलक्षण गुंतागुंतीचें असलें पाहिजे अशी माझी समजूत झाली. व म्हणूनच तें कळून घेण्याची मला विशेषच उत्सुकता वाटूं लागली. ही उत्सुकता अगदीं तिऱ्हाइताची होती. नियतकालिकांतून केवळ मनोरंजनार्थ जशीं कोडीं दिलेलीं असतात व तीं कोडीं सोडविण्यांत जसें कित्येकांचें मन गुंतून जातें तसेंच माझें मन डॉ. दिवाकरांच्या जीवितांचें कोडें सोडविण्यांत गुंतून गेलें. नियतकालिकांतील कोडीं मी कधींच सोडविलीं नव्हतीं. एवढेंच नव्हे तर तीं सोडविण्यासाठीं धडपडणाऱ्या लोकांची मला जरा चीडच येई. निरर्थक गोष्टींसाठीं कालाचा व बुद्धीचा अपव्यय करणाऱ्या लोकांची मला कींवच करावीशी वाटे.

पण दिवाकरांच्या जीवितांचें कोडें सोडविण्यांत माझें मन इतक्या चटकन् कसें गुंतून गेलें याचें मला फारच आश्चर्य वाटलें. मानवी जीवितांचें कोडें इतक्या विचित्र स्वरूपांत माझ्यापुढें पूर्वीं कधींच आलें नव्हतें. मास्तरांनीं सांगितल्याप्रमाणें, मानवी

जीविताची माझी कल्पना म्हणजे ‘ बे दुणें चार ’च्या हिशेबा-सारखी सरळ होती. या कल्पनेला आजवर एकच अपवाद होता. व तो म्हणजे माझी स्वतःची चमत्कारिक वृत्ति. जीविताच्या सरळ हिशेबी कल्पनेंत ती कुठेंच बसेना. तिचा विसंगतपणा मला कित्येकदां भयानक वाटे. व म्हणून मी तिच्याविषयीं फारसा विचारसुद्धां करीत नसें. तरी पण तिची जाणीव मधून मधून मला बोंचेच. आई सरळ, तात्या सरळ, मास्तर सरळ, केशव सरळ—या साऱ्या सरळ व सद्गुणी सज्जनांच्या सहवासांत जीविता-विषयीं अगदीं साधी, सरळ कल्पना व्हावी यांत नवल काय? नवल एवढेंच होतें, बाकी सारे सरळ होते. पण मी—? माझी वृत्ति?—पण तें कांहीं कां असेना, माझी विसंगत वृत्ति हें जरी एक कोडें होतें तरी तें सोडविण्याची मला कधींच उत्सु-कता लागली नव्हती. व तें सोडविण्याचा प्रयत्नसुद्धां मला कधीं करावासा वाटेना. सभोंतालच्या सरळपणांत मिसळून जाऊन माझी विसंगत वृत्ति नाहींशी करून टाकण्याकडेच माझा कल होता. मध्येंच तिच्या अस्तित्वाची जाणीव होई व आंत आंत चमकल्यासारखें होई. मन बावरून गेल्यासारखें होई. व म्हणूनच कीं काय, मी माझें कोडें सोडविण्याच्या फंदांत कधींच पडलें नाहीं. पण दिवाकरांच्या जीवितांचें कोडें सोड-विण्यांत मन गुंतवतांना मला कसलीच अडचण भासली नाहीं. कारण त्यांत माझ्या स्वतःचा कांहींच संबंध नव्हता.—

---

— ११ —

डॉक्टर दिवाकर मला तपासून गेले. मास्तरांची थट्टा करीत, मोठ्यानें हंसत हंसतच ते माझ्या खोलींत शिरले. त्यांच्या हंसण्याच्या आवाजांत कसासाच कोरडेपणा व बेफाम उद्दामपणा होता. त्यामुळें त्यांचें हंसणें मला भेसूर वाटलें. व तें कानीं पडतांक्षणीं मी दचकलेंच. पण माझ्या पलंगाकडे दृष्टि वळतांच त्यांचा चेहरा एकदम गंभीर झाला. अगदीं हलके हलके, पावलांचा आवाज होऊं न देण्याची मुद्दाम खबरदारी घेत ते माझ्या पलंगापाशीं आले. त्यांनीं एकवार मला नखशिखान्त अगदीं निरखून पाहिलें.—त्यांच्या डोळ्यांत विलक्षण चमक होती.—नंतर त्यांनीं माझ्या पलंगासभोंवतालच्या सर्व वस्तूंचें सूक्ष्म अवलोकन केलें व सर्व खोलीभर एकवार दृष्टि फिरवली. नंतर हलकेच ते माझ्या पलंगाशेजारच्या खुर्चीवर बसले. माझा हात धरून नाडी पाहूं लागले. इतर डॉक्टरांच्याप्रमाणें घड्याळ काढून नाडीचे नुसते ठोकेच न मोजतां, त्यांनीं अगदीं वैद्यासारखी माझी नाडी बारकाईनें पाहिली. नंतर त्यांनीं नलिकायंत्राच्या साहाय्यानें व एका हाताचीं बोटें अंगास लावून दुसऱ्या हाताचीं बोटें त्यांवर थबथब मारून माझी छाती व पाठ तपासली. —मला त्या वेळीं माझ्या अशक्ततेची कोण लाज वाटली !— नंतर त्यांनीं मला पाय ताठ करून निजायला सांगितलें, व माझें पोट तपासण्यास सुरुवात केली. पुन्हां गुडघे वर करण्यास सांगून

पोट तपासलें. तपासण्याची प्रत्येक क्रिया ते अतिशय बारकाईनें व काळजीपूर्वक करीत होते. तपासतांना त्यांच्या भुंवया आंवळलेल्या होत्या व कपाळावर उभ्या दोन आंठ्या पडल्या होत्या. मधूनमधून मनांत कसली तरी कल्पना आल्यामुळें त्यांच्या भुंवया अधिकच आवळल्या जात व ते इतक्या भेदक दृष्टीनें पाहूं लागत कीं, जणुं काय शरीराचें अपारदर्शकत्व त्यापुढें नष्ट होऊन जाऊन त्यांना आंतील रचना दृग्गोचर होऊं लागे. व असें झालें म्हणजे जणुं काय त्यांना रोगाचें मूळ कळल्यासारखें वाटे आणि त्यांच्या चेहऱ्यावरील तीव्रता नाहींशी होऊन त्यावर समाधानाची सौम्यता खेळूं लागे. तपाशीत असतांना त्यांनीं कुणाकडेच पाहिलें नाहीं. जगाचें अस्तित्वच जणुं ते विसरून गेले होते.—फार काय, माझ्याकडेसुद्धां त्यांनीं पाहिलें नाहीं. इतक्या तल्लीनतेनें त्यांची तपासणी चालली होती. एक हाडामांसाचा मनुष्यप्राण्याचा सजीव देह एवढीच त्यांना त्या वेळीं माझ्याविषयींची जाणीव असेल. यापलीकडे कांहीं नाहीं.—ते खरे कलावंत होते. चित्रकारास जसे रंग, कुंचल्या, कागद किंवा कापड तसाच त्यांना अनेक अवयवयुक्त मनुष्यप्राण्याचा देह. रंगांच्या व कुंचल्यांच्या साहाय्यानें चित्रकार जशी चित्रांची हवीतशी सृष्टि निर्माण करतो तद्वतच औषधांच्या व शस्त्रक्रियेच्या साहाय्यानें मानवी देहाचें हवेंतसें बरेंवाईट स्वरूप करून दाखविण्याचें त्यांच्यांत सामर्थ्य आहेसें मला वाटलें. चित्रकारास

चित्र काढतांना कुंचल्यांचें, कागदांचें किंवा कापडाचें जितके भान असतें तितकेंच त्यांना माझें भान होतें. रोग्याविषयीं इतकी अविवश वृत्ति मी पूर्वी कोणच्याच डॉक्टराची किंवा वैद्याची पाहिली नव्हती. मला त्यांचें जरा भयच वाटूं लागलें. मी पूर्ण बरी होणार याची मला शंकाच उरली नाहीं. मला भय वाटूं लागलें तें निराळ्याच कारणाकरितां. माझ्या पराकाष्ठेच्या उदासीन वृत्तीसहि त्यांच्या वृत्तीनें चळविलें!

ज्यांच्या भेसूर हंसण्यामुळें मी दचकलें ते दिवाकर व मला तपासतांना दिसलेले दिवाकर एकच का?........

---

— १२ —

दिवाकरांचें औषध सुरू झाल्यापासून माझ्या खोलीचें अंतर्बाह्य स्वरूप पालटलें. माझी खोली ही रोग्याची खोली आहे असें म्हणण्याची कुणाची प्राज्ञा झाली नसती. पूर्वीं होत्या त्याहूनाहि अधिक खिडक्या उघड्या केल्यामुळें आंत प्रकाश व हवा अधिक स्वैरतेनें खेळूं लागली. ठिकठिकाणीं तऱ्हतऱ्हेच्या पुष्पपात्रांतून नानाविध फुलें कुशलतेनें रचल्यामुळें खोलीभर मधुर सुवास दरवळून गेला, व खोलींत नवीन सौंदर्य नाचूं लागलें. माझ्या खोलींत नवजीवनाचा संचार झाला!—

एके दिवशीं फुलदाणींतील फुलांचा मनोरम साज पाहून मी केशवाला विचारलें, " केशव, कुठून रे इतकीं सुंदर सुंदर फुलं आणतोस ? "

केशव हंसला. पण माझ्या प्रश्नाचें त्यानें कांहींच उत्तर दिलें नाहीं. माझी उत्सुकता अधिकच वाढली. मी पुन्हां पुन्हां त्याला तोच प्रश्न विचारला ; तरी तो सांगेना. शेवटीं मी अगदीं फारच तिरिमिरीवर आलेली पाहून तो विरघळला.— माझ्यापुढें केशवाचा कुठलाहि निश्चय कधींच टिकला नाहीं.— तो म्हणाला, " हें पहा, आजाऱ्यानं एकाच गोष्टीचा असा पिच्छा पुरवणं व त्याकरतां डोकं तापवून घेणं चांगलं नाहीं."

" कोण तापवतं आहे माझं डोकं ? माझ्या साध्या प्रश्नाचं सरळ उत्तर दिलं असतंस तर हा सारा त्रास वांचला असता."

" सरळ उत्तर देण्यास कसलीच अडचण नसती तर मी तुला इतका त्रास दिला असता का ? "

" एकूण तूं मला त्रास दिलास हें तुला कबूल आहे तर ? आतां सांग कां त्रास दिलास मला तो ? एवढी साधी गोष्ट, पण काय त्याचं गौडबंगाल करूं पहातो आहेस तूं ! "

" गौडबंगाल निर्माण करून आजाऱ्याचं मन बुचकळ्यांत पाडणं व त्यांतच गुंगत ठेवणं हाहि एक रोग बरा करण्याचा उपाय असला तर ? "

" अस्सं. आतां समजलं.——पण काय ?——देणारानं औषध दिलं, पण देतां देतां तूं तें मधेंच सांडून टाकलंस ! "

" तें कसं काय ? "

" फुलं कुठून आलीं असावींत याविषयीं मला आतां गौड-बंगाल मुळींच उरलं नाहीं. "

" तुम्ही बायका फार लबाड असतां ! "

" कशा काय ? "

" मी सांगत नव्हतों तर मारे त्रागा करून मला सांगायला लावलंस. अन् आतां औषध सांडल्याबद्दल मलाच उलट दोष देतेस ! "

" अर्थातच ! रोग्याला औषध देणं ही कांहीं सोपी गोष्ट नाहीं. रोग्याच्या मनधरणीला बळी पडून तूं जर औषध देईनासा झालास तर त्याचा दोष रोग्याकडे न येतां तुझ्याच माथीं बसेल. "

" पण मी तुला औषध दिलं नाहीं किंवा तें सांडून टाकलं हेंच मला कबूल नाहीं. मी तुला अजून कुठं सांगितलं फुलं कुठून आणलीं तीं ? "

" आतां तुझ्या खोट्या आवानं का मी फसणार आहें ? बिंग फुटलं तें फुटलं ! "

बिचारा केशव ओशाळून गेला. तो स्वतःवरच खूप चिडल्या-सारखा दिसूं लागला. मला त्याची कींव आली.

— १३ —

डॉक्टर दिवाकर मला पहाण्याकरितां मधूनमधून येतच असत. ते आले कीं मजेदार वादविवाद चालत. ते बोलण्यांत अगदीं पटाईत होते. थट्टा करण्यांत तर त्यांचा हातखंडा असे. वादविवादाच्या वेळीं मास्तर असले कीं फारच मौज येई. डॉक्टर दिवाकर माझ्या खोलींत असेतोंपर्यंत हंसण्यास व आनंदास खूप भरतें येई. मी आजारी आहें हें मी पार विसरून जात असें.

केशवाशीं घडलेल्या वरील प्रसंगानंतर ते माझ्याकडे येतांच मी त्यांना विचारलें,

" डॉक्टर, तुम्हाला एवढीं सुंदर सुंदर फुलं कुठून हो मिळतात ? "

" म्हणजे ? तुमच्याकडे सुंदर फुलं कुठून येतात हें मला कसं काय माहीत असणार ? "

" मी कांहीं या नाटकानं फसायची नाहीं."

" मला नाटकी म्हणणाऱ्या पहिल्या तुम्हीच दिसतां. माझ्या बेफाम फटकळपणाबद्दलची अपकीर्ति अजून तुमच्या कानीं आलेली दिसत नाहीं."

" तुमच्या अपकीर्तीशीं मला कांहीं करायचं नाहीं. फुलं कुठून आणलीं एवढंच पटदिशीं सांगून आपला फटकळपणा सिद्ध करा म्हणजे झालं."

" तुम्ही अगदीं वस्ताद आहांत. पण चूक माझीच आहे म्हणा. का केशवराव, अखेरीस घसरलांतच तुम्ही ! तरी मी म्हणतच होतों--"

" अहो, मी तरी काय करूं ? मी कांहीं तिला तसं सांगितलं नाहीं. पण माझ्या कांहीं शब्दांवरून तिनं ताडलं त्याला मी काय करणार ? "

" बरं, जाऊं द्या. पाहूं, हात पाहूं तुमचा. "

" पण फुलं कुठून आणलीं तें सांगा आधीं. मग दाखवतें हात."

" अंऽहं, मला नका हं हात दाखवूं!"

त्यांच्या हात दाखवण्याच्या कोटीवर आम्ही खूप हंसलों. हंसण्याच्या भरांत डॉक्टरांनीं पुन्हां विषय बदलण्यास सुरुवात केली. थोड्या अवकाशानें माझ्या तें ध्यानांत येतांच मी पुन्हां त्यांना फुलें कुठून आणलीं म्हणून विचारलें. त्यांनीं ताबडतोब उत्तर दिलें,

" स्वरूपचंद मारवाडी म्हणून माझा एक पेशंट आहे. त्याची गांवाबाहेर दोनतीन मैलांवर एक सुंदर बाग आहे. त्या बागेंतलीं आहेत हीं फुलं. सहज बोलतां बोलतां केशवरावांपाशीं मी या बागेविषयीं बोललों. लगेच त्यांनीं फुलं आणण्याची सोय केली."

त्यांनीं हें सारें गंभीरपणानें सांगितलें. मलाहि तें क्षणभर

खरें वाटलें. पण जरा रोखून पहातांच मला त्यांच्या डोळ्यांत मिस्किलपणाची चमक दिसली. लगेच मी त्यांना म्हटलें,

" खोटं, सारं खोटं. स्वरूपचंद नांवाचा कुणी मारवाडी नाहीं. असला तरी तो तुमचा पेशंट नाहीं. पेशंट असला तरी त्याची बाग नाहीं. अन् बाग असली तरी तींत एवढीं सुंदर फुलं असणं शक्य नाहीं. अन् चुकूनमाकून असलीं तरी केशव इतक्या लांबून तीं आणायला जाणं शक्य नाहीं."

माझा वकीली धर्तीचा जबाब ऐकून डॉक्टर खूप हंसूं लागले. ते म्हणाले,

" कां, केशवरावांनीं फुलं आणणं तुम्हांला इतकं अशक्य कां वाटतं ?"

" त्याला नाहीं इतकी फुलांबिलांची आवड. अन् शिवाय तो कशीं इतक्या लांबून फुलं आणणार ? सारा वेळ माझ्यापाशींच तर असतो बिचारा."

" तुम्हीं त्यांना सोडीतच नाहीं तर ते तरी काय करणार ?"

" छे हो, त्याला बरं वाटावं म्हणून मी त्याला मुद्दाम बाहेरून जाऊन यायला सांगतें पुष्कळदां. पण तोच हालत नाहीं. मी तर त्याला मुंबईलासुद्धां जा म्हणतें. पण त्याला उगीचच माझ्याविषयीं फार काळजी वाटते."

" बाकी आतां केशवराव मुंबईला गेले तरी हरकत नाहीं; आतां तुमची प्रकृति पुष्कळ बरी आहे."

" हो, मलासुद्धां असंच वाटतं. पण केशव आपला अजू-नहि माझी काळजीच करतो आहे."

" साहजिकच आहे."

आम्ही सर्वच जरा हंसलों. सारेंच संभाषण खूप मजेंत चाललें होतें. थोड्या वेळानें केशव कांहीं कामाकरितां बाहेर गेला. मी पुन्हां एकदां डॉक्टरांना फुलांविषयीं विचारलें.

" तुम्हाला काय करायचं आहे कळून ? कुठलीं कां असे-नात तीं फुलं ? "

" पण तुम्ही तरी एवढ्या क्षुल्लक गोष्टींविषयीं इतके आढे-वेढे कां घेतां ? "

डॉक्टर जरा गंभीर झाले व किंचित् थांबून म्हणाले,

" हीं फुलं माझ्या बागेंतलीं आहेत."

" खरंच का ? तरीच एवढे आढेवेढे घेणं चाललं होतं. इतकीं सुंदर फुलं मी जन्मांत कधीं पाहिलीं नव्हतीं. एवढा मोठा मोगरा, एवढा मोठा गुलाब, अन् इतक्या नाजुक अन् गोड रंगाचा, माझ्या कधींच पहाण्यांत आला नव्हता. मी बरी झाल्यावर तुमची बाग पहाण्यास अवश्य येईन."

" अंहं, तेवढं मात्र करूं नका."

" कां ? " मी अगदीं आश्चर्यचकित होऊन विचारलें. डॉक्टर कांहींच बोलले नाहींत. त्यांचा आनंदी चेहरा एकाएकीं

खिन्न झाला. मी विचारांतच पडलें. माझी कुठें चूक झाली मला कळेच ना.

इतक्यांत केशव आला. डॉक्टरांनीं मला गंभीरपणें तपासायला सुरुवात केली व तपासल्यानंतर केशवाला कांहीं सांगून ते तडक निघून गेले.

---

## — १४ —

त्यानंतर चार-पांच दिवस डॉक्टर आमच्याकडे आले नाहींत. वास्तविक ते निदान एक दिवसाआड तरी यायचेच. पण या खेपेला त्यांनीं फारच उशीर केला. केशवाला मी विचारायला पाठवलें तेव्हां ते म्हणाले, “ आतां कांहीं वरचेवर येण्याची इतकी गरज नाहीं. सारं ठीक आहे.” त्यांच्या उत्तरानें माझी निराशा झाली.

कां नाहीं आले दिवाकर माझ्याकडे? बाग पहायला येईन म्हटलें तर ‘ अंहं, तेवढं मात्र करूं नका ’ असें ते कां म्हणाले? आणि ‘ कां?’ विचारतांच त्यांचा चेहरा एकाएकीं खिन्न कां झाला? त्यांची बाग लुटायला का मी जाणार होतें? मी नुसतें पहायला येईन म्हटलें; पण तेवढेंहि त्यांना खपलें नाहीं. त्यांच्या इच्छेविरुद्ध का मी बाग पहाणार होतें? त्यांच्या बागेंत कितीहि

सुंदर फुलें असलीं तरी मी त्यांच्या इच्छेविरुद्ध तीं पाहीन असें का त्यांना वाटलें ?—मी तें वाक्य अगदीं सहज बोलून गेलें. त्याचें त्यांना एवढें कां बरें वाटावें ?........

---

— १५ —

डॉक्टर दिवाकरांना येऊन आठ दिवस होऊन गेले. मी आतां अगदीं पूर्ण निराश झालें होतें. एक कल्पना मनांत आली.

त्या दिवशीं झालेला प्रकार मी केशवास सांगितला. ती हकीगत ऐकून केशवहि जरा बुचकळ्यांतच पडला. 'बागेंत येईन' एवढें म्हणतांक्षणींच डॉक्टरांची अशी चमत्कारिक स्थिति कां झाली असावी हें त्यालाहि कळेना. डॉक्टरांचें जीवित विलक्षण गुंतागुंतीचें असावें असें त्याला अगदीं निश्चयानें वाटूं लागलें. मलाहि केव्हांपासूनच तसें वाटत होतें. डॉक्टरांच्या विचित्र वृत्तीच्या मुळाशीं काय असावें याविषयीं आमचे तर्क सुरू झाले. पण ते सारे तर्कच असल्यामुळें त्यामुळें कांहींच समाधान होईना. शेवटीं डॉक्टरांना पुन्हां घरीं कसें आणावें याविषयीं बेत सुरू झाले. केशवानें सुचवलेले सारेच बेत मला नापसंत पडले. अखेरीस माझाच बेत अंमलांत आण-

ण्याचें ठरवलें. डॉक्टरांना मी पत्र लिहावें असा तो बेत होता. मी पत्र लिहिलें,

"—तुमच्या बागेच्या वाटेस न जाण्याचा मी निश्चय केला आहे. फुलांचें कौतुकसुद्धां न करण्याचें मी ठरवलें आहे. फार कशाला, या बाबतींत चुकून प्रमाद घडूं नये म्हणून तुमच्याकडून फुलें आल्यास तीं परत करण्याविषयीं मी सांगून ठेवलें आहे. तेव्हां आतां तुम्हांला माझ्या भेटीला यायला कांहींच अडचण उरली नाहीं ! मग येणार ना मला भेटायला, सवड होतांच ?—

—कृष्णा."

माझ्या पत्राचा विजेसारखा परिणाम झाला असें मला वाटलें. पत्र मी सकाळीं पाठवलें. फार फार तर संध्याकाळीं डॉक्टर येतील अशी माझी अपेक्षा होती. पण डॉक्टर अगदीं भर दुपारीं उन्हांतून माझ्याकडे आले.

गेल्या प्रकाराची आठवण करून देणारें एक वाक्यसुद्धां मी बोललें नाहीं. डॉक्टरहि माझ्या पत्रासंबंधीं कांहींएक बोलले नाहींत. इकडच्या तिकडच्या गप्पा चालल्या होत्या. पण मधूनच डॉक्टरांची दृष्टि माझ्या दृष्टींत क्षणकाल स्थिर होई. त्या वेळीं त्यांच्या दृष्टींत एक नवाच स्नेहभाव दिसन

येई.—कदाचित् माझ्याहि दृष्टींत त्यांना तसाच स्नेहभाव दिसला असेल!

डॉक्टर अगदीं थोडा वेळच होते. दवाखान्याचें काम संपवून घरीं जातां जातां वाटेंत ते माझ्याकडे आले होते. त्यांचें जेवण वगैरे व्हायचेंच होतें; म्हणून मी त्यांना जास्त वेळ रहाण्याचा मुळींच आग्रह केला नाहीं.

त्या दिवशीं संध्याकाळीं डॉक्टर माझ्याकडे आले नाहींत. मला जरा वाईट वाटलें. डॉक्टर पुन्हां कांहीं दिवस दडी मारून बसतील कीं काय, अशी मला भीति वाटूं लागली. या विचारा-मुळें जी अस्वस्थता आली ती दुसरे दिवशीं सकाळपर्यंत होती. दिवस उजाडला तरी मी अंथरुणांत पडूनच होतें. डोळे उघडून दिवसाकडे पहाण्याची इच्छा होईना. 'काय करायचं डोळे उघडून? काय करायचं दिवसाकडे पाहून?' असे उदास विचार मनांत येऊन मन त्यांतच विराम पावे. अशा स्थितींत मला गुंगी येऊन माझा अंमळ डोळा लागला. दिवस फार वर आला असें वाटून मी ताड्कन् उठून बसलें; तों एक मनोरम दृश्य दृष्टीस पडलें! फुलें—सुंदर फुलें—दिवाकरांच्या बागेंतलीं फुलें!—उशीरा उठण्याबद्दल मी माझ्यावरच कोण रागावलें!—फुलें दृष्टीस पडतांच उदास विचार पार पळून गेले. एक एक फूल हातीं घेऊन पहाण्याकरितां मी फुलांच्याजवळ गेलें. तों माझ्या नांवाचें एक पाकीट दिसलें. मी तें पटकन् उचललें व फोडलें—

" तुमच्या निश्चयाप्रमाणें फुलें परत पाठवाल एवढ्या एकाच आशेवर हीं फुलें पाठवीत आहें.—पाठवाल ना परत ?

—दिवाकर."

—मी अगदीं गारच झालें! काय करावें मला कांहींच सुचेना. दिवाकरांच्या पत्रानें मी पार गोंधळून गेलें.

एकाएकीं मला केशवाची आठवण झाली. केशवालाच विचारून काय तें ठरवावें असें मला वाटलें. केशवाला मी हांका मारूं लागलें. पण होता कुठें केशव? आईनें सांगितलें कीं, माझ्या उठण्याची वाट पहातां पहातां अखेरीस कंटाळून केशव कुठें बाहेर निघून गेला. आतां काय करावें? फुलें परत पाठवावीं अशीच माझी विवेकबुद्धि मला सांगूं लागली. पण किती गोड, किती सुंदर होतीं तीं फुलें! अन् निजून उठतांच माझे उदासवाणे विचार पार पळवून लावणारीं फुलें, हात न लावतां, हुंगून न पहातांच परत पाठवायचीं?—मला तें एक दिव्यच वाटलें!—पण छे, मला फुलें परत पाठविणें भागच होतें. त्या फुलांचा स्वीकार करणें मला अशक्य होतें—दिवाकरांच्या पत्रानंतर! मी गड्याला हांक मारली. 'आलों' असें त्याचें उत्तर माझ्या कानीं आलें. रुमालाचीं तीन टोंकें मी फुलांभोंवतीं गुंडाळलीं. आतां चवथें उचलून फुलें रुमालांत

बांधणार, तोंच दोन टोंकांच्या मधून एक फूल इतकें नाजुक, गोजिरवाणें व मोहक दिसूं लागलें कीं, माझ्या जणुं नकळत मी तें पटकन् काढून घेतलें,—लपवून ठेवलें. रुमालांत बाकीचीं सर्व फुलें बांधलीं. इतक्यांत गडी वर आला. डॉक्टरांच्याकडे फुलें नेण्याविषयीं मी त्याला सांगितलें. तो फुलें घेऊन गेला, दूर गेला; दृष्टीआड झाला.—आतां परत बोलावणेंहि शक्य नव्हतें.—कशाला मी हें फूल ठेऊन घेतलें?—कशाला?—

---

— १६ —

त्या दिवशीं मी केशवाची उत्कंठेनें वाट पहात होतें! पण त्याच दिवशीं त्याला बाहेर जायला फावलें. क्षणाच्या उशीरानें त्याच्या-माझ्यांत युगायुगाचें अंतर पडत आहे असें मला वाटलें.—अखेरीस केशव आला. त्याला मी ताबडतोब दिवाकरांची चिठ्ठी दिली. वाचून तोहि जरा चमकलाच. निदान मला तसें वाटलें.

"कुठं आहेत तीं फुलं?"

"कुठं म्हणजे? अर्थात् मी तीं परत पाठवलीं."

"म्हणजे? खरंच का?"

"अगदीं खरं!"

" काय वेडी आहेस तूं ! "

" कां ? त्यांत काय वेडेपणा झाला ? मला तर वाटतं मी जें केलं तें योग्यच केलं. "

" वेडी आहेस तूं ! बिचारे दिवाकर ! त्यांना खात्रीनं फार वाईट वाटेल. त्यांनीं आपलं थट्टेनं, तुझ्या पत्राला उत्तर म्हणून अशी चिठ्ठी लिहिली. तूं फुलं परत पाठवशील अशी त्यांना कल्पनासुद्धां शिवली नसेल."

—खरेंच, मी फार वेडेपणा केला. त्यांनीं आपली मजेखातर चिठ्ठी लिहिली असेल. तिला कांहीं तरी मजेचें उत्तर पाठवण्याचें सोडून वेड्यासारखीं फुलें काय मी परत पाठविलीं ? मला वाटतें मी त्यांच्या चिठ्ठीचा भलताच अर्थ केला.—आतां माझ्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला. काय घोडचूक करून बसलें मी ! काय खुळ्यासारखी भलतीकडेच वहावलें ?—

" खरंच केशव, मला वाटतं मी फार चूक केली फुलं परत पाठवण्यांत. पण तूं कां रे त्या वेळीं इथं नव्हतास ? मी तुला किती हांका मारल्या ! अखेरीस आईनं सांगितलं कीं तूं बाहेर गेलास म्हणून. तूं असतास म्हणजे आपण कांहीं तरी गमतीदार उत्तर लिहिलं असतं. पण आतां काय त्याचं ?—आतां काय करावं ?—"

" पण तुझ्या डोक्यांत हा वेडेपणा शिरलाच कसा, याचं मला आश्चर्य वाटतं ! "

" मी नुकतीच झोंपेंतून उठलें होतें, तों समोर तीं मनोहर फुलं ! कोण आनंद झाला मला ! उचलायला म्हणून जवळ गेलें तों ही चिठ्ठी सांपडली. मी गोंधळून गेलें तर नवल काय? फुलं पाठवायचीं होतीं तर त्याबरोबर असा वात्रटपणा कां करावा त्यांनीं ? घ्या म्हणावं आतां—पण का रे, फार वाईट वाटेल का त्यांना ? "

" हो, मला वाटतं त्यांना फार वाईट वाटेल. दिवाकरांचा स्वभाव जरा विचित्र आहे. ते सगळ्या दुनियेशीं फटकून वागतात. शेंकडों रोगी, श्रीमंत असोत, गरीब असोत, सर्वांना सारख्याच काळजीनं तपासतात. व तपासणं झालं कीं सर्वांशीं सारख्याच फटकळपणानं वागतात. रोगी या नात्यानं जो कांहीं संबंध येईल तेवढाच. बाकीच्या गोष्टींविषयीं ते पूर्ण बेफिकीर असतात. तुझ्या औषधाकरतां दवाखान्यांत गेलं म्हणजे फार फार मजा दिसते. विलक्षण हुषार पण विलक्षण तऱ्हेवाईक माणूस आहे. त्यांच्या विचित्र वृत्तीच्या मुळाशीं कांहीं तरी गूढ निराशा असावी अशी एखाद वेळीं शंका येते. व त्यांच्याविषयीं ज्या बातम्या रूढ आहेत त्यावरून माझ्या शंकेला बळकटीच येते."

" काय बातम्या रूढ आहेत ? "

" त्या साऱ्याच तुला सांगण्यासारख्या नाहींत. पण चारपांच वर्षांपूर्वीच त्यांचा एका सुशिक्षित बाईशीं प्रीतिविवाह झाला. विवाहानंतर एकदीड वर्षाच्या आंतच त्यांची बायको

त्यांना सोडून कुठं तरी उत्तर-हिंदुस्थानांत निघून गेली एवढी गोष्ट खास. बायको त्यांना सोडून जाण्याचीं कारणं मात्र हजार लोक हजार तऱ्हेचीं सांगतात. खरं काय असेल तें त्यांचं त्यांना माहीत."

" खरंच, मास्तरांनींहि आपल्याला पहिल्याप्रथमच नाहीं का कांहीं तरी असंच वेडंवांकडं सांगितलं ?"

" मास्तरांनीं जें अडखळत अडखळत सांगितलं तेंहि खरं असावंसं दिसतं. बायको सोडून गेल्यापासून दिवाकर फार व्यसनी व दुर्वर्तनी झाले, असं सारे लोक सांगतात. कांहीं तर असंहि सांगतात कीं, दिवाकरांनीं आधीं वेडेचार सुरू केले व म्हणूनच त्यांची बायको त्यांना सोडून गेली. त्यांच्या बायकोच्या चांगुलपणाविषयीं मात्र सर्वांचं एकमत दिसतं."

आमचें हें बोलणें चाललें होतें इतक्यांत मास्तर आले. केशवानें सांगितलेल्या हकीगतीला मास्तरांनींहि पुष्टी दिली. ते तर आणखी असेंहि म्हणाले,

" अहो, काय सांगूं तुम्हांला, दिवाकरांची बायको म्हणजे एक साध्वी आहे. इथं काय वर्ष दोन वर्षं असेल, पण तेवढ्यांत तिनं आमच्या बाजूच्या चारदोन पुऱ्यांतील साऱ्या बायकांचीं मनं आकर्षून घेतलीं. तिनं एक संस्था काढली होती. साऱ्या लहानथोरांच्या बायका जमवाव्या, त्यांना हर तऱ्हेचीं कला-कुसरीचीं कामं शिकवावीं, खूप इकडची तिकडची माहिती

द्यावी, सभा भरवाव्या, व्याख्यानं द्यावीं, बोलायला शिकवावं, अन् सर्वांशीं इतक्या गोडीगुलाबीनं व नम्रतेनं वागावं कीं, सर्व तिच्यावर अगदीं खूष होऊन जात. ती इथं आणखी कांही वर्षं असती तर या गांवांतल्या स्त्रीसमाजांत तिनं चांगलीच सुधारणा घडवून आणली असती. पण—दैव आड आलं. इतका हुषार अन् कर्तबगार नवरा लाभूनसुद्धां बिचारीला संसार-सुखाला आंचवावं लागलं."

मास्तरांना मनापासून वाईट वाटत असलेलें दिसलें. अंमळ विसांवा घेऊन ते म्हणाले,

"हाहि माणूस चांगला आहे हो.माझी आतां इतके दिवसांची ओळख आहे, पण दिवसेंदिवस माझा त्यांच्याविषयीं आदर व कौतुक वाढतच आहे. काळाच्या दाढेंतून किती तरी जीव त्यानं प्राणाचीहि पर्वा न करतां, रात्रंदिवस मेहनत करून काढले असतील! पण एवढे सारे अलौकिक गुण व्यसनाच्या पायीं मातीमोल झाले. शेंकडों जीवांना त्यानं जीवदान दिलं असेल, पण त्यांपैकीं एकाच्याहि घरीं त्याला राजरोसपणं जातां येत नाहीं. सारे लोक त्याच्यापासून चार पावलं दूरच रहातात.— इतकी त्यानं आपल्या नांवाची खराबी करून टाकली आहे.— उमदा माणूस, दिलदार माणूस, मर्द माणूस,—अलौकिक बुद्धिमत्ता व अलौकिक लोकसेवा. पण—काय?—दैवगति! दैवगति म्हणतात तें कांहीं खोटं नाहीं."

मास्तर निघून गेले. केशव कामाला लागला. वर्तमानपत्रांतली एखादी संक्षोभजनक हकीगत वाचून त्यावर चर्चा व्हावी व दुसऱ्या क्षणाला तें सारें विसरून जावें असेंच मास्तरांचें व केशवाचें झालें. सकाळीं काय गोष्टी झाल्या याचा दुपारीं केशवाला पत्ता नव्हता. बरोबरच आहे. कां असावा? जगांत अनेक लोकांच्या अनेक प्रकारच्या कहाण्या आहेत. म्हणून प्रत्येकाविषयीं करुणा दाखवून सारखें रडत बसायचें कीं काय?—डॉक्टर कोण? आपला त्यांचा काय संबंध? त्यांच्याजवळ विद्या आहे, आम्हांला त्या विद्येचा फायदा घ्यावासा वाटला. पैसे दिले, त्यांना आणलें, आमचें काम झालें. त्यांचेंहि काम झालें. संपलें!—बाकीच्या गोष्टींची चिंता करण्याचें कारण काय?—

—कारण कांहींच नाहीं.—तें एक फूल—कशाला ठेऊन घेतलें मी? काय कारण? कारण कांहींच नाहीं!—

गोष्टींच्या भरांत मी एक फूल ठेवून घेतल्याचें केशवाला सांगायचेंच राहिलें. आतां सांगण्याची गरजहि उरली नाहीं. आणखी थोड्याच दिवसांनीं तें फूल कोमेजून जाईल. निर्माल्य होईल. अन् मग तें फेंकूनच नाहीं का द्यायचें?—

---

— १७ —

मी आतां पुष्कळच बरी झालें होतें. घरांतल्या घरांत मला हिंडतां फिरतां येऊं लागलें होतें. रोगाचें मूळ जवळ जवळ नाहींसें झालें होतें. अशक्तता मात्र राहिली होती. व तेवढ्याच-करितां मला फारसे श्रम करण्याची मनाई होती. प्रकृति साव-काशपणें पण पूर्णपणें बरी होत होती. रोग अगदीं मुळापासून उपटून काढला जात आहे असें मला आंतून वाटत होतें. पूर्ण-पणें रोगमुक्त होण्यास फारसा काळ लागायचा नाहीं असा मला विश्वास वाटत होता. दिवाकरांचें औषध घेण्यापूर्वीं जो विश्वास वाटत होता तो केवळ काल्पनिक स्वरूपाचा होता. आतांच्या विश्वासाची उभारणी प्रत्यक्षावर झाली होती.

केशवालाहि आतां मी बरी होणार याविषयीं शंका उरली नव्हती. त्याची काळजी आतां जवळ जवळ नाहींशी झाली होती. राहिलेला अभ्यास पुरा करण्याकरतां तो आतां लव-करच मुंबईला जाणार होता. केशव जाणार हें कळतांच आईनें, तो जाण्यापूर्वीं एक सत्यनारायण करण्याचें ठरवलें, ——माझ्या बरें होण्यानिमित्त. पण या वेळच्या सत्यनारा-यणाला फारसे लोक बोलवायचे नाहींत असें आईनें ठरवलें होतें. दिवाकरांना व मास्तरांना मात्र बोलावण्याचें नक्की ठरलें होतें. आईनें दिवाकरांविषयीं पुष्कळ वेड्यावांकड्या गोष्टी ऐकल्या होत्या. पण दिवाकरांची ओळख झाल्यापासून व विशे-

षतः माझ्या प्रकृतीस आराम पडल्यापासून दिवाकरांविषयीं तिचें मत पार बदललें. तिला दिवाकर आवडूं लागले. दिवाकरांची वागण्याची रीतच अशी होती कीं, आमच्या छोटेखानी कुटुंबांतील प्रत्येक माणसास ते हवेसे वाटत. मास्तर म्हणत असत कीं, एक त्यांच्या व एक आमच्या अशा दोनच घरीं दिवाकर मोकळेपणानें वागत. इतर ठिकाणीं त्यांची वागणूक बरीच तुटकपणाची असे.

सत्यनारायणाचा बेत संध्याकाळचा होता. तात्यांनीं आपल्या अगदीं स्नेहांतल्या अशा दोनतीन गृहस्थांना आमंत्रण दिलें होतें. केशवानेंहि आपल्या एकदोन सहाध्यायी मित्रांना जेवायला बोलावलें होतें. फारशी मंडळी न बोलावण्याचें आईनें सांगितलेलें कारण फार मजेचें होतें. ती म्हणाली, "किशी जरी आतां पुष्कळ बरी झाली असली तरी फार मंडळी बोलावल्यानं गाजावाजा होईल व 'बरी झाली, बरी झाली' असं म्हणतां म्हणतांच कुणाची तरी दृष्ट लागेल तिला—" बिचारी माझी आई! माझ्या आजारानें तिचें मन इतकें होरपळून गेलें होतें कीं, वाईटाची बाधा होऊं नये म्हणून मला जगापासून अगदीं लपवून ठेवावेंसें तिला वाटे!

संध्याकाळ झाली. सत्यनारायणाचें पोथीवाचन सुरू झालें. आईनें मला मुद्दाम पोथी ऐकण्याकरितां खालीं नेलें होतें. व देवाच्या जवळ माझी बसायची सोय केली होती. ती मला

जरा शिक्षाच झाली; पण आईकरितां मी ती आनंदानें सहन करण्यास तयार झालें. केशव मधून मधून येत होता व थोडा वेळ पोथी ऐकल्यासारखें करून पुन्हां कंटाळून बाहेर जात होता. त्याचें लक्ष अर्थात् पोथीकडे नसून पोथी ऐकणाऱ्या एका श्रोत्याकडे होतें ! अन् माझें लक्ष—?

केशव मध्येंच एकदां आंत आला असतां मी त्याला खुणेनें जवळ बोलावलें व विचारलें, “ दिवाकर नाहीं का रे आले अजून ? ”

“ नाहीं. पण मला वाटतं ते येतील इतक्यांत.”

पोथी संपली. सांगितल्याप्रमाणें नारायणाला मी फुलें, अक्षता वगैरे वाहिल्या. व आईची आज्ञा होतांच डोळे मिटून देवाला नमस्कार केला. नमस्कार करीत असतां कुणी आल्याची मला चाहूल ऐकूं आली. वळून पहातें तों दिवाकर दारांत उभे होते.

“ चैन आहे बुवा देवाची ! ”

“ कां, देवाचा हेवासा वाटतो ? देव व्हावंसं वाटतं कीं काय तुम्हांला ? ”

“ तसं वाटणं न वाटणं भक्तावर अवलंबून आहे. देव होतांच जर टाळकुट्यांचा व बंभोलानाथांचा माझ्याभोंवतीं गराडा पडेल तर मला देवाच्याऐवजीं राक्षस व्हावंसं वाटेल व त्या सर्वांना खाऊन टाकावंसं वाटेल. मला वाटतं, पूर्वीं देव असेल-

सुद्धां एखाद वेळीं. पण भक्तिबंबाळ लोकांच्या वेडेचारांनीं देवाचासुद्धां नुसता दगड बनला !"

सत्यनारायण नुकताच संपला असल्यामुळें भोंवतालीं गोंधळ होता म्हणून बरें. नाहीं तर दिवाकरांच्या बेताल बोलण्यानेंच गोंधळ उडाला असता. मी त्यांना हळूच विचारलें,

"मी भक्त व्हायला तयार असलें तर व्हाल तुम्ही देव?"

दिवाकर जरा चपापलेच! मी इतका सरळ सवाल टाकीन असें त्यांना स्वप्नांतसुद्धां वाटलें नसेल.

गोंधळाचा त्रास होऊं नये म्हणून मला वर माझ्या खोलींत नेण्यांत आलें. तात्या, मास्तर, केशव व दिवाकर एवढी मंडळी खोलींत होती. तात्या म्हणाले, "डॉक्टर, केवळ तुमच्यामुळं हा आनंदाचा प्रसंग आम्हाला साजरा करतां येत आहे."

"माझ्यामुळं कसला हो? खरं सांगायचं म्हणजे रोग्यानंच रोगाच्या तावडींतून सुटण्याचा ठाम निश्चय केला होता. म्हणूनच मला कांहीं तरी करतां आलं."

"बाकी तुमच्याहि म्हणण्यांत थोडंसं तथ्य आहे. आम्ही सारे हताश झालों असतांना ही आपली सारखी म्हणतच असे कीं, 'छे हो, मी मरणं शक्यच नाहीं. कांहीं तरी होईल व मी साफ बरी होईन.' आणि अखेरीस तिचंच म्हणणं खरं ठरलं."

दिवाकरांनीं प्रशंसेचा मारा शिताफीनें आपल्यावरचा चुकवून माझ्याकडे वळवला. तरी पण अखेरीस सारा मारा त्यांनाच

सहन करावा लागला. कारण तात्यांनीं, मास्तरांनीं व केशवानें तऱ्हतऱ्हेनें दिवाकरांची प्रशंसा करण्यास सुरुवात केली. अखेरीस मंडळींचा आदरसत्कार करण्याकरितां तात्या निघून गेले. मास्तरहि तात्यांच्या पाठोपाठ गेले. थोड्या वेळानें केशवाचे मित्र आल्याची वर्दी येतांच केशवहि बाहेर गेला. खोलींत आम्ही दोघेंच उरलों.

जरा वेळ कुणीच कुणाशीं बोललें नाहीं. ती शान्तता जाचक होऊं लागतांच मी बोलायला सुरुवात केली,

" फुलं परत पाठवल्यामुळं तुम्हांला फार वाईट वाटलं का ? "

" परत पाठवाल एवढ्या एकाच आशेवर जर तीं पाठवलीं होतीं तर वाईट वाटण्याचं काय कारण ? "

" मला तत्त्वज्ञान नको आहे. कारण नसेल कांहीं. पण खरोखर वाईट वाटलं का नाहीं तें मला हवं आहे."

" नाहीं. "

" खोटं. "

" बरं, फार वाईट वाटलं ! "

" चला, तुम्हांला आपली थट्टाच सुचते सदान् कदा. मी कांहीं थट्टेनं विचारीत नाहीं. अगदीं खरंखरं काय तें मनापासून सांगा."

" खरं बोलायची संवय केव्हांपासूनच तुटली आहे."

" केव्हांपासून ? "

" त्याची आठवणसुद्धां बुजली आहे. इतका मी त्या संवयीच्या पार गेलों आहें."

" खरं बोलायला संवय लागते असं नाहीं मला वाटत."

" मग काय लागतं ?"

" नुसती इच्छा पाहिजे."

" तुम्ही फार वस्ताद आहांत. आजपर्यंत मला अशी घमेंड होती कीं, माझ्यासारखा वस्ताद दुसरा कुणीच नाहीं. पण तुमच्यापुढं मला हात टेकावे लागतात."

" स्तुतीमुळं मूळ मुद्दा विसरण्याइतकी मी भोळी नाहीं."

" तेंच तर मी तुम्हांला सांगतों आहें."

" मग सांगा काय वाटलं तें ?"

जरा वेळ थांबून ते म्हणाले, " पहिल्यानं थोडंसं वाईट वाटलं. पण मग तुम्ही केलं तेंच बरोबर केलं असं मला वाटूं लागलं."

" तें कसं ?"

" तें मला सांगतां येणं शक्य नाहीं."

जरा वेळानें मी पुन्हां सुरुवात केली,

" मी तुम्हांला एक गोष्ट सांगूं का ? मी माझा निश्चय आतां बदलला आहे."

" कसला निश्चय ?"

" तुमच्या बागेंत जाण्यासंबंधीं. तुम्ही नाहीं म्हटलं तरी-सुद्धां मी तुमची बाग पहायला येणार."

" तुमचा विचार अगदींच वेडगळपणाचा आहे."

" नुसती बाग पहाण्याची साधी व निरुपद्रवी इच्छा दर्शविण्यांत वेडगळपणा कसा काय होतो हें कळणं कठीण आहे."

" बाग पहाण्याची ज्यांना एवढी हौस आहे त्यांनीं सार्वजनिक बागा खुशाल पहाव्या."

" सार्वजनिक बागा मला मुळींच आवडत नाहींत. त्या पहायला जाण्याचा मला तिटकारा आहे."

" सार्वजनिक बागा न आवडणाऱ्या लोकांना वाटेल त्याच्या बागेंत जाण्याची मुभा असते कीं काय ?"

" वाटेल त्याच्या बागेंत जाण्याची माझी मुळींच इच्छा नाहीं. मी फक्त तुमच्याच बागेंत जाणार आहें."

" पण माझी बाग पहाण्याविषयीं तुमचा एवढा अट्टाहास कां ?"

" तुमच्या बागेंत फार सुंदर व सुवासिक फुलं आहेत म्हणून."

" सुवासिक फुलांच्या शेजारीं साप असतात."

" तुमच्यासारखा धन्वंतरी जवळ असल्यावर सापाच्या विषाला भिण्याचं कांहींच कारण नाहीं."

" तुम्ही फार भयंकर आहांत. सापापेक्षांहि भयंकर आहांत."

"मी अशी असेन तर मग मला तुमच्या बागेंत येण्यास कांहींच अडचण नाहीं. सापापेक्षां मी खरोखरच जास्त भयं-कर असेन तर माझ्या येण्यापासून तुमचा फायदाच होईल. मला पाहून तुमच्या बागेंतले सारे विषारी साप पार पळून जातील. व तुम्हांलाहि त्यांच्या विषाची बाधा होण्याचा संभव रहाणार नाहीं."

"छे, छे, छे; तुम्ही अगदीं कमालीच्या वस्ताद आहांत. तुमच्याशीं असं आडून बोलण्यांत कांहींच अर्थ नाहीं. तुम्हांला आतां मी स्पष्टच सांगतों कीं, मी फार वाईट माणूस आहें. कोणत्याहि कुलीन स्त्रीनं माझ्या बागेंत पाऊल टाकण्याइतकं पावित्र्य माझ्यांत उरलेलं नाहीं."

"तुमच्या वाईटपणामुळं किंवा अपवित्रतेमुळं आपण वाईट होऊं, अपवित्र होऊं अशी ज्याला भीति वाटत असेल त्यानं तुमच्या बागेंत पाऊल टाकणं अत्यंत धोक्याचं आहे हें मला कबूल आहे. पण ज्यांना तशी भीति वाटत नाहीं त्यांना तुमच्या बागेंत जायला कांहींच हरकत नाहीं."

दिवाकर गोंधळून गेल्यासारखे दिसले. त्यांच्या कपाळाला दोन उभ्या आंठ्या पडल्या. त्यांच्या भुंवया आवळल्या गेल्या. त्यांचे डोळे अकुंचित झाले. व एक हात कपाळावरील व्यव-स्थित बसवलेले केंस अस्ताव्यस्त करण्यांत गुंतून गेला. थोड्या वेळानें ते म्हणाले,

" माझ्या भयंकर व्यसनांची, माझ्या पापी पाशवी वृत्तीची तुम्हांला मुळींच भीति वाटत नाहीं ?"

" मुळींच नाहीं."

दिवाकर अधिकच गोंधळून गेल्यासारखे दिसले. त्यांनीं डोळे मिटले. मान खालीं घातली. दोन्ही हातांच्या बोटांनीं ते केंस घट्ट आवळूं लागले. मला वाटतें, त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहूं लागले.—मीहि पार गोंधळून गेलें. ही स्थिति आणखी कांहीं वेळ टिकली असती तर काय झालें असतें तें सांगवत नाहीं. पण फार फार तर मिनिट अर्धा मिनिटच दिवाकर त्या स्थितींत होते. आणि मग एकदम ताड्कन् उठून ते खोलीबाहेर निघून गेले.

---

## — १८ —

जेवण होऊन मंडळी आपापल्या घरीं निघून गेली. दिवाकर माझा निरोप न घेतांच घरीं निघून गेले.

त्या रात्रीं मला झोंपच येईना. केशव किती तरी वेळ माझ्याजवळ बसला होता. कांहीं तरी बोलत होता. पण त्याच्या बोलण्याकडे माझें लक्षच नव्हतें. मी कांहींतरीच उत्तरें देतें आहे हें जेव्हां त्याच्या ध्यानांत आलें तेव्हां तो म्हणाला,

" आज तुला झालं आहे तरी काय ? झोंप का येते आहे तुला ? "

केशव पहिला प्रश्नच विचारून थांबला असता तर माझी कोण त्रेधा उडाली असती ! झोंपेचें कारण त्यानेंच सुचवलें. मला तें पटलें. मी त्याला तेंच कारण सांगितलें.

" मग असं सांगितलं कां नाहींस मला ? आज तुला बराच त्रास झालेला दिसतो. नीज स्वस्थ आतां. रात्रहि बरीच झाली आहे."

खोलींतील दिवा मंदच होता. माझ्या चेहऱ्यावर बराच अंधार होता. मी डोळे मिटून स्वस्थ पडलें होतें. केशवाला माझा चेहरा नीटसा दिसत नव्हता म्हणून म्हणा किंवा आपल्याच तारेंत तो पूर्ण मग्न होता म्हणून म्हणा, माझ्या मनःस्थितीची त्याला मुळींच जाणीव झाली नाहीं.—केशवा, जाणतेपणीं तूं चांगला असतोसच, पण अजाणतेपणींसुद्धां तुझ्या हातून जी कृति घडते ती किती चांगली घडते !—बिचारा केशव—माझा गरीब बिचारा केशव !—

— १९ —

आज केशव मुंबईला जाणार होता. मला सोडून जायचें त्याच्या अगदीं जिवावर आलें होतें. जाण्याची वेळ जसजशी जवळ येत चालली तसतसा त्याचा चेहरा अधिकाधिकच खिन्न दिसूं लागला. त्याची खिन्नता कमी व्हावी म्हणून मी बोलायला सुरुवात केली,

" किती वेळ आहे रे तुला अजून जायला ?"

हातावरील घड्याळाकडे पाहून केशव म्हणाला, " एक तास." केशव पुन्हां गप्प बसला.

" केशव, मला तुझा हेवा वाटतो."

" कां ?"

" तूं एकटा एकटा मुंबईला जाऊन Specialist होऊन येणार अन् आम्ही मात्र इथं आढ्याकडे पहात दिवस काढणार. केव्हां एकदांचा हा आजार कायमचा संपतो अन् केव्हां मुंबईला जाऊन डॉक्टर होऊन येतें असं मला झालं आहे."

" माझा हेवा वाटण्याचं कांहींच कारण नाहीं. मला आतां शिक्षणाचा वीट आला आहे. अर्धवट काम सोडूं नये म्हणून मी नाइलाजानं जात आहें. नाहीं तर, खरं विचारशील तर मुंबईचा नाद सोडून इथंच प्रॅक्टिस सुरू करण्याचा मोह मला अनावर होतो आहे."

" असं वेड्यासारखं मात्र कांहीं करूं नकोस. तुला Specialist होऊन आलंच पाहिजे. हल्लींच्या चढाओढीच्या काळांत नुसत्या साध्या डॉक्टरला कोण विचारतो ? "

" तें खरं. पण मनाला धीर पाहिजे ना तेवढा ? "

" एवढं अधीर व्हायला काय झालं आहे ? "

" तें तुला सांगायला का पाहिजे ? "

—केशवाची अधीर वृत्ति अन् माझी उदास वृत्ति !—दोन ध्रुवाचीं टोंकें—थोड्याच दिवसांत त्यांची जुळणी व्हायचें ठरलें होतें—कसलीशी असह्य वेदना विजेच्या धक्क्यासारखी हृदय भेदून गेली !—

" केशव, एक ऐकशील का माझं ? "

" काय ? "

" मी डॉक्टर होईपर्यंत आपण लग्न नाहीं करायचं. " केशवाची त्या वेळची केविलवाणी मुद्रा मला अजूनहि आठवते.

— २० —

केशव मुंबईला गेला. माझे दिवस पूर्वीपेक्षांहि अधिक उदासवाणे जाऊं लागले. अलीकडे तात्यांना कचेरीचें काम फार असल्यामुळें ते अगदीं अंधार झाल्यावर कचेरींतून परत येत. व कामामुळें फार थकून गेल्यामुळें जेवण होतांच लवकर झोंपीं जात. पूर्वींसारख्या गप्पागोष्टी करायला त्यांना फुरसतच मिळेनाशी झाली होती. आईचा आपला आंखलेला कार्यक्रम तसाच चालला होता. सकाळीं स्वयंपाक व इतर घरकाम, दुपारीं थोडें पोथीपुराणाचें वाचन व वामकुक्षी, तिसऱ्या प्रहरीं शेजारणींच्या भेटीगांठी व देवदर्शन आणि संध्याकाळीं पुन्हां स्वयंपाक वगैरे.——घरांत मीच काय ती एकटी रिकामी होतें. तसा मला आतां आजाराचा त्रास उरला नव्हता; पण जास्त श्रम केले कीं थकवा येई. त्यामुळें दिवसांतला बराचसा वेळ नुसतें पडून रहावें लागे. नाहीं म्हणायला एक उद्योग होता माझ्या पाठीमागें. केशवाचीं एकदोन दिवसाआड नियमानें पत्रें येत. तीं वाचायचीं व उत्तरें लिहावयाचीं. पण अलीकडे पत्र लिहिण्याचाहि मला कंटाळा येऊं लागला होता. माझीं पत्रें अगदीं लहानलहान होऊं लागलीं, व कधीं कधीं उत्तर लिहिण्यास उशीरहि होऊं लागला. एखाद् वेळीं केशवाचीं न चुकतां येणारीं लांबलचक पत्रें पाहून माझी मलाच लाज वाटूं लागे. पण या अपराधाबद्दल केशव माझ्यावर कधींच रागावला

नाहीं. त्याला वाटे, मी फार अशक्त आहें व लांब पत्रें लिहिण्यानें मला त्रास होतो. त्याचा हा गैरसमज दूर करण्याचें धैर्य मला होईना. शक्ति असूनहि मी लहान व त्रोटक पत्रें लिहितें असें जर केशवाला कळलें असतें तर त्याला फार वाईट वाटलें असतें. केशवाचें मन दुखविण्याचें माझ्या जिवावर येई. म्हणून मी या बाबतींत फारसें कांहींच लिहीत नसें. पण मधून मधून मला वाटे, केशव माझ्यावर रागवेल तर बरें होईल. व तो रागवावा म्हणून मी त्याला एकदां लिहिलें, 'तूं मला इतकीं मोठीं व प्रेमळ पत्रें नियमितपणानें पाठवतोस व मी मात्र अगदीं लहान व त्रोटक उत्तरें तुला पाठवतें. या अक्षम्य अपराधाबद्दल जर तूं माझ्यावर रागावणार नाहींस तर माझा आळस व बेफिकिरी हीं अधिकच वाढतील. व पुढें कदाचित् हे दुर्गुण इतके बळावतील कीं, ते तुझ्या रागवण्यानंहि नाहींसे होणार नाहींत.—'

यावर केशवानें उत्तर लिहिलें, 'मला तुझ्यावर रागावतांच येत नाहीं. तूं इतकी अशक्त असतांनाहि मला पत्र पाठवतेस यांतच मला समाधान वाटतं. शिवाय, आळस व बेफिकिरी हे सध्यांच्या परिस्थितींत दुर्गुण नसून सद्गुणच आहेत. तुझा आजार समूळ नाहींसा करण्यास तेच कारणीभूत होतील. आणि तुझी शक्तीहि झपाट्यानं वाढेल.——'

——केशव, इतका का रे तूं चांगला आहेस! केशव, तूं थोडासा वाईट कां नाहीं रे झालास?——काय वेडी आहें मी?——

---

— २१ —

मधून मधून मास्तर माझ्या भेटीला येत व इकडच्या तिकडच्या गमतीच्या गोष्टी सांगत. त्यामुळें माझी फार करमणूक होत असे. कधीं कधीं ते डॉक्टर दिवाकरांच्याहि गोष्टी सांगत. डॉक्टर माझ्याकडे बरेच दिवसांत आले नाहींत हें ऐकून मास्तरांना फार आश्चर्य वाटलें. ते म्हणाले,

“ किती दिवस झाले डॉक्टर नाहीं आले इथं ? ”

“ सत्यनारायणाच्या दिवसापासून.”

“ काय विचित्र माणूस आहे हा ! बरं, औषध तरी चालू आहे कीं नाहीं ? ”

“ औषध चालू आहे. पण आतां औषध दवाखान्यांतून आणावं लागत नाहीं. त्यांनीं लिहून दिलेलीं औषधं केमिस्टकडून आणतात तात्या.”

“ अस्सं. म्हणूनच स्वारी फिरकली नाहीं इकडे. तरी पण चारआठ दिवसांतून त्याची एखादी फेरी व्हायला पाहिजे होती.—लहरी माणूस आहे झालं. मी एखादे दिवशीं त्याला घेऊनच येईन इथं.”

“ केव्हां घेऊन याल ? ”

“ त्याला काय, केव्हांहि. उद्यांच आणीन पाहिजे तर.”

“ या, अवश्य घेऊन या.”

माझा अधिरेपणा दिसूं न देण्याचा माझा प्रयत्न यशस्वी रीतीनें पार पडला. दिवाकरांचें कोडें मला अजून उलगडलें नव्हतें. व म्हणून मास्तर गेल्या क्षणापासून त्यांच्या येण्याची मी उत्सुकतेनें वाट पाहूं लागलें.

एक दिवस गेला; दुसरा गेला; तिसरा गेला. मास्तरांचा पत्ता नाहीं. मी मास्तरांच्यावर अगदीं खूप चिडलें होतें. अखेरीस चवथ्या दिवशीं मास्तर आले.

" वा मास्तर, खूप केलीत. चांगले आलांत कीं दुसऱ्या दिवशीं ! "

" अग, काय करूं मी ? तूं इकडे माझी वाट पाहून दमलीस व तिकडे मी त्याची वाट पाहून दमलों ! असा विचित्र माणूस उभ्या आयुष्यांत मी पाहिला नाहीं. त्या दिवशीं इथून निघालों तो थेट त्याच्या दवाखान्यांत गेलों, व बोलतां बोलतां इकडे येण्याविषयीं विचारलं. स्वारी अगदीं तावडतोब कबूल झाली. ' संध्याकाळीं तुमच्या घरीं मोटार घेऊन येतों ' म्हणून सांगितलं.---मी वाट पहात बसलों. पण स्वारीचा पत्ता नाहीं. दुसऱ्या दिवशीं पुन्हां गेलों त्याच्या दवाखान्यांत. म्हणाला कीं, ' वेळेवर कांहीं काम निघाल्यामुळं येतां आलं नाहीं. उद्यां संध्याकाळीं अवश्य येईन. '---दुसऱ्या दिवशीं तोच प्रकार ! तिसऱ्या दिवशीं पुन्हां त्याच्याकडे गेलों. मला पहातांच स्वारी

मोठ्यानं खदखदा हंसली. मी शिव्या देण्यास सुरुवात करणार तोंच मला थांबवून तो म्हणाला,

" 'मास्तर, व्यर्थ! व्यर्थ तुमचे काळ्याचे पांढरे झाले. अहो, मी येतों म्हणतों अन् तुम्ही विश्वास ठेवून वाट पहातां याचं मला मोठं आश्चर्य वाटतं. सर्वच आश्वासनं पुरीं करायचं मी मनांत आणलं व पुरीं न झालीं तर वाईट वाटून घ्यायचं ठरवलं तर मला या क्षणालाच आत्महत्या करावी लागेल.—हें पहा मास्तर, तुम्ही असे व्याज वसूल करणाऱ्या पठाणासारखे माझ्या बोकांडीं बसूं नका. मी एकदां येईन म्हटलं तर केव्हां तरी खास येईन. मी संध्याकाळीं येईन म्हणतांच तुम्ही आपले गंभीरपणानं, बाकीचीं सारीं कामं बाजूला सारून माझ्या वाटेकडे डोळे टवकारून बसलेले मला दिसतांच मी अगदीं भिऊन पळून जाईन—तुमच्या घरापर्यंत आलों असलों तरी.—माझ्यावर गंभीरपणं विश्वास ठेवणाऱ्या लोकांची मला मोठी भीति वाटते.—इतके दिवस माझी ओळख असून माझ्या थापेबाजपणाची तुम्हांला ओळख पटूं नये याला आतां काय म्हणावं?—' झालं. शेवटीं मीच गाढव ठरलों. व काल संध्याकाळीं अखेरची वाट पाहून आज तुझ्याकडे येत आहें.—"

मी अगदीं गप्पच बसलें. थोड्या वेळानें मी मास्तरांना विचारलें,

" मास्तर, डॉक्टर इकडे येण्याचं मुद्दाम टाळतात असं तर नाहीं ना तुम्हांला वाटत ? "

" नाहीं. तसंच कांहीं म्हणतां यायचं नाहीं.—पण--" मास्तर जरा अडखळत बोलूं लागले.

" पण काय ? "

" जाऊं दे. तुम्हां पोरीबाळींना या गोष्टी सांगण्यांत कांहीं अर्थ नाहीं. "

" वा वा, मी आतां लहान का आहें ? अहो माझा पहिला नवरा जिवंत असता तर चांगली चार पांच लेंकरांची माय झालें असतें मी ! "

" अग, अग—काय हें भलतंच बोलावं ! "

" भलतं काय झालं त्यांत ? खरं तेंच बोलतें. "

" छे, भलतंच कांहीं तरी. खरं असलं म्हणून तें बोलावं कीं काय ?—शिक्षणानं मुली बिघडतात हेंच खरं ! "

" खोटं खोटं बोलायच्याऐवजीं खरं खरं बोलूं लागतात, हाच ना बिघडण्याचा अर्थ ? "

" अग, तसं नव्हे. पण देवाब्राह्मणांसमोर, अग्निनारायणासमोर ज्यांच्याशीं तुझ्या जन्माच्या गांठी जुळल्या गेल्या त्यांच्याविषयीं असं थिल्लरपणानं बोलणं चांगलं का ? "

" कसले देवब्राह्मण अन् अग्निनारायण घेऊन बसलांत मास्तर ! चारचौघं नकळत कांहीं तरी करूं लागतात; धूर्त

लोक त्यालाच गंभीर नांवं देतात; आपलीं वडील माणसं त्याचं अंध अनुकरण करतात अन् बायकांचं भवितव्य उभारलं जातं.—— लग्नापूर्वीची मी, लग्नानंतरची मी, वैधव्यांतली मी अन् आतांची मी——याच्यांत नाममहिम्यानं गजबजलेल्या जगांत केवढीं मोठीं स्थित्यंतरं घडून आलीं! मला मात्र एकाहि स्थित्यंतराचा अर्थ कळला नाहीं. माझं लग्न कां केलं? लग्नानंतर मला सासरीं कां पाठवलं? पति निवर्तल्यानंतर माझं कुंकू कां पुसून टाकलं?—— याचा मला अजूनहि उलगडा होत नाहीं.——देव डोळे झांकून ठेवतो, ब्राह्मण 'सु सूव्यो' करतो अन् आम्ही संसाराच्या अग्निकुंडांत उडी घेतों.—असा आंधळी कोशिंबिरीचा खेळ आहे!—"

"पूर्वीं जें झालं तें झालं. पण आतां लवकरच होऊं घातलेल्या नव्या गांठीचा तरी अर्थ कळतो ना तुला? ही तर नाहीं ना आंधळी कोशिंबीर?"

"कुणी सांगावं?"

"म्हणजे?"

"खरं सांगूं का मास्तर तुम्हांला? मला याचाहि अर्थ पुरतेपणीं कळत नाहीं."

मास्तरांच्या चेहऱ्यावर आश्चर्य स्पष्टपणें दिसत होतें.

"छे छे छे!—तुम्ही नव्या पिढींतील पोरं म्हणजे सैतानाची संतति आहांत. संशयपिशाच्चानं तुम्हांला घेरून टाकलं

आहे. तुम्ही कुठं जाल अन् काय कराल कांहीं सांगवत नाहीं. मानवी बुद्धि कोती म्हणूनच देवाची अन् धर्माची आवश्यकता आहे. पण तुम्हांला हें कुठून पटणार म्हणा. संशयसागरांत गटंगळ्या खाण्यांतच तुम्हांला मौज वाटते. कुसाताई, संभाळून रहा बरं! नाहीं तर भलतीकडेच वहावत जाशिल. आमच्या-सारखे साधेभोळे लोक जुन्यापुराण्या देवाधर्मांच्या ओंडक्यांचा आश्रय घेऊन संसारसागर कसाबसा तरून जातात. आश्रया-विना या अफाट सागरांत तरणोपाय नाहीं. स्वतःच हातपाय हालवून तरून जाऊं म्हटलं तर शक्यच नाहीं. कारण हाता-पायांचं बळ परिमित आहे. ते केव्हां ना केव्हां तरी थकतीलच. आणि मग जीव गटंगळ्या खाऊं लागेल. एकदां गटंगळी खाल्ली कीं मग रसातळाला जायला कितीसा उशीर लागणार!—दिवाकराचेंच पहा ना. ना देव, ना धर्म. मन मानेल तसं वागा-यचं. अन् अशानंच त्यानं आपल्या सोन्यासारख्या संसाराचा सत्यानाश करून टाकला. आतां त्याच्या आयुष्याला कांहीं ताळतंत्र उरला आहे का? अलीकडे तर त्यानं कहर मांडला आहे."

"म्हणजे? ते करतात तरी काय?"

"जाऊं दे ग. आपल्याला काय करायचं आहे म्हणा त्याच्याशीं?"

"असं काय हो करतां? सांगत कां नाहीं नीट?"

" तुझ्यासारख्या पोरीबाळींनीं अशा गोष्टी ऐकूं नयेत."

" पुन्हां आलांत का पूर्वपदावर ? देऊं का मघांचं उत्तर ? --अहो, तुम्ही जर जगांतल्या वाईट गोष्टी आमच्यापासून लपवून ठेवल्या तर आम्हांला जगाचं खरं स्वरूप कळणार तरी कसं ? अन् वाइटापासून आम्ही आपला बचाव तरी कसा करूं शकणार ? "

" तुझा एवढा आग्रहच आहे तर सांगतों. दिवाकर दारू खूप पितो हें मला नुसतं ऐकून माहीत होतं. त्याला प्रत्यक्ष दारू पितांना मी कधींच पाहिलं नव्हतं. पण अलीकडे त्याचं व्यसन विकोपाला जात आहेसं दिसतं. पूर्वीं त्यानं मनाची लाज सोडली होती तरी जनाची कायम ठेवली होती. पण आतांशा जनाचीहि लाज त्यानं सोडली आहे. आतां दवाखान्यांतसुद्धां अगदीं समोरच्या टेबलावर एक बाटली व दारूनं अखंड भरलेला पेला असा देखावा दिसतो."

" मास्तर, दिवाकरांवर तुमचा एवढा लोभ असूनसुद्धां तुम्ही त्यांना या बाबतींत कांहींच का सांगत नाहीं ? "

" तो ऐकतो आहे माझ्या काकाचं ! तो उलट मलाच चार ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगेल. व मी त्याच्याबरोबर पीत नाहीं म्हणून मलाच वेड्यांत काढील.--ती वळी कांहीं साधारणपैकीं नाहीं. त्याला सन्मार्गावर आणण्याकरतां मी माझे प्राणसुद्धां खर्चीं घालीन. त्याचा माझ्यावर उपकारच तसा

आहे. शिवाय मुळांत तो अत्यंत सुशील, सद्गुणी व उदार अंतःकरणाचा आहे अशी माझी पक्की खात्री आहे. पण पाश्चात्य सुधारणेच्या पायीं त्यानं आपल्या जीविताची नासाडी करून टाकली."

"हा अलीकडचा दवाखान्यांतला राजरोस प्रकार केव्हां-पासून सुरू झाला?"

"तें कांहीं मला नक्की सांगतां येणार नाहीं."

थोडा वेळ गप्प बसून मी विचारलें,

"आपल्या घरीं सत्यनारायण झाला त्यापूर्वीं दिसत होता का हा प्रकार?"

"नाहीं. त्यापूर्वीं कधींच दिसला नाहीं. केशवरावां-बरोबर मी पुष्कळदां दवाखान्यांत जात असें. पण मला हा आजकालचा प्रकार कधींच दिसला नाहीं."

थोड्या वेळानें मास्तर निघून गेले.—मी विचारांत मग्न झालें.—सत्यनारायणापूर्वीं व्यसन विकोपास गेलें नव्हतें. सत्य-नारायणानंतर व्यसन विकोपास गेलें.—सत्यनारायणाचा त्याच्याशीं कांहीं संबंध असेल का?—या विकोपाच्या मुळाशीं त्या दिवसाचा संवाद तर नसेल ना?—माझा विचार थांबला.—मी मुद्दाम थांबवला. विचारांचा अनिरुद्ध प्रवाह मनाला ज्या अवस्थेंत नेऊन सोडी त्या अवस्थेंत क्षणभरहि रहाण्याची माझ्या मनाची तयारी नव्हती.—

— २२ —

माझी शक्ति आतां बरीच वाढली होती. मी बरी दिसतें असें तात्या व आईसुद्धां म्हणूं लागलीं. माझ्या मनांत एकदां वजन करून पहावें असें होतें. एके दिवशीं मास्तर आले असतां मी सहज गोष्ट काढली. ते म्हणाले, "त्यांत काय आहे ? वजनच करायचं ना ? चला आपण दिवाकराच्या दवाखान्यांत जाऊं."

लगेच आम्ही निघालों. दवाखान्यांत पोहोंचलों. दिवाकर समोरच बसले होते. आम्हांला पहातांच त्यांनीं आपला एक नोकर सामोरा पाठवला. तो आम्हांला बाजूच्या खोलींत घेऊन गेला. मास्तर दिवाकरांना आणण्याकरितां गेले. दिवाकरांच्या दवाखान्यांत मी आज पहिल्यांदाच आलें होतें. व त्यामुळेंच कीं काय मी जराशी गोंधळल्यासारखी झालें होतें. मास्तर थोड्याच वेळांत आले. 'आतां येताहेत दिवाकर' असें म्हणून ते इतर गोष्टी बोलूं लागले. थोड्याच वेळांत एका माणसानें वजन करण्याचें यंत्र आणलें. मी वजन केलें. अगदीं पूर्वीइतकें जरी नाहीं तरी मुंबईला होतें त्यापेक्षां पुष्कळच वाढलें होतें. मला मोठें समाधान वाटलें.

आम्ही बराच वेळ वाट पाहिली. पण दिवाकर येण्याचें कांहींच चिन्ह दिसेना. अखेरीस मास्तर पुन्हां एकदां तिकडे गेले व लगेच परत येऊन म्हणतात, "अग, दिवाकर कुठं

कामाला बाहेर गेले. काय विचित्र माणूस आहे ! ‘ आत्तां येतों ’ म्हणाला, अन् न सांगतांच गेला आपला निघून ! चला आतां जाऊं आपण. केव्हां परत येणार तेंहि इथं कुणाला सांगून गेला नाहीं. काय अजब प्राणी आहे ! ”

आम्ही परत घरीं आलों. मास्तर आपल्या घरीं निघून गेले.—दिवाकर मला भेटण्याचें मुद्दाम टाळतात अशी माझी आतां पक्की खात्री झाली.——

दुसऱ्या दिवशीं मास्तर येऊन सांगूं लागले, “ ऐकली का गंमत ? काल मी इथून गेलों अन् घरीं जाऊन पहातों तों दिवाकराची मोटार दारासमोर उभी. स्वारी आंत जाऊन आमच्या श्रीमतीशीं गप्पा ठोकीत होती. मला पहातांच म्हणतो, ‘ वा मास्तर, तुम्ही आलांत काय अन् गेलांत काय ! मला एका जरूरीच्या कामाची मधेंच आठवण झाल्यामुळं मी जरा बाहेर गेलों अन् पांचच मिनिटांत परत आलों. पहातों तों तुम्ही आपले निघून गेलां होतात.’ मी त्याला खूप शिव्या दिल्या. ——बरं, तें असो. तो म्हणतो, कीं तुला आतां फिरायला वगैरे जायला कांहींच हरकत नाहीं. पहिल्यानं सावकाश व जाववेल तितकं जावं, आणि मग हळुहळू वाढवावं. संध्याकाळपेक्षां सकाळीं गेलेलं उत्तम ! म्हणजे धुळीचा त्रास होणार नाहीं.”

कसें जायचें, कुणाबरोबर जायचें असा प्रश्न निघतांच मास्तर

म्हणाले, " मी येईन कीं रोज सकाळीं. त्यांत काय आहे मोठंसं ! "

आमचा बेत नक्की झाला. मी रोज सकाळीं नियमानें फिरावयास जाऊं लागलें. व त्यामुळें खरोखरच मला जास्त बरें वाटूं लागलें. इतके दिवस कोंडली गेल्यामुळें बाहेरच्या जगाला मी पारखी झालें होतें. पहिल्यानें बाहेर पडलें तेव्हां सारी सृष्टि जणुं मी नव्यानेंच पहात आहें असें मला वाटलें.—सृष्टीकडे पहाण्याची नवीन दृष्टि आली होती कीं काय न कळे !—

---

## — २३ —

आम्ही आतां बरेंच लांब लांब फिरायला जाऊं लागलों होतों. एके दिवशीं गांवाबाहेरील एका निवान्त रस्त्यानें जात असतां थोड्या अंतरावर मला एक टुमदार बंगला दिसला. त्याच्या सभोंवतीं सुंदर बागहि होती.

" मास्तर, कुणाचा हो तो बंगला ? "

मास्तर वळून पाहूं लागले. " अरे, तो तर दिवाकराचा बंगला. चलतेस कां, आपण त्यांच्या बागेंतलीं थोडीशीं फुलं तोडूं. मला पूजेकरतां फुलं अनायासंच मिळतील."

मास्तरांनींच सुचवल्यावर मी थोडीच नाहीं म्हणणार होतें ?

बंगला जसजसा जवळ येत चालला तसतशी माझ्या मनांत कालवाकालव सुरू झाली. मला तिचें स्वरूप वर्णन करतां येणें शक्य नाहीं.––

आम्ही बागेंत शिरलों.—मला सत्यनारायणाच्या दिवशींची आठवण झाली.—

बाग इतकी सुंदर होती, फुलें इतकीं मोहक अन् मनोरम होतीं कीं मी आनंदानें वेडी होईन कीं काय अशी मला भीति वाटूं लागली. माझी आनंदी वृत्ति ताब्यांत ठेवणें मला किती जड जात होतें!––

वृत्तीच्या उत्कटतेला आळा घालण्यास शब्द फार उपयोगी पडतात. म्हणूनच मला वाटतें मी बोलण्यास सुरुवात केली,

"मास्तर, आपण फुलं तोडून परत जाऊं. दिवाकर एवढ्या पहांटेस उठलेसुद्धां नसतील."

"मी पाहून येऊं का उठला आहे कीं नाहीं तें?"

"कशाला उगीच? आपण आपलीं फुलं तोडूं अन् परत जाऊं. दिवाकरांना भेटलं तर आपल्याला परत जायला उशीर नाहीं का होणार?"

"हो, तें खरं. पण तूं इथंच थांब. मी आत्तां पाहून येतों स्वारी उठली आहे कीं नाहीं तें. इथं येऊन भेटलों नाहीं तर तो माझा सूड घेईल."

मास्तर बंगल्याकडे निघून गेले. नुसतें उभें रहाण्यापेक्षां फुलें तोडावीं अशी कल्पना आल्यामुळें मी बागेंत इकडे तिकडे हिंडूं लागलें. एका वळणावरून जात असतां जरा अंतरावर एक गुलाबाचें फारच मोहक रंगाचें फूल दिसलें. तें तोडण्याकरितां मी घाईघाईनें चालूं लागलें. मला वाटतें आनंदातिशयामुळें मी पळतच गेलें त्या फुलाकडे. फूल तोडीत असतां मला पावलांची चाहूल ऐकूं आली. मी वळून पहातें तों दिवाकर—!

मी अगदीं स्तंभितच झालें.—पण मला वाटतें माझ्या-पेक्षां दिवाकरच जास्त गोंधळल्यासारखे दिसत होते. आपल्या डोळ्यांवर विश्वास ठेवावा कीं नाहीं असा त्यांना प्रश्न पड-लेला असावा.—

" तुम्ही इथं कशा ? "

" फुलांची चोरी करण्याकरतां.—काय त्रासदायक आहे हें फूल ! तुटतच नाहीं." लांब देंठ ठेवून फूल तोडण्याचा मी प्रयत्न करीत होतें. त्यामुळें तें लवकर तुटेच ना.

" थांबा, मी तोडून देतों. " दिवाकर पुढें सरसावून म्हणाले. पण मला कुठलें तें पटायला ? मी तें फूल तोड-ण्याचा एक जोराचा प्रयत्न केला. त्यासरशीं एक कांटा असा टचूकन् माझ्या अंगठ्याला बोंचला ! " अयाई " असें किंचाळून मी तें देंठ सोडून दिलें. माझ्या अंगठ्यांतून रक्ताचे थेंब बाहेर आले. मी पटकन् तें बोट झांकून टाकलें.

" बोंचला ना कांटा ? मी थांबा म्हणत होतों तर ऐकलं नाहीं. फार बोंचला का ? पाहूं ? "

" कांहीं विशेष नाहीं. उगीच थोडं रक्त आलं आहे." पण खरें सांगायचें म्हणजे मला कांटा चांगलाच बोंचला होता. आगहि बरीच होत होती.

" पाहूं, बोट दाखवा पाहूं मला. "

मी दाखवीत नाहीं असें पहातांच दिवाकरांनीं पटकन् माझें मनगट धरून हात वर उचलला.

" बरंच रक्त आलं आहे कीं !—हें पहा, असं करा. त्या पलीकडच्या पाटांतून पाणी वहात आहे त्यांत बोट धरून ठेवा म्हणजे ताबडतोब रक्त थांबेल. " असें म्हणून त्यांनीं माझा हात सोडून दिला.—अगदीं सहजच झाली गोष्ट. पण—-

" तें फूल मिळाल्याशिवाय मी इथून हालायची नाहीं. "

" मी तोडून आणतों तें फूल. तुम्ही आधीं पुढं होऊन बोट पाण्यांत धरून ठेवा लवकर. "

मी पाण्याच्या पाटाकडे गेलें. दिवाकर फूल तोडून परत येतात तों माझ्या बोटांतून रक्त येणें जवळजवळ थांबलेंच होतें. पाटाजवळ खालीं बसून मी पाण्यांत बोट धरलें होतें. दिवाकर पाटाच्या पलीकडच्या बाजूला जरा अंतरावर बसले. त्यांनीं मला तें फूल दिलें.—

" माझ्या बागेंतलीं फुलं तोडलीं म्हणजे काय शिक्षा होते तें आतां कळलं का ?" दिवाकर अर्थपूर्ण हंसून म्हणाले.

" अं! या शिक्षेला भिऊन मी फुलं तोडण्याचं बंद थोडंच करणार आहें ?"

" तुम्ही बंद नाहीं केलं तर मला करावं लागेल.—पण तें राहूं द्या, तुम्ही इथं आलांत कशा तें सांगा आधीं."

" कशा आलांत म्हणजे ? चालत चालत.—मी तुम्हांला मागंच नाहीं का सांगितलं, कीं तुम्ही नाहीं म्हटलं तरीसुद्धां मी तुमची बाग पहायला येणार म्हणून !— तुम्ही मला विषारी सापांची अन् कसली कसली भीति दाखवली होती.—"

" ती भीति नव्हती. ती वस्तुस्थिति होती."

" होती ?—मग आतां नाहीं वाटतं तशी ? मी बागेंत येण्याची नुसती इच्छा प्रदर्शित करतांच तुमचे आवडते विषारी साप पळून गेले कीं काय ?"

" कदाचित् तसंहि झालं असेल.—पण तें राहूं द्या बाजूला. तुम्ही इथं कशा आलांत तें सांगा.—एकट्याच आलांत का ?"

" हो." मी हंसत उत्तर दिलें. पण माझ्या हंसण्यांतला मिस्किलपणा त्यांनीं ओळखला.

" छे, खोटं. सांगा कुणाबरोबर आलांत ?"

" मी एकटी येणं तुम्हांला अगदीं अशक्य वाटतं का ?"

" अर्थात्.—सांगा, कोण आलं आहे तुमच्याबरोबर ? तात्या आले आहेत का ? "

" नाहीं. मास्तर आले आहेत."

" मास्तर ? कुठं आहेत मास्तर ? "

" तुम्ही एवढ्या पहांटे उठलां आहांत कीं नाहीं हें पहाण्याकरितां ते बंगल्याकडे गेले अन् मी बागेंत फिरूं लागलें."

" अस्सं काय ? चला आपण मास्तरांना शोधूं."

आम्ही उठलों. त्या वेळीं सूर्य नुकताच उगवला होता. सूर्याच्या सोनेरी किरणांत बाग अधिकच खुलून दिसत होती. वाराहि सुंदर सुटला होता. सारी फुलबाग वाऱ्याच्या लहरींबरोबर डोलत होती.—दिवाकरांनीं एकदां माझ्याकडे पाहिलें व लगेच सूर्याकडे दृष्टि वळवली. नंतर ते बंगल्याकडे चालूं लागले. मीहि चालूं लागलें. बंगल्यांत पोंचेपर्यंत दिवाकरांनीं माझ्याकडे एकदांसुद्धां पाहिलें नाहीं.—

आम्ही बंगल्याजवळ गेलों तों समोरून मास्तर येतांना दिसले. त्यांनीं उपरण्याच्या पदरांत फुलें बांधलीं होतीं. ते म्हणाले,

" वा, खूप केलीत. तुम्हांला शोधण्याकरतां बंगल्याकडे आलों तों तुमचा पत्ता नव्हता."

" तुम्ही मला नेहमींच चुकीच्या ठिकाणीं शोधणार."

" मास्तर, मला मात्र हे न शोधतांच बागेंत सांपडले.— चलायचं ना आतां घरीं ? "

" हो, हो. चलायचं नाहीं तर काय ?"

" चाललांत कुठं मास्तर ? चहा घेतल्याशिवाय तुमची सुटका होणं शक्य नाहीं."

" नको आतां. फार उशीर होईल आम्हांला. अन् ऊनहि होईल ना मग ?" मी कुरकुर केली.

" त्याची नको तुम्हांला काळजी. मी तुम्हाला माझ्या मोटारीनं पोंचवून देईन घरीं.—ते पहा मास्तरांचे पाय खिळले जमिनीला. चहाचं अन् मोटारचं आमिष दाखवल्यावर मास्तर कसचे हालताहेत इथून ?"

" खरं का मास्तर ? असं असेल तर तुम्ही रहा इथं चहा प्यायला. मी जातें एकटीच."

" चला, चला. काय वात्रटपणा चालवला आहे !" दिवाकर जरा अधिकारयुक्त स्वरांत म्हणाले. मी निमुटपणें आंत गेलें.—

---

— २४ —

मी घरीं परत आलें तों केशवाचें पत्र माझी वाट पहात होतें. पाकीट बरेंच जड होतें.—माझ्या काळजांत धस्स झालें !—पण वाचून पहातें तों काय ?—कांहींच विशेष नव्हतें !—

---

— २५ —

दिवाकर आतांशा आमच्याकडे पुष्कळदां येऊं लागले. पूर्वींसारख्याच मजेंत गप्पागोष्टी होत. कधीं कधीं तात्या, आई कामांत असलीं कीं आम्ही दोघेंच गप्पा मारीत असूं.—

दिवाकरांच्या स्वभावाचे बरेचसे धागे आतां उकलले होते. पण त्यांच्या स्वभावावरून त्यांच्या जीविताचें कोडें उलगडण्यास फारशी मदत झाली नाहीं. त्या गोष्टीचें मला पूर्वींइतकेंच गूढ होतें.—आमच्या ओळखीचें मैत्रींत रूपान्तर होऊं लागलें होतें.—कदाचित् झालेंहि असेल. पण या अतिपरिचयामुळें व नित्याच्या सहवासामुळें, मनोभावांची सखोलता कमी होत चालली होती कीं काय अशी मला मधून मधून शंका येई. कारण, मजेच्या पण अगदीं साध्या व ज्यांचा जीविताशीं कांहीं संबंध नाहीं अशाच गोष्टींत आमचा काळ जाई. जणुं कांहीं एकमेकांच्या जीविताचा एकमेकांस पत्ता न लागूं देण्याची आमच्यांत चढाओढ चालली होती. पण कधीं कधीं बोलतां बोलतां एखादें वाक्य, एखादा शब्द सहज निघून जाई व भयानक सखोलतेची जाणीव करून देई.—

— २६ —

ते चैत्रांतले दिवस होते. आई हळदीकुंकवाला गेली होती. मी अर्थात् घरींच राहिलें होतें. कपाळाचें कुंकू नाहींसें झालें कीं हळदीकुंकवास कायमचें आंचवावें लागतें. विधवेच्या विशिष्ट प्रकारच्या विषण्ण मनोवृत्तींतून मी पार पडलें होतें. तरी पण अशा प्रसंगीं विधवांच्या जीवितांतील विषमता अंतःकरणास जाणवल्याखेरीज रहात नसे. सत्तर वर्षांच्या सौभाग्यवतींनीं नटूनथटून घरोघरीं मिरवावें, आणि त्यांना अपशकुन होऊं नये म्हणून सतरा किंवा त्याहूनहि कमी व कोंवळ्या वयाच्या विधवांनीं आपलीं पांढरीं कपाळें काळीं करण्याकरितां दडून रहावें ! जणुं कांहीं नवऱ्याच्या मरणास त्याच कारणीभूत होत असतात! व म्हणूनच त्यांना अशी जन्मठेप भोगावी लागते !—

इतर विधवांच्याहून माझी परिस्थिति व मनोरचना फारच निराळी असल्यामुळें मला घरीं बसून रहाण्याबद्दल मुळींच वाईट वाटत नव्हतें.——

दिवाकर बहुधा रोज संध्याकाळीं आमच्याकडे येत असत. पण बराच वेळ झाला तरी आज त्यांच्या येण्याचें चिन्ह दिसेना. उशीरां येण्याची दिवाकरांची ही पहिलीच वेळ नव्हती. पण कां कुणास ठाऊक, आज मला एकाएकीं विलक्षण उदास वाटूं लागलें. मी खिडकींतून रस्त्याकडे पहात होतें. तऱ्ह-

तऱ्हेचा थाटमाट केलेल्या बायका जात येत होत्या. कुणी पायीं, कुणी टांग्यांतून तर कुणी मोटारगाडींतून आपापलें वैभव उधळीत होत्या. पण हें वैभव केवळ बाह्यांगापुरतेंच आहे असें मला वाटूं लागलें. माझ्या दृष्टिपथांत येणाऱ्या बहुतेक बायकांच्या चेहऱ्यावर मला एक भाव प्रामुख्यानें दिसत होता—— उदासीनता! वसंतगौरीच्या हळदीकुंकवाकरितां थाटमाट केलाच पाहिजे म्हणूनच केलेला दिसत होता.——वसंतऋतूंत निसर्गांत नवचैतन्य खेळूं लागतें. व तें पाहून मानवी मन उल्हसित होऊन साहजिकच उत्सवप्रिय बनतें. पण वसंतांतील गौरीनिमित्त नटूनथटून बाहेर पडलेल्या बायकांपैकीं एकीच्याहि चेहऱ्यावर मला वसंतांतलें नवचैतन्य दिसलें नाहीं. करायचें म्हणून केलेल्या गोष्टींत जीव कुठून असणार?——निसर्गांतलि नवचैतन्याशीं सहजपणें एकरूप होणारी बालवृत्ति विकास पावूं लागते न लागते तोंच अनैच्छिक विवाह व अनैसर्गिक अशा सासरच्या वातावरणांत रवानगी. त्याच, त्याच वेळीं साऱ्या कोमल वृत्ति करपून जातात. पुढचें आयुष्य व्यावहारिक दृष्टीनें कितीहि सुखाचें होवो. पण एकदां करपलेली वेल पुन्हां कधींच फुलत नाहीं. अकालीं शिष्टपणा व अकाली वृद्धत्व चेहऱ्यावर कायमचें ठाणें देऊन बसतात. मनाच्या मरणाशीं शरीराच्या मरणाचा कांहीं संबंध नाहीं म्हणूनच हे जीव जगतात. निसर्गांतील, अखिल विश्वांतील सौंदर्याशीं तन्मय होणारें मन आप-

त्यास एके काळीं होतें याचाहि बिचाऱ्यांना कायमचा विसर पडतो !—वसंतांतील गौरीकरितां सजलेल्या या आर्यस्त्रियांत सौंदर्याच्या जाणीवेचा लवलेशहि नव्हता.

—गौरीपूजन एक धार्मिक बाब होऊन बसली. पापपुण्याशीं त्याचा संबंध जोडला गेला. नैसर्गिक मनोभावांचें पापभीरूपणांत रूपान्तर झालें. दर वर्षीं गौर मांडलीच पाहिजे; न मांडली तर पाप लागेल. पांच सुवासिनींच्या तरी ओट्या भरल्याच पाहिजेत. नाहीं तर सौभाग्यावरच घाला येईल. अशा एक ना अनेक कारणांनीं बायकांचीं मनें पछाडलीं गेलीं. वसंतांतील गौरीपूजनामधून वसंताचें उच्चाटन होऊन त्याचें कर्मठ-पूजेंत परिवर्तन झालें. सौंदर्याचा नायनाट झाला.—समोर दिसणाऱ्या स्त्रियांचा साज मला प्रेतांच्या शृंगारासारखा वाटला.

उदास, उदास—चोंहींकडे उदासीनताच पसरली आहेसें मला वाटलें. माझें मनहि उदास झालें. सारा उत्साह मावळला. दिवाकरांच्या येण्याची रोज उत्सुकतेनें वाट पहाणारी मी—आज मला वाट पहाण्यांतसुद्धां उत्साह वाटेना. —कित्येक दिवसांत मला असें उदास वाटलें नव्हतें. पूर्वींच्या उदासीनतेची आज आठवण झाली. कशामुळें या वृत्तीचा विसर पडला होता ? कशामुळें कुणास ठाऊक.—दिवाकरांची ओळख झाल्यापासून मी उदास झालें नव्हतें एवढें मात्र खास. दिवाकरांची ओळख होण्याशीं उदासीनता नाहींशी होण्याचा

कांहीं संबंध असेल का ? दिवाकरांच्या जीविताचें कोडें सोड-विण्यांत मन गुंगून गेल्यामुळें कदाचित् मला उदासीनतेचा विसर पडला असेल.—पण काय करायचें आहे मला त्या कोड्याशीं? कोड्याचें वास्तविक स्वरूप कांहीं कां असेना, माझा त्याच्याशीं काय संबंध ?——उदासीनता——कायमची उदासीनता हेंच माझें भवितव्य! व्यावहारिक दृष्ट्या मीहि इतर स्त्रियांप्रमाणें सुखी होईन, पण——माझी उदासीनता नाहींशी होईल कां ?—अशक्य.—

—मला घरांत बसून रहाण्याचा अगदीं कंटाळा आला. कुठें तरी एकटेंएकटेंच लांब फिरून यावेंसें वाटलें. वहाणा घालून मी तडक निघालें. निघण्यापूर्वीं एक आठवण झाली. दिवाकर कदाचित् आले तर ?——माझे पाय थबकले. पण छे, मला घरीं रहाणें शक्य नव्हतें. मोलकरणीला मी फिरायला जातें म्हणून सांगितलें व बाहेर पडलें.

— २७ —

मी नेहमींच्या मानानें आज फारच झपाट्यानें चाललें होतें. केव्हां एकदां गांवांतून बाहेर पडतें असें मला झालें होतें. पांचदहा मिनिटांतच मी गांवाबाहेर आलें. माणमांच्या रहदारींतून सुटका झाल्यामुळें मला जरा बरें वाटूं लागलें.

गांवाबाहेर थोडें अंतर चालून गेलें असेन तोंच मोटारचा पोंगा ऐकूं आला. मी रस्त्याच्या बाजूला झालें. पण बाजूला होतें न होतें तोंच मोटार माझ्या अगदीं शेजारीं येऊन थड-कली व एकदम उभी राहिली. मी चपापून वर पाहिलें तों आंत दिवाकर होते.

" कुठं निघालांत ? "

" फिरायला.—तुम्ही कुठं निघालांत ? "

" मी तुमच्याचकडे जाणार होतों."

" अस्सं का ? "

" कां ? तुम्हाला खरं नाहीं वाटत ?—चला, आंत बसा, पहा मी तुमच्याच घरीं जातों कीं नाहीं तें ! "

मी आंत जाऊन बसलें. मला आज जास्त बोलायचें नव्हतें व म्हणून कांहीं आढेवेढे न घेतां मी आंत जाऊन बसलें. माझ्या उदास वृत्तींत अजूनहि फरक पडला नव्हता.

" घरीं चलायचं कीं फिरायला ? "

" कुठंहि."

" कुठंहि ? " दिवाकरांनीं जरा आश्चर्यानें विचारलें.

" हो, कुठंहि." मी पुन्हां उत्तर दिलें. गाडी चालू झाली.

गाडी कुठें चालली होती याचें मला कांहीं वेळ भानच नव्हतें. गांवाबाहेर तीनचार मैलांवर डोंगर होते व त्यांतून एक वळणावळणाचा रस्ता होता. डोंगरावरून मोटार जाऊं लागली तेव्हां मी भानावर आलें. या डोंगरांत एक तलाव होता. तलावापाशीं येतांच दिवाकरांनीं मोटार थांबवली व एका बाजूला उभी केली.

" चला, आपण तलावाच्या कांठानं फिरूं." आम्ही उतरलों व तलावाच्या कांठाकांठानें फिरूं लागलों. आम्ही ज्या बाजूनें फिरत होतों ती तलावाची गांवापासून सर्वांत लांबची बाजू होती. पलीकडच्या टोकाला पाणी अडविण्या-करितां बांध बांधलेला होता. त्याच बाजूला गांवांतील लोक फिरायला म्हणून जात व तलावाची मौज पहात बसत. लोकांच्या सुखसोयीकरितां त्या बाजूला बांकें वगैरेहि ठेवलेलीं होतीं. मी तलाव पाहिला होता तो त्याच बाजूनें. आज फिरत होतों त्या बाजूला मी पूर्वीं कधींच आलें नव्हतें. ही बाजू किती शान्त व रमणीय होती !—फिरतांना आम्ही कांहींच बोललों नाहीं.—

थोडा वेळ फिरल्यावर आम्ही एका मउशा हिरवळीवर बसलों.

" तुम्हांला आज बरं नाहीं कां ? "

" बरं नसायला काय झालं ? "

" डॉक्टर या नात्यानं मी हा प्रश्न विचारीत नाहीं."

" मीहि पेशन्ट या नात्यानं उत्तर दिलं नाहीं."

" पण तुम्ही आज ठीक दिसत नाहीं."

" मी कशी दिसतें हें मला कळणं शक्य नाहीं."

" स्वतःला कळत नसेल तर दुसरे सांगतात तें खरं मानावं. खरंच, काय झालं आहे आज तुम्हांला ? "

मी कांहींच बोललें नाहीं.

" तुम्हांला सांगायचं नसेल तर माझा आग्रह नाहीं. तुमच्या विश्वासाला मी खरोखरच पात्र नाहीं.—मला मात्र आज फारच छान वाटतं आहे.—या क्षणाला तरी माझ्यासारखा सुखी जगांत कुणीच नसेल—अन् याचं सारं श्रेय तुम्हांला आहे.—"

दिवाकरांचा चेहरा एकदम गंभीर झाला. बोलूं नये तें बोलून गेल्यामुळें कीं काय ते एकदम गोरेमोरे झाले. त्यांचे डोळे भरून आल्यासारखे दिसले. मी त्यांना अशा अवस्थेंत पूर्वीं कधींच पाहिलें नव्हतें.—मी कांहींच बोललें नाहीं. पण मी माझ्या तंद्रींतून पूर्ण जागी झालें होतें. दिवाकरांच्या बोलण्याचा ओघ माझ्या नीटसा ध्यानांत आला नाहीं. तो समजून घेण्याकडे माझें सारें लक्ष वेधून गेलें.—थोड्या वेळानें दिवाकरच बोलूं लागले,

" माझ्या बोलण्याबद्दल गैरसमज करून घेऊं नका.—तुम्ही माझ्याशीं आजपर्यंत इतक्या चांगल्या वागलांत,—माझ्या उभ्या आयुष्यांत मला इतक्या चांगुलपणाचा अनुभव आला नाहीं."

दिवाकर क्षणभर थांबले. त्यांची दृष्टि तलावाच्या पाण्यावर स्थिर झाली होती. त्यांचा चेहरा एकाएकीं विलक्षण खिन्न झालेला दिसला. ते पुढें बोलूं लागले,

" सात वर्षांपूर्वीं आमचं लग्न झालं. त्या वेळीं मी अगदीं निराधार होतों. M. B. B. S. च्या डिग्रीशिवाय मजजवळ दुसरं कसलंच भांडवल नव्हतं. शकुंतला श्रीमंत सुधारकाची पोर होती. माझ्या कर्तबगारीवर तिचा विश्वास होता. माझ्या याचनेस तिनं रुकार दिला. माझ्यासारखा सुखी साऱ्या जगांत कुणी नसेल असं मला त्या वेळीं वाटलं. मी प्रॅक्टिस करायला इथं आलों. पहिलीं एक दोन वर्षं मला फारच कमी पैसे मिळाले. शकुंतलेला मला तिच्या माहेरच्या वैभवांत ठेवतां आलं नाहीं. ती गोष्ट माझ्या काळजाला घरे पाडूं लागली.—त्याच एक दोन वर्षांत माझ्या प्रीतीच्या स्वर्गीय कल्पनेला पुष्कळच धक्के बसले. शकुंतला शिस्तीच्या वातावरणांत वाढलेली होती. माझं सारं आयुष्यच गैरशिस्तींत गेलं होतं. माझ्या वागणुकीचा शकुंतलेला अर्थ कळेना. लहानसहान गोष्टींवरून आमचीं भांडणं होऊं लागलीं. मी दर वेळीं नमतं घेण्याचा प्रयत्न करी व

त्यामुळं भांडण विकोपास जात नसे. पण शेवटीं शेवटीं माझ्या सहनशीलतेच्या सीमा ढांसळूं लागल्या. प्रीतिविवाहानंतरचं जीवन इतकं कटु असेल अशी मला स्वप्नांतसुद्धां कल्पना शिवली नव्हती....एके दिवशीं संध्याकाळीं मी एका मेजवानीस गेलों. त्या वेळीं मी पूर्ण निर्व्यसनी होतों. पण त्या दिवशीं एका मित्राच्या अत्याग्रहाखातर मी एक विडी ओढली. मला अर्थात् ती आवडली नाहीं. व मी त्यापुढं विडी ओढणं शक्य नव्हतं. घरीं आल्यावर अगदीं गमतीगमतीनं मी शकुंतलेला विडी ओढल्याचं सांगितलं. ती कोण संतापली माझ्यावर ! त्या वेळची तिची मुद्रा अजूनहि मला दिसते व माझ्या अंगावर शहारे येतात. ‘ चूक झाली. यापुढं मी विडी कधींच ओढणार नाहीं.’ असं मी तिला वारंवार सांगितलं. पण तिचा संताप कांहीं केल्या कमी होईना. विडी ओढल्यामुळं माझं भयंकर अधःपतन झालं अशी तिची पूर्ण खात्री झालेली दिसली. माझी सहन-शीलता पार ढांसळून गेली. मी तडक घराबाहेर पडलों. एक सिगारेटचा डबा विकत घेऊन आलों. शकुंतला संतापांतच होती. मी एकामागून एक सिगरेट ओढण्याचा सपाटा चालवला. शकुंतला संतापानं लाल झाली. पण माझ्या चेहऱ्यावर सिगरेट ओढीत रहाण्याचा निर्धार फारच तीव्र स्वरूपांत दिसल्यामुळं कीं काय, ती माझ्याशीं कांहीं बोलली नाहीं. फणकाऱ्यानं खोलीबाहेर निघून गेली. मी त्या दिवशीं रात्रभर सिगरेट

ओढीत बसलों. एक संपली कीं दुसरी पेटवीत होतों. माझ्या संसाराची ती होळीच आहे असं मला वाटलं !

"—शकुंतलेला समाजसुधारणेचं फार वेड होतं. ती B. A. होती व आपल्या उच्च शिक्षणाचा फायदा सर्व समाज-भगिनींस देण्याचा तिनं चंग बांधला. तिनं एक स्त्रीसमाज काढला. दुपारीं बारा ते पांच ती तिथं काम करूं लागली. व सकाळींहि ती त्या [illegible] कुठं कुठं फिरत असे. तिच्या अव्याहत परिश्रमाबद्दल व समाजसेवेबद्दल तिची फार प्रशंसा होऊं लागली.—मी दवाखान्यांत सकाळीं जात असें. मला परत येण्यास बारा किंवा कधीं कधीं एकसुद्धां वाजून जाई. सायकलवरून रोगी तपासण्याकरतां मी साऱ्या गांवभर हिंडत असें. सुरुवातीला माझं स्वतःचं काम थोडं असल्यामुळं मी एका धर्मार्थ दवाखान्यांत काम पत्करलं होतं. घरीं मी अगदीं थकून येत असें. पण कित्येकदां तरी शकुंतला जेवून-खाऊन स्त्रीसमाजांत गेलेली असायची. त्या वेळीं मला काय वाटत असे हें मला वर्णन करून सांगतां येणं शक्य नाहीं. तिनं वाढून ठेवलेलं ताट निमूटपणं पुढं ओढून मी आपली भूक भागवीत असें. व तीनप्रहरचा चहा आपल्याच हातांनीं करून घेऊन मी कामाला निघून जात असें.—असा प्रकार आमच्या वैवाहिक जीवनाच्या जवळजवळ सुरुवातीपासूनच सुरू झाला होता. समाजसेवेकरतां माझ्या वैयक्तिक सुख-

सोर्यींची थोडीशी हेळसांड झाल्यास त्यांत काय वावगं होतं? सुशिक्षित व अशिक्षित बायकांत मग फरक तो काय राहिला?—वावगं कांहींच नव्हतं व तिच्या समाजसेवेबद्दल मी तिला कधींच दोष दिला नाहीं. पण उन्हातान्हांतून थकूनभागून घरीं आलों कीं शकुंतला निदान डोळ्यांना तरी दिसावी, असं मात्र मला नेहमीं वाटे. समाजसेवेप्रीत्यर्थ असं न वाटूं देण्याचा मी किती तरी प्रयत्न केला! पण तो मला कधींच साधला नाहीं. तिला दोष न देणं व तिच्या कार्यांत व्यत्यय न आणणं एवढंच मला शक्य होतं व तें करण्यांत मी चुकलों नाहीं. पणपण काय?—कुणाला सांगायचं?—कुणापाशीं बोलायचं?

"शकुंतला प्रसिद्ध विदुषी झाली. तिच्या कार्याबद्दल वर्तमान-पत्रांतून व व्याख्यानांतून वरचेवर प्रशंसा होऊं लागली—शकुंतलेचा उत्साह दुणावला व तिची समाजसेवा दुप्पट जोरांत सुरू झाली.—

"मधून मधून 'थकून भागून आल्यावर तूं घरीं दिसलीस तर मला फार बरं वाटेल.' असे तिला सुचवण्याचा मी प्रयत्न करी. पण असं करतांच समाजसेवेच्या महतीचं व्याख्यान मला ऐकावं लागे. व भलताच प्रमाद केल्याबद्दल माफी मागावी लागे.

"अशा परिस्थितींत लहानसहान भांडणं होणं अपरिहार्य होतं. पण सिगरेटचा प्रकार होईपर्यंत गोष्टी विकोपाला गेल्या

नव्हत्या. त्या दिवसापासून माझी वृत्ति जरा पालटली. तरी पण माझ्या कृतीचा अर्थ तिला कळेल व पुन्हां सारं नीट जुळेल अशी मला आशा वाटत होती. पण भवितव्यता निराळी होती!—

" धर्मार्थ दवाखान्यांत काम केल्यामुळें गांवांतील सर्व तऱ्हेच्या लोकांशीं माझा संबंध आला. माझी थोडीफार ख्याती होऊं लागली व मला पैसेहि बरे मिळूं लागले.

" धर्मार्थ दवाखान्यांत काम फार वाढल्यामुळं एका स्त्री-डॉक्टरची नेमणूक झाली. त्या बाईचं नांव कमलाबाई जगदळे असं होतं. ती विधवा होती, तरुण होती व दिसायला फारशी सुंदर नसली तरी मोहक होती. शीलानं ती कशी होती हें त्या वेळीं मला मुळींच माहीत नव्हतं. सुशील बाई असं गृहीत धरूनच मी तिच्याशीं वागत होतों. कधीं कधीं आम्ही बरोबरच घरीं येत असूं. तिनं आमच्या शेजारींच बिऱ्हाड केलं होतं. दुपारीं शकुंतला घरीं नसे हें तिला कळलं. तिला त्याचं फारच आश्चर्य वाटलं. दुपारीं उन्हातान्हांतून काम करून घरीं आल्यावर मला थंड अन्न खावं लागतं हें कळल्यावर ती थक्क झाली. कधीं कधीं ती मजकडे ताजेताजे पदार्थ पाठवूं लागली. एखाद वेळीं मी तिच्याकडे जेवताहि असें. तिची व शकुंतलेची चांगली ओळख झाली होती. पुढें कांहीं दिवसांनंतर शकुंतलेनं कुणाकडून तरी तिच्याविषयीं

कांहीं वाईटसाईट ऐकलं, व मला संभाळून रहाण्यास तिनं बजावून सांगितलं. पण कमलाबाई माझ्याशीं इतक्या चांगल्या तऱ्हेनं वागत व माझी इतकी काळजी घेत कीं, त्यांच्याशीं तुटकपणानं वागणं मला शक्यच नव्हतं. शकुंतलेच्या बजावण्याकडे मी दुर्लक्ष केलं व कमलाबाईंशीं वागण्यांत मुळींच फरक केला नाहीं. पण सिगरेटच्या प्रकारानंतर माझ्या वागणुकीचा शकुंतला भलताच अर्थ घेऊं लागली कीं काय अशी मला शंका येऊं लागली. शंका खोटी ठरावी अशी मी त्या वेळीं किती मनोभावानं देवाची प्रार्थना केली. कारण प्रीतीची मूर्ति कायमची भंगते कीं काय अशी मला भीति वाटूं लागली. समाजसेवेमुळं शकुंतलेचं इतकं अधःपतन झालं असेल असं मला वाटलं नाहीं.—पण—

"कमलाबाईंचा व माझा स्नेह अधिक वाढूं लागला. आमच्या भांडणाची कमलाबाईंना माहिती झाली होती. कधीं कधीं तर त्यांच्यासमोरसुद्धां आमचीं छोटीं छोटीं युद्धं चालत. भांडणा-मुळं जीव त्रासला कीं कमलाबाईंना घेऊन कधीं कधीं मी फिरायला जात असें. एके दिवशीं असा प्रकार रात्रीं घडला. कमलाबाईंशीं बोलून मन हलकं करावं एवढ्याचसाठीं मी त्यांना वेळ काळ न पहातां फिरायला घेऊन गेलों. फिरून आल्यावर माझ्यावर कोण गहजब झाला ! शकुंतलेनं माझ्यावर भलताच आरोप केला. माझी प्रेममूर्ति पार भंगून गेली.—

"—विश्वासाच्या नाजुक व सूक्ष्म तंतूंनीं प्रीतीचा गोफ गुंफला जात असतो. विश्वास नाहींसा झाला कीं, जुळणी थांबते. गोफ अपुरा राहून जातो. उकलायला जावं तर तंतू तोडल्याशिवाय वीण उकलली जात नाहीं. त्या तंतूंच्या अणु-रेणूंशीं सारा जीव संलग्न झालेला असल्यामुळं तंतू तोडणं अशक्य नसलं तरी असह्य होतं.—

" शकुंतलेचा माझ्यावर पुन्हां विश्वास बसेल अशी आशा बाळगायला मला कारण नव्हतं. पण जिवांत जीव आहे तों-पर्यंत आशा सुटत नाहीं. शकुंतलेकरतां मी कमलाबाईचा संबंध सोडून दिला. निर्दोषी असूनसुद्धां दोषी माणसासारखा मी वागूं लागलों. या माझ्या परिवर्तनाचा शकुंतलेवर उलटाच परिणाम झाला. मी दोषी आहें अशी तिची खात्री झाली.

" मी आतां पूर्ण हताश झालों. हळुहळू माझी हताश वृत्ति बेफाम होऊं लागली. कमलाबाईशीं मी पूर्ववत् वागूं लागलों. किंबहुना पूर्वींपेक्षांहि अधिक मोकळेपणानं वागूं लागलों. टीकेची मला पर्वा वाटेनाशी झाली.—पण माझ्या वर्तनाचे दुष्परिणाम कमलाबाईंना भोगावे लागले. त्यांच्या नोकरीवर-सुद्धां गदा येऊं लागली. शकुंतलेनं आपलं वजन खर्च करून कमलाबाईंची उचलबांगडी करण्याचा घाट घातला. कमलाबाई गरीब होत्या. आई व लहान दोन भावंडं यांचं जीवित त्यांच्यावर अवलंबून होतं. त्यांच्या घरांत त्याच एक मिळ-

वत्या होत्या. शकुंतलेच्या नीच प्रयत्नामुळं मी फारच बेफाम झालों. व कांहीं झालं तरी कमलाबाईंना पैशाच्या अडचणींत पडूं द्यायचं नाहीं असा मी निर्धार केला.

"—शकुंतलेचा मत्सरी डाव यशस्वी झाला.—धर्मार्थ दवाखान्याच्या चालकांकडून कमलाबाईंना एक महिन्याच्या आंत नोकरी सोडण्याविषयीं नोटीस मिळाली.—त्या दिवशीं कमलाबाईंची स्थिति फारच केविलवाणी झाली होती. व इकडे शकुंतलेच्या चेहऱ्यावर विजयाचं स्मित झळकत होतं. पूर्वीं जितक्या उत्कटतेनं मी शकुंतलेवर प्रेम करीत होतों त्यापेक्षां जास्तपटीनं द्वेषाची भावना माझ्यांत उसळली. त्या दिवशीं संध्याकाळीं मी कमलाबाईंना घेऊन तलावाच्या याच बाजूला आलों. त्या पलीकडच्या झाडींत आम्ही बसलों. कमलाबाईंपेक्षां मीच त्या दिवशीं अधिक अस्वस्थ झालों होतों. 'माझ्यामुळं तुमच्यावर हा प्रसंग आला. मी तुमच्याकरतां काय करूं?' अशा मनःस्थितींत त्यांच्याशीं मी फार कळकळीनं बोलत होतों. त्या अगदीं शान्त होत्या. 'माझ्याकरतां तुम्ही कांहीं करूं नका. मी खासगी रीतीनं इथं दवाखाना काढीन व पैसे मिळवीन. मला इथं चांगले पैसे मिळतील अशी खात्री आहे. इथं सध्यां स्त्री-डॉक्टर कुणीच नाहीं. त्यामुळं पैसे मिळण्यास अडचण पडणार नाहीं असं वाटतं. मला नोकरीवरून कां काढण्यांत येतं आहे याचा मला आज सुगावा लागला.—तुमच्या

स्नेहाचा इतका विपरीत अर्थ घेण्यांत येईल अशी माझी कल्पना नव्हती.—मला वाईट वाटतं तें तुमच्याकरतां व शकुंतलाबाई-करतां. त्यांच्या सुखाच्या आड मी येऊं इच्छीत नाहीं. आज-पासून मी तुमच्याशीं सर्व संबंध सोडून देण्याचा निश्चय केला आहे. अन् तुम्हांलाहि माझी अशी आग्रहाची विनंति आहे कीं, तुम्हीहि यापुढं माझ्याशीं संबंध ठेवूं नये.—'

"कमलाबाईच्या बोलण्यांतला मतलब ध्यानांत येण्याइतका त्या वेळीं मी बद्माष नव्हतों. त्यांची शान्त व करारी वृत्ति मला पूर्णपणं निःस्वार्थी अशीच वाटली. आणि त्यांच्याविषयीं माझ्या मनांत आदर उत्पन्न झाला.—त्या क्षणीं तरी माझं मन अत्यंत हळवं बनलं होतं. व चांगुलपणाचा एवढासुद्धां अंश माझं चित्त हरण करून घेण्यास पुरेसा होता. कमला-बाईच्याजवळ त्या दिवशीं मी आपल्या जीविताची सर्व भाकड-कथा सांगितली. त्या वेळीं माझं मन फारच दुबळं बनलं होतं. कथा सांगतांना अश्रूंचा पूर आवरून धरणं मला अशक्य झालं. —कमलाबाईना कळवळा आला व त्यांनीं माझं डोकं आपल्या हृदयाशीं धरून ठेवलं.—कमलाबाईच्या कनवाळूपणाचा अव्हेर करण्याचं सामर्थ्य माझ्यांत उरलं नव्हतं.—

"'अहो, उठा उठा. पुरे झाला हा चावटपणा. जनाची नाहीं तर मनाची तरी लाज!'—तो शकुंतलेचा आवाज होता. तो त्या वेळीं मला इतका कर्कश व भीषण वाटला कीं, शकुं-

तलेचं भूतच ते शब्द बोलत आहे असं मला वाटलं.—जोरानं वीज कडकडून सर्व गात्रं बधिर व्हावीं तसं मला झालं.—

" दुसऱ्याच दिवशीं शकुंतला मला सोडून गेली. शकुंतलेच्या बोलण्यावरून मला कळून आलं कीं, तिनं आदल्या दिवशीं माझ्यावर मुद्दाम पाळत ठेवली होती.—तिला लांब उभं रहावं लागल्यामुळं आमचं बोलणं ऐकूं गेलं नाहीं हेंहि मला स्पष्ट दिसून आलं. दैवानं माझ्यावर तेवढीहि खैर केली नाहीं. आमचा संवाद तिनं आडून ऐकला असता तर—तर कदाचित् माझी निर्दोषता तिला पटली असती.—पण —पण— कुणी सांगावं ?—

"—मी एकटा, अगदीं एकटा राहिलों. भेसूर भूतकाळ आ वासून अहर्निश माझ्यासमोर उभा होता. माझ्या भविष्यकाळाचा कायमचा अंत झाला होता—त्याबरोबर माझाहि अंत झाला असता तर ?—पण एका दृष्टीनं माझाहि अंत झाला होता.—

"—शकुंतला गेल्यानंतर कमलाबाई माझ्याशीं फारच प्रेमळपणानं वागूं लागल्या. पण प्रेमळपणानं वागण्याचं माझ्यांत त्राण उरलं नव्हतं. शकुंतला गेल्यानंतर कित्येक दिवस कमलाबाईशीं मी अत्यंत बेफिकिरीनं वागत होतों.—

"—चांगलं आणि वाईट हे नुसते शब्द आहेत. जगांत पूर्ण चांगलं किंवा पूर्ण वाईट असं कांहीं नाहीं. शकुंतलेची प्रीति

जोंपर्यंत माझ्या जीविताचीं सूत्रं हालवीत होतीं तोंपर्यंत शकुंतलेचं सुख हेंच माझं जीवितध्येय होतं. व माझ्या सर्व कृति त्या ध्येयानुसारच होत होत्या. शकुंतला गेल्यानंतर सुकाणू नसलेल्या नावेसारखी माझी स्थिति झाली. चांगल्या-वाइटाचा विधिनिषेध मला उरला नाहीं. स्थितप्रज्ञ चांगल्या-वाइटाच्या पार गेलेले असतात. निराळ्या अर्थानं शकुंतलेनं मला स्थितप्रज्ञ बनवलं होतं !

" कमलाबाईचा प्रेमळपणा मला उघडपणं लघळपणा वाटूं लागला. पण मी त्याचा प्रतिकार केला नाहीं. कां करायचा ? कशाकरतां ? कुणाकरतां ?—पापपुण्याशीं माझा कायमचा संबंध तुटला होता.—कमलाबाईना वाटत होतं कीं, मी त्यांच्या जाळ्यांत सांपडतों आहें. कारण मी हंसत त्यांच्या इच्छा पुरवूं लागलों. पण माझ्या हंसण्याचा अर्थ कळण्याइतकी अक्कल व शालीनता कमलाबाईत मुळींच नव्हती.—

" कमलाबाई व मी उघडपणं व्यभिचारी जीवनक्रम आक्रमूं लागलों.—

" यापुढचा वृत्तान्त मी तुमच्या कल्पनेवरच सोंपवतों. माझ्या हातून घडलं नसेल असं जगांत कोणचंहि पाप नाहीं. शकुंतला गेल्यानंतर माझ्या पाशवी वृत्तीचा नंगा नाच सुरू झाला. स्त्री ही निव्वळ उपभोग्य वस्तू आहे, यापलीकडे तिला किंमत नाहीं, अशी माझी ठाम समजूत झाली. प्रीति हें एक तारुण्यां-

तलं वेड आहे अशी माझी खात्री झाली. मला कशाचीच शुद्ध उरली नाहीं. नाहीं म्हणायला एका बाबतींत मात्र मी विलक्षण शुद्ध राहिलों. ती बाब म्हणजे माझा धंदा. दारूच्या धुंदींत असतांनासुद्धां मला डॉक्टर या नात्यानं कुणी बोलावलं कीं मी एकदम पूर्ण शुद्धीवर येत असें. अर्थात् ती शुद्ध डॉक्टरीच्या अंगापुरतीच होती. इतर बाबतींत धुंद कायमच असे. यामुळं माझ्या धंद्यांत मी पूर्णपणं यशस्वी झालों. माझ्या अधःपतनाबरोबरच लक्ष्मीनं माझ्या घरांत ठाणं दिलं. कुणाला सांगितलं तर खरं वाटणार नाहीं इतका पैसा मी कमावला. पण तो सारा मी व्यसनांत व व्यभिचारांत घालवला.—

“—माझी कहाणी संपली.—

“—तुमचा माझ्या जीवनांत प्रवेश झाला नसता तर अधःपातांतच माझा अंत झाला असता. तुम्ही माझ्या अधःपातांतल्या तत्त्वज्ञानाला जबरदस्त धक्का दिला. सारं माहीत असूनहि तुम्ही माझ्याशीं कधींहि अविश्वासानं वागलां नाहींत.—क्षणभरहि माझ्याविषयीं साशंक झालां नाहींत. पहिल्यापहिल्यानं मला वाटलं कीं, मी तुम्हांला आजारांतून मुक्त केलं म्हणूनच तुम्ही माझ्याशीं इतक्या चांगल्या वागतां. पण पुढं माझी चूक मला कळून आली. कांहीं काळ मी तुम्हांला कमी लेखलं याबद्दल मला क्षमा करा.—आज तर तुम्ही कळस केलात. ‘घरीं चलायचं कीं फिरायला?’ म्हणून विचारलं तर तुम्ही म्हणालांत

'कुठंहि.'—कुठंहि!—कृष्णाबाई, मी तो शब्द आजन्म विसरणार नाहीं. त्या शब्दानं तुम्ही एका पतिताचा उद्धार केला. तुम्ही माझ्या आयुष्यांत केवढं स्थित्यंतर घडवून आणलंत याची तुम्हांला कल्पनाहि येणं शक्य नाहीं.—"

—दिवाकर एकदम स्तब्ध झाले.—

कांहीं वेळानें मी म्हणालें,

"आज मी एका निराळ्या विश्वांत प्रवेश केला आहे असं मला वाटूं लागलं आहे.—तुम्ही आपली कहाणी सांगून माझ्यावर किती उपकार केला आहे याची तुम्हांलाहि कल्पना येणं शक्य नाहीं.—मला अजून एका गोष्टीचा मात्र उलगडा होत नाहीं. मी तुमच्या आयुष्यांत स्थित्यंतर कसं काय घडवून आणलं हें मला अजून कळत नाहीं."

"तें तुम्हांला समजण्याची खरोखर कांहीं जरूर नाहीं. पण तुम्ही विचारतांच म्हणून सांगणं भाग आहे.—सत्य-नारायणाच्या दिवसापासून आजपर्यंतचा माझा जीवितक्रम नवीन जन्माला आलेल्या मुलाइतका विशुद्ध झाला आहे.—माझ्या बागेंतले सारे विषारी साप तुम्ही बागेंत येण्याची भीति दाखवतांच पळून गेले!"

दिवाकरांच्या चेहऱ्यावर गोड स्मित झळकूं लागलें. मी चेष्टेच्या स्वरांत म्हणालें,

" खोटं, सारं खोटं. सत्यनारायणाच्या दिवसानंतर तुमचं दारूचं व्यसन विकोपाला गेलं असं मास्तरांनींच मला सांगितलं. तुम्ही राजरोसपणं दवाखान्यांतसुद्धां त्या दिवसापासून दारू झोंकूं लागलांत."

दिवाकर मोठ्यानें हंसले.

" गरीब बिचारे मास्तर ! "

" हंसण्यावारी गोष्ट नेऊन आतां नाहीं अं चालणार ! दवाखान्यांत ती दारूची बाटली व तो अखंड भरलेला पेला काय शोभेकरतां ठेवला होता होय ? "

" अर्थात् ! " दिवाकर जोरानें म्हणाले.

" म्हणजे ? हें काय गौडबंगाल आहे ? "

दिवाकर पुन्हां जरा हंसले. थोड्या वेळानें ते गंभीर झाले व बोलूं लागले,

" शकुंतलेनं मला कितीहि अन्यायानं वागवलं तरी एके काळीं ती माझी प्रीतिदेवता होती. मूर्ति भंगली तरी स्मृति-रूपानं माझी भक्ति अखंड कायम राहील. लोकांत असा प्रवाद रूढ आहे कीं, आमच्या प्रीतिविवाहाचा विचका होण्यास मीच सर्वस्वीं कारणीभूत झालों. शकुंतला त्या बाबतींत पूर्ण निर्दोषी आहे अशी सर्वांची ठाम समजूत आहे.

" माझ्या प्रीतीच्या स्मृतीकरतां मला हा प्रवाद अखंड कायम ठेवायचा आहे.—आज मी जरा किंचित् दुबळ्या मनः-

स्थितींत आहें म्हणून ही गोष्ट मी तुम्हांला सांगितली.—शिवाय तुम्ही ही कुणापाशीं बोलणार नाहीं असा मला पूर्ण विश्वास वाटला म्हणून मी बोलून गेलों.—सत्यनारायणाच्या दिवसानंतर व्यसनाकडे माझी प्रवृत्तीच होईना. माझ्या मनांत प्रचंड खळबळ सुरू झाली होती. अखेरीस हा देखाव्याचा उपाय मला सुचला.—मी चांगला माणूस आहें असा समज लोकांत रूढ झाला तर मला खरोखर वाईट वाटेल."

"तुमच्या विचित्रपणाची कमाल आहे ! काय लबाड आहांत तरी तुम्ही ? मी तुमच्या इतर गोष्टींना फसलें नाहीं. पण या दवाखान्यांतल्या देखाव्यानं मात्र माझी पुरी पुरी दिशाभूल केली. मी त्याचा निराळाच अर्थ केला.—"

"कोणता ?"

"सांगेन केव्हां तरी. पण सांगण्याची तरी काय जरूर आहे ? तुमच्यासारख्या 'बदमाष' माणसाला तें न सांगतांच कळण्यासारखं आहे !"

"'बदमाष' या विशेषणाबद्दल मी तुमचा फार आभारी आहें. पण आपण बदमाषाचेहि गुरु आहांत ! तेव्हां आपले अर्थ न सांगतांच कळण्याइतकी आम्हां पामरांची पात्रता नाहीं !"

"पुरे झाला वात्रटपणा. चला उठा, मला घरीं नेऊन पोहोंचवा. किती अंधार झाला आहे हा !—लोक मला तुमच्याबरोबर पहातील तर माझी किती बदनामी होईल !—

चला, उठा लवकर.—मला आतां तुमच्याबरोबर आल्या-बद्दल खरोखर वाईट वाटतं."

" यांतून सुटण्याचा एक मार्ग आहे."

" कोणता ? "

" इथून घरीं एकट्या पायीं चालत जा. म्हणजे कुणालाच कांहीं संशय येणार नाहीं."

" हो हो, जाईन इथून एकटी पायीं चालत. एवढी नको कांहीं मोटारची ऐट ! "

असें म्हणून मी खरोखरच धूम पळत सुटलें. दिवाकरांची मोटार सुमारें शेंदोनशें कदमांवर असेल. पण आम्ही बसलों होतों त्या जागेपासून ती दिसत नव्हती. कारण रस्ता वळणाचा होता व मध्यें थोडी झाडी होती. शिवाय सूर्य मावळल्यामुळें अंधारहि बराच झाला होता. मी कुठें पळालें हें दिवाकरांना कळणें कठीणच होतें. मी दृष्टिआड होतांच त्यांनीं मला हांका मारायला सुरुवात केली. मी चट्दिशीं त्यांच्या मोटारींत मागच्या बाजूस जाऊन बसलें. दिवाकर मोटारपाशीं आले, पण आंत न बघतां इकडेतिकडेच पाहूं लागले. शिवाय अंधारामुळें मी सहजपणें दिसूं शकत नव्हतें. त्यांनीं मला जोरानें हांका मारायला सुरुवात केली. खूप चिडले. " काय विचित्र पोर आहे ही ! थट्टासुद्धां हिला कळली नाहीं कीं काय ? "—अखेरीस मी पुढें गेलें कीं काय हें पहाण्यासाठीं त्यांनीं मोटारचा सर्च लाइट्

लावला. मी आंत अगदीं गप्प बसलें होतें. प्रकाशाचा झोत पुढें गेल्यामुळें मी अगदीं सुरक्षित होतें.—शेवटीं ते अगदीं फारच त्रासले, व चिडल्यासारखे दिसूं लागले. कंटाळून एकदां मोटारींत येऊन बसले व बटन दाबून मोटार सुरू केली.

मी हळूच म्हणालें, "एका माणसाची फजीऽती !"

—दिवाकर कोण चपापले ! पण गंमत कळतांच चट्‌दिशीं म्हणाले, "काय द्वाड आहांत तुम्ही !"

मोटार चालू झाली.—

त्या रात्रीं मला झोंपच येईना.—माझी उदासीनता पार मावळून गेली होती. दिवाकरांच्या जीविताचें कोडें मला उलगडलें होतें. त्या कोड्याशीं माझ्या उदासीनतेचा कांहीं संबंध असेल असें मला स्वप्नांतसुद्धां वाटलें नव्हतें. दिवाकरांच्या जीविताच्या कोड्याबरोबर मला माझ्याहि जीविताचें कोडें उलगडलें.

—तें फूल,—दिवाकरांकडे परत पाठवलेल्या फुलांतून चोरून घेतलेलें फूल,—निर्माल्य झाल्यावर फेकून देण्याकरतां जपून ठेवलेलें फूल,—मी त्या दिवसानंतर आज बाहेर काढलें. तें अगदीं सुकून गेलें होतें. तें दृष्टीस पडतांच त्याला त्या दिवसाची टवटवी आणण्याकरतांच कीं काय माझ्या डोळ्यांतील अश्रु त्यावर पावसाच्या सरीसारखे पडूं लागले.—सारी रात्र फूल फुलवण्यांत न कळतांच निघून गेली.—

सकाळीं मी दिवाकरांना पत्र लिहिलें,

"—मी परत पाठवायचीं एवढ्या एकाच आशेवर तुम्हीं मजकडे फुलं पाठवलीं होतीं तें आठवतं ना? तीं फुलं परत पाठवतांना माझी कोण तारांबळ उडाली हें माझं मलाच माहीत!—सर्व फुलं रुमालावर ठेवलीं. रुमालाचीं तीन टोकं वर उचललीं व चवथं उचलून फुलं आंत बांधणार इतक्यांत एक फूल इतकं सुंदर, नाजुक अन् मोहक दिसलं कीं मी तें पटकन् काढून घेतलं, लपवून ठेवलं. अन् बाकीचीं फुलं परत पाठवलीं. माझ्या जणुं नकळत मी तुमच्या एका फुलाची चोरी केली.—त्या फुलाविषयीं मी आजपर्यंत कुणाजवळच बोललें नाहीं.—आज या पत्रासोबत मी तें फूल परत पाठवीत आहें,—तुम्ही तें मजकडे परत पाठवाल या एकाच अंधुक आशेवर.—अनंत फुलं ज्याच्या फुलबागेंत रोज उमलतात त्याला एका सुकलेल्या फुलाचं दान करण्यास कांहींच अडचण पडूं नये. पाठवाल ना परत हें फूल?—

—कृष्णा."

— २८ —

संध्याकाळीं दिवाकर मजकडे आले. आज त्यांची मी किती उत्कंठेनें वाट पहात होतें!—पण ते आल्यावर मला त्यांच्याकडे बघवेच ना. माझ्या भावी जीविताची फलश्रुति मला अजून कळायची होती.—खरें सांगायचें म्हणजे मला आज दिवाकर घरीं यायला नको होते. मला फक्त माझें सुकलेलें फूलच परत मिळायला पाहिजे होतें.

किती वेळ तरी आम्ही स्तब्ध बसलों होतों. यापूर्वी केव्हांहि शब्दांना वाण नसे. आज शब्द कुठें पळाले होते कुणास ठाऊक!—

मी खिडकींतून बाहेर पाहूं लागलें. कालच्यासारखीच हळदीकुंकवाकरितां बायकांची ये जा रस्त्यांतून चालली होती. पण आज मी त्या दृश्याकडे शून्य दृष्टीनें पहात होतें. रस्त्यावरील रहदारी, पलीकडच्या घरांचीं उंचसखल कवलारें अन् त्याच्यापलीकडे उंच दिसणारें टॉवरवरील भव्य घड्याळ—सारें मला दिसत होतें. पण माझी दृष्टी कशावरच स्थिर होत नव्हती. नित्याचे मानवी व्यवहार नीटपणें चालले होते. टॉवरवरील घड्याळाचे कांटे हळुहळू अदृश्यपणें फिरत होते; जग चाललें होतें; कालचक्र फिरत होतें; अन् मी त्याकडे पहात होतें. कशाचाच कुणाशीं संबंध नव्हता. कां?—कशाला?—

कुणीकडे ? कशाचाच पत्ता नव्हता. या जगांत माझें असें काय होतें ? आई, तात्या, केशव---सारीं माझीं होतीं. पण मी कुणाची होतें ?---त्या सर्वांना मी फार फार हवीशी वाटे. मलाहि ते हवेसे वाटत. पण---मग मन उदास कां होई ?---

---कालची संध्याकाळ,---कालची रात्र.---संध्याकाळीं तलावाच्या कांठावरून दिसणारें दृश्य---किती रमणीय होतें ! तलावाच्या अलीकडच्या कांठावरून कितीदां तरी मी सुंदर देखावे पाहिले होते. ते मला आवडलेहि होते. पण त्यांनीं सारा जीव कधींच हालला नव्हता.---कालचें दृश्य अजूनहि डोळ्यांसमोरून हालत नाहीं. कां ? तो पलीकडचा कांठ होता म्हणून का ?---पलीकडचा कांठ.---अन् अलीकडचा कांठ--- तसें म्हटलें तर किती थोडें अंतर ! पण खरें किती जमीन-अस्मानचें अंतर आहे !---अलीकडचा कांठ लोकांचा. पली-कडचा कांठ माझा---दिवाकरांचा.---पलीकडच्या कांठावरून विश्वाकडे पाहिलें कीं विश्व किती सुंदर दिसतें !---पलीकड-च्या कांठची दृष्टि सदैव माझ्या डोळ्यांत राहील तर ?---तर या विश्वांतील सौंदर्य मला अखंड दिसत राहील. अन् मग मन उदास कधींच होणार नाहीं. पण ती दृष्टि माझ्या डोळ्यांत अखंड रहाणें शक्य आहे का ?---शक्य आहे.--- पण दिवाकर माझें सुकलेलें फूल परत देतील तर.---

मी पटकन् मागें वळून पाहिलें. दिवाकर खोलींत नव्हते.

मी गोंधळून गेलें. कां गेले दिवाकर निघून ? मी बोललें नाहीं म्हणून का ? मी त्यांच्याकडे पाहिलें नाहीं म्हणून का ?—पण मला पहायला लावणें, मला बोलायला लावणें सर्वस्वीं त्यांच्याच हातीं नव्हतं का ? मग कां गेले ते निघून ?—कां गेले ?—कां गेले ?—माझा कंठ दाटून आला. डोळे भरून आले.—मी ओक्साबोक्शीं रडलें.—पलीकडचा कांठ नाहींसा झाला. सौंदर्यमय दृश्य नाहींसें झालें. मी कायमची आंधळी झालें.—सौंदर्य या डोळ्यांस कधींच दिसायचें नाहीं.—उजाड जग अन् निर्जीव उदासीनता,—काळाच्या अंतापर्यंत उदास, उदास, उदास—

कां गेले दिवाकर ? जायचेंच होतें तर माझें चिमलेलें, सुकलेलें फूल देऊन तरी जायचें होतें. अन् मग ते काळाच्या अंतापर्यंत भेटले नसते तरी मी तें सहज सहन केलें असतें. सुकलेलें फूल देणेंसुद्धां त्यांना जड जावें ना ? मी चोरून ठेवलें होतें तोंवर त्यांना त्याची उणीव कधींच भासली नाहीं, किंवा जें त्यांच्या बागेंतील झाडावर उन्हानें करपून, इतर पायदळीं पडलेल्या पानाफुलांच्या पाचोळ्यांत चिरडून गेलें असतें व कायमचें नाहींसें झालें असतें, तें एक निर्मोल व निर्माल्यवत् फूलसुद्धां त्यांच्याच्यानें देणें झालें नाहीं.—पण त्यांनीं मला कां द्यावें तें फूल ? मला तें घेण्याचा काय हक्क आहे ?—हक्क मुळींच नाहीं. हक्क म्हणून तें मागितलेंहि नव्हतें. केवळ भिक्षा

म्हणूनच मी त्या फुलाची याचना केली होती.——पण त्यांच्या दृष्टीनें मी भिकारणीपेक्षांहि कमी योग्यतेची असेन.—

—निराशेचा पहिला भर ओसरल्यावर मी अमळ शान्त झालें. माझी दृष्टि टेबलावरील पसरट पुष्पपात्राकडे गेली. त्यांत रचून ठेवलेलीं फुलें मला टेबलावर इतस्ततः पडलेलीं दिसलीं. मी पुष्पपात्राजवळ गेलें. त्यांतल्या पाण्यावर एक, एकच सुकलेलें फूल तरंगत होतें!—

—माझें फूल, माझें चिमलें फूल, माझें सोनुलें, छकुलें फूल.—माझे दिवाकर—किती चांगले, किती उदार, किती दयाळू आहेत माझे दिवाकर!—

— २९ —

या सर्व गोष्टींस आज पंधरा वर्षें होऊन गेलीं. डॉक्टरीण होऊन मी आज दहा वर्षें पुण्यास प्रॅक्टिस् करीत आहें. आई, तात्या कांहीं वर्षें गांव सोडून मजजवळ रहायला आलीं होतीं. पण लवकरच एकामागून एक इहलोक सोडून गेलीं. बिचारे माझे मास्तरहि हा लोक सोडून गेले.—

——केशव——? मी त्याच वेळीं त्याला सारा वृत्तान्त कळवला. कित्येक दिवस केशवाविषयीं मला किती वाईट वाटत

होतें ! विधिघटनेला मी सारखा दोष देत असें. केशवाचा कांहीं अपराध नसतां त्याला काय म्हणून यातना ! मी त्याला सारें नीट समजावून सांगितलें. त्याला तें पटलेंहि. पण निराशेचा आघात व्हायचा तो झालाच. पण कालान्तरानें सारें नीट जुळून आलें. केशवाचें लग्न झालें. आज त्याला दोन मुलें व एक मुलगी आहे. मजकडे तो सहकुटुंब, सहपरिवार दोनतीनदां येऊन गेला. त्याला सुखांत पाहून मला किती तरी समाधान वाटलें ! केशव सुखी झाला नसता तर त्याच्या निराशेचें शल्य माझ्या काळजास अहर्निश घरे पाडीत राहिलें असतें. केशवाचें सुख पाहून मला नेहमीं ब्राउनिंग्च्या ओळी आठवतात,

" God 's in His Heaven
All's right with the world."

दिवाकर अजूनहि आमच्या जुन्या गांवींच आहेत. माझें सुकलेलें फूल फुलदाणींतील पाण्यांत तरंगत ठेवून ते निघून गेले. त्यानंतर या पंधरा वर्षांत त्यांची व माझी एकदांहि गांठ पडली नाहीं. फूल ठेवून गेल्यानंतर त्यांनीं मला दुसऱ्याच दिवशीं एक पत्र पाठवलें. तीच त्यांची व माझी अखेरची भेट. त्या पत्रांत खालील मजकूर होता.

"—कशाला लपवून ठेवलं होतं हें फूल ? कशाला तें आज मजकडे परत पाठवलं ? कशाला त्याची परत मागणी

केली ?——तुमच्या जीविताची उमलती कळी या फुलासारखी कायमची सुकवून टाकण्याकरतां का ?

——शकुंतला दिल्लीस नोकरी करीत आहे. मला तिचीं मधून-मधून उपदेशपर पत्रं येत असतात. कर्तव्यास कधींहि न चुकणं हा तिच्या स्वभावाचा विशेष आहे. माझ्या घोर पापाबद्दल व अमानुष अधःपतनाबद्दल मला पश्चात्ताप होण्याची ती वाट पहात आहे. बिचारी शकुंतला !

——हें फूल तुमच्याकडे परत पाठवूं नये असं अजूनहि वाटतं. कशाला पाठवायचं परत ? कशाला ?——पण परत न पाठवणारा मी कोण ? जें आजपर्यंत तुम्ही इतक्या काळजीनं जतन करून ठेवलं तें हिरावून नेण्याचा मला काय अधिकार आहे ? जें सर्वस्वीं तुमचंच आहे त्याचं मजपाशीं दान मागण्याचं तरी काय कारण होतं ?

——पण कशाला ?——कशाला ?——

——शकुंतला मला सोडून गेल्यानंतर माझं जीवन इतकं किळसवाणं होतं व त्याची मलिनता माझ्या रोमरोमांत इतकी भिनली आहे कीं ती या जन्मांत तरी नाहींशी होणं शक्य नाहीं.——माझ्या बागेंत आपणहून येऊन तुम्ही माझ्या बागेंतले सारे विषारी साप घालवून दिले. बागेंतल्या, आतां विशुद्ध झालेल्या वातावरणांत अहर्निश राहून मलीनता नाहींशी करावी हीच माझ्या आयुष्याची इतिकर्तव्यता मी निश्चित

केली.——सुकलेल्या फुलाच्या मागणीची अपेक्षा मी कधींच केली नव्हती. मग कशाला केलीत अशी मागणी ?

मी करूं का एक मागणी तुमच्याजवळ ? फूल घ्या—परत. पण तें फुलवण्याचा कधींहि प्रयत्न करूं नका.

—" A flower that once has blown, for ever dies."—

तुमच्या येण्यानं पवित्र झालेल्या या बागेंत, ज्या झाडाचं फूल तुम्हांला अतिशय आवडलं म्हणून तें तोडण्याकरतां गेलां असतां तुम्हांला कांटा बोंचला, त्या झाडाला अहर्निश अश्रूंचं पाणी घालण्यांत मला उरलेलं आयुष्य कंठूं द्या, एवढंच तुमच्यापाशीं मागणं आहे. माझ्या मागण्याचा अव्हेर नाहीं ना करणार ?

—दिवाकर."

पंधरा वर्षांत या पत्रांतल्या परिस्थितींत काडीचाहि बदल झाला नाहीं.—

पंधरा वर्षांचा दीर्घ कालावधि संथपणें निघून गेला. या अवधींत आई, तात्या, मास्तर मला एकटीला जगांत सोडून निघून गेलीं. मला वाईट वाटलें. कितीदां तरी खिन्न वाटलें. पण या एवढ्या अवधींत मला क्षणभरहि एकटें किंवा उदास वाटलें नाहीं. कारण हें माझें सुकलेलें फूल !—

भरपूर गोष्टी देणारें लोकप्रिय
सचित्र मासिक !

## य श व न्त

किरकोळ अंक ८ आणे; वार्षिक व. ५ रु.
परदेश ६ रु.

---

शास्त्रीय विषयांचें पहिलें व एकच
सचित्र मासिक !

## सृ ष्टि ज्ञा न

किरकोळ अंक ५ आणे,
वार्षिक ३ रु.

गणेश महादेव आणि कंपनी,
६०८ सदाशिव पेठ, पुणें शहर